# लोकराज्य

दिवाळी विशेषांक

## एकतेचा दीपोत्सव

महाराष्ट्र शासन

ऐकायलाच हवा

# दिलखुलास

संवाद...

**आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवर तसेच**
**News On AIR मोबाईल ॲप वर सोमवार ते शनिवार**
**सकाळी ७.२५ ते ७.४० वेळेत प्रसारण**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची निर्मिती

# अंतरंग

## ६ विचार, विधान आणि तत्त्वज्ञान

भारत हा उत्सवांचा देश आणि त्या उत्सवांच्या उज्ज्वल परंपरेत दीपोत्सव म्हणजे तेजाचा महामहोत्सव. काळ बदलला; पण दिवाळीचा अर्थ, तिच्या स्मृतींचा गंध आणि तिच्या प्रकाशाचा उष्मा मात्र अबाधित राहिला. हा केवळ प्रकाशाचा नव्हे, तर संस्कृतीच्या सातत्याचा, स्मृतींच्या नैतिकतेचा आणि आपुलकीच्या संवादाचा उत्सव आहे.

## ३६ पर्यावरणपूरक दिवाळी निसर्गपूजन

निसर्गाशी अखंड नाते जोडणारा आदिवासी समाज दिवाळीचा सण वेगळ्या पद्धतीने साजरा करतो. शहरांतील फटाक्यांच्या झगमगाटाऐवजी येथे दिसते निसर्गपूजनाची तेजस्वी परंपरा, जिथे मातीचे दिवे, शेतीची पाळ, जनावरांचे पूजन आणि एकोपा यांचा सुंदर संगम अनुभवास येतो.

## २१ ओवीगीतातील दिवाळी!

लोकसाहित्य हे समाजाच्या सांस्कृतिक जीवनाचे जिवंत दर्पण आहे आणि त्यातील ओवीगीते ही स्त्री-मनाचा सहज, स्वाभाविक आणि हृदयस्पर्शी आविष्कार आहेत. जात्यावर दळण दळताना उमटलेली ही ओवी म्हणजे श्रमगीत नव्हे, तर स्त्रीच्या भावविश्वाची कविता आहे. सण, संस्कृती, नातेसंबंध आणि जीवनानुभवांचा कोमल गुंफलेला पट ओवीतून दिसतो.

## ५० नवधान्य आणि सामूहिकतेचा उत्सव

आदिवासी समूहात सामूहिक पद्धतीने दिवाळी साजरी केली जाते. याला गावदिवाळी असे म्हणतात. देहवाली भिल्ल समूहात शेतातील नवीन पिके पिकून आल्यावर या नवधान्याची पूजा केल्याशिवाय हा समूह नवीन अन्न ग्रहण करत नाही. दिवाळीच्या निमित्ताने या नवधान्याची पूजा झाल्यावरच तो नव्या हंगामाचे अन्न धान्य खाण्यास प्रारंभ करतो.

## ३१ महाराष्ट्राची समृद्ध गीतपरंपरा

महाराष्ट्रात सध्या 'दिवाळी पहाट' हा उपक्रम खूप लोकप्रिय झालेला आहे. दिवाळीच्या पहाटे सुंदर-सुंदर गाणी गाऊन पहाट अजूनच सुंदर करण्यात येते. या कार्यक्रमांतून काही मराठी कलावंत मात्र आवर्जून मराठी गीते प्रस्तुत करतात. कारण 'दिवाळी पहाट'ची गाणी ही प्रसंगाला व वेळेला साजेशी असावी, असे काही प्रस्तुतकर्त्यांना मनापासून वाटते.

## ५४ किल्ल्यांचे गाव – आंबवडे बुद्रुक

सातारा जिल्हा हा ऐतिहासिक आणि क्रांतिकारक वारशासाठी प्रसिद्ध आहे. त्याच जिल्ह्यातील आंबवडे बुद्रुक हे गाव आता किल्ल्यांचे गाव म्हणून ओळख मिळवत आहे. या गावातील ग्रामस्थांनी आणि तरुणांनी मिळून इतिहास जिवंत ठेवण्याचा एक आगळावेगळा उपक्रम राबवला आहे. दिवाळीच्या काळात गावात महाराष्ट्रातील विविध गडकिल्ल्यांच्या प्रतिकृती बनवून त्यांचा इतिहास सर्वांना सांगितला जातो.


| | |
|---|---|
| विचार, विधान आणि तत्त्वज्ञान | ६ |
| रत्नदीपनगरी...पुण्यनगरी! | ८ |
| विविधतेने नटते महाराष्ट्राची दीपावली! | १३ |
| सर्वसामान्य जनतेचा आनंदोत्सव | १५ |
| अंधकारातून प्रकाशाकडे प्रवास... | १८ |
| ओवीगीतातील दिवाळी! | २१ |
| तमसो मा ज्योतिर्गमय: | २३ |
| मराठवाड्याचे सांस्कृतिक संचित | २६ |
| बंजारा युवतींचा 'दीपोत्सव' | २९ |
| महाराष्ट्राची समृद्ध गीतपरंपरा | ३१ |
| प्रकाशाचे दान, नात्यांचा उत्सव! | ३३ |
| पर्यावरणपूरक दिवाळी निसर्गपूजन | ३६ |
| परंपरा व जिवंत लोकसंस्कृतीचे मिश्रण | ३८ |
| कोकणातील पारंपरिक दिवाळी | ४२ |
| प्रकाश आणि प्रेमाचा दिवाळ सण! | ४५ |
| सण स्नेहाचा, दिवाळी फराळाचा! | ४८ |
| नवधान्य आणि सामूहिकतेचा उत्सव | ५० |
| नवतेजाची, मांगल्याची दीपावली | ५२ |
| किल्ल्यांचे गाव – आंबवडे बुद्रुक | ५४ |
| कोकणातील दिवाळी व खाद्यसंस्कृती | ५५ |
| प्रकाशाचा सांस्कृतिक प्रवास | ५७ |
| हास्यकल्लोळ... | ५८ |

दिवाळी विशेषांक

प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता महाराष्ट्रस्य राज्यस्य मुद्रा भद्राय राजते

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन**

**लोकराज्य**

■ मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
■ व्यवस्थापकीय संपादक — किशोर गांगुर्डे
■ संपादक — गोविंद अहंकारी
■ सहसंपादक — अर्चना देशमुख, अश्विनी पुजारी
■ मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
■ मांडणी, सजावट — शैलेश कदम
■ मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर
■ मुद्रण — मे. प्रिंटरेड इश्युज (इंडिया) प्रा.लि., १७, प्रगती इंडस्ट्रियल इस्टेट, एन.एम.जोशी मार्ग, मुंबई - ४०००११.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# दुर्मीळ व पारंपरिक वाद्यांचा जागर



सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत 'वाद्यरंग' या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात ७५ पेक्षा जास्त दुर्मीळ व पारंपरिक वाद्यांचे प्रदर्शन करण्यात आले. राज्याच्या विविध भागांमध्ये अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले. या दुर्मीळ व पारंपरिक वाद्यांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रदर्शनामध्ये अनेक दुर्मीळ वाद्ये ठेवण्यात आली होती. यामध्ये डक्कलवारांची किंगरी, मसनजोगींचे घाटोळे, आदिवासींची घांगळी, आदिवासींचा डेरा, हिरोबाई किंगरी, जोगी किंगरी, टिमकी, तंबोरी अशा वैशिष्ट्यपूर्ण वाद्यांचा समावेश होता. वाद्यरंग या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमात २०० पेक्षा जास्त कलाकारांनी आपल्या दुर्मीळ व पारंपरिक वाद्यांची कला प्रेक्षकांपुढे सादर केली. ढोलकीवादक कृष्णा मुसळे यांच्या जुगलबंदीने या कार्यक्रमात रंगत आणली.

या कार्यक्रमास वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, सांस्कृतिक कार्य सचिव डॉ. किरण कुलकर्णी, सांस्कृतिक कार्य संचालक विभीषण चवरे, मुख्य पोस्टमास्तर जनरल अमिताभ सिंग, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालक डॉ. तेजस गर्गे, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर उपस्थित होत्या.



# प्रकाशमयी आनंदाचा, सृजनाचा उत्सव

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाने लोकशाही घटना स्वीकारली. लोकशाही म्हणजे लोकांनी लोकांसाठी लोकांकडून चालविलेले राज्य, अशी व्याख्या परिचित आहे.

अशा या लोकशाही देशातील पुरोगामी अन् प्रगत राज्य म्हणून महाराष्ट्र ओळखले जाते. या राज्यातील राज्य शासनाचे मुखपत्र 'लोकराज्य' माहिती नाही, अशी साक्षर व्यक्ती कदाचित नसेल. 'लोकराज्य'च्या माध्यमातून विविध शासकीय योजना, विकासकामे, यशोगाथा राज्यातील ग्रामपातळीपर्यंत पोहोचण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले गेले.

देशातील सर्वाधिक खपाचे शासनाचे मुखपत्र म्हणून 'लोकराज्य'ची ओळख निर्माण झाली. त्यावेळी लोकशाही व्याख्येनुसार 'राज्य लोकांचे, लोकराज्य राज्याचे' हे सिद्ध केले. राज्यातील विविध स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्याने 'लोकराज्य' वाचले नाही असे विरळच, अशी महती 'लोकराज्य'ने निर्माण केली आहे. याचबरोबर 'लोकराज्य'ने विविध विशेषांकांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली. असे हे विशेषांक अनेक अभ्यासू, जाणकार मंडळींच्या आजही संग्रही आहेत. त्यात या वर्षी प्रथमच 'लोकराज्य'चा दिवाळी विशेषांक प्रकाशित होत आहे.

या अंकात दिवाळीचे वैशिष्ट्य, राज्यातील आदिवासी, बंजारा समाजातील; तसेच मराठवाडा, विदर्भ, कोकण आदी विभागात साजरी होणारी पारंपरिक दिवाळी, या सणाचे महत्त्व, परंपरा, साहित्य, पर्यावरणपूरक दिवाळी, संस्कृतीची ओळख, हास्यकल्लोळ विनोद आदींचा या 'लोकराज्य'च्या दिवाळी विशेषांकामध्ये समावेश आहे. हा अंक नेहमीप्रमाणे सर्वांना आवडेल, संग्रही राहील, असा विश्वास वाटतो.

स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी असोत किंवा प्रशासनशास्त्र, समाजशास्त्र यांसारख्या विषयांचे संशोधक; 'लोकराज्य' हे त्यांच्या अभ्यासातील विश्वासार्ह संदर्भग्रंथ ठरले आहे. राज्याच्या विकासप्रक्रियेतील प्रत्येक महत्त्वाचा टप्पा, धोरण, उपक्रम आणि यशोगाथा यांची संग्रही माहिती या मासिकाच्या अंकांत आढळते, म्हणूनच हे मासिक ज्ञान, माहिती आणि प्रेरणेचे समृद्ध भांडार बनले आहे.

राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात आणि गावा-गावांत 'लोकराज्य'चा एक वेगळा वाचकवर्ग निर्माण झाला आहे. वाचकांच्या या प्रेमामुळेच 'लोकराज्य' मासिक देशातील सर्वाधिक खपाचे शासन मुखपत्र म्हणून गौरवाने ओळखले जाते.

वर्षानुवर्षे विविध विषयांवरील विशेषांकांद्वारे 'लोकराज्य'ने स्वतःची स्वतंत्र परंपरा निर्माण केली आहे. त्या परंपरेत यंदा प्रथमच 'लोकराज्य'चा दिवाळी विशेषांक प्रकाशित होत आहे, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे.

या विशेषांकात प्रकाशाचा, आनंदाचा आणि सृजनाचा उत्सव असलेल्या दिवाळी सणाचे विविध पैलू मांडण्याचा प्रयत्न केला आहे. राज्यातील आदिवासी, बंजारा समाज; तसेच कोकण, मराठवाडा, विदर्भ अशा विविध प्रांतांतील पारंपरिक दिवाळी साजरी करण्याच्या रूढी, प्रथा आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांची मेजवानी या अंकात आपणास मिळणार आहे.

'लोकराज्य'चा हा पहिला दिवाळी विशेषांक वाचकांच्या मनापर्यंत पोहोचेल, प्रत्येकाला आपलासा वाटेल आणि दीर्घकाळ संग्रही ठेवावा, असा ठरेल, अशी आम्हाला खात्री आहे.

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

**ब्रिजेश सिंह**
(मुख्य संपादक)

**भारत हा उत्सवांचा देश आणि त्या उत्सवांच्या उज्ज्वल परंपरेत दीपोत्सव म्हणजे तेजाचा महामहोत्सव. काळ बदलला; पण दिवाळीचा अर्थ, तिच्या स्मृतींचा गंध आणि तिच्या प्रकाशाचा उष्मा मात्र अबाधित राहिला. हा केवळ प्रकाशाचा नव्हे, तर संस्कृतीच्या सातत्याचा, स्मृतींच्या नैतिकतेचा आणि आपुलकीच्या संवादाचा उत्सव आहे. तेलाच्या पणत्यांपासून ते एलईडीच्या झगमगाटापर्यंतचा प्रवास झाला, तरीही प्रत्येक दिवा माणसाला तेच सांगतो. कोणताही अंधार शाश्वत नसतो; प्रकाशाचा प्रवासच खरा आहे, कारण तोच आपल्या संस्कृतीचा आत्मा आहे.**

# विचार, विधान आणि तत्त्वज्ञान

**शैलेश पांडे**

भारत हा उत्सवप्रिय देश आहे, असे सरसकट म्हटले जाते आणि त्यातही दिवाळीला तर सणांच्या मांदियाळीत सर्वोच्च स्थान दिले जाते. भारतातील उत्सवांचे, सणांचे वैशिष्ट्य असे की, त्यांच्या स्वरूपात बदल होत असला, तरी त्यांचे सातत्य आणि त्या सणामागील भावना तीच असते. ही भावना विस्मरणात जाते, तेव्हा सणांचे स्वरूप औपचारिकतेपुरते उरते. काही गोष्टींचे विकृतीकरणदेखील होते. गतहारी म्हणून पूर्वीपासून ओळखीच्या असलेल्या अमावास्येची गटारी झाली आणि सारेच बिघडले. होलिकोत्सवाचेदेखील बऱ्याच प्रमाणात तसेच झाले. काळाच्या ओघात हे असे होत राहणार हे मान्य केले, तरी काही सण त्यांच्यामागील मूळ भावनेसह लोकजीवनात कायम महत्त्व राखून असतात. दीपोत्सव हा अशांपैकी एक सण. भारतीय सणांचा राजा. या सणाला 'प्रकाशाचा उत्सव' किंवा 'वाईटावर चांगल्याने मिळविलेल्या विजयाचा उत्सव' किंवा 'अनीतीवर नीतीने मिळविलेल्या विजयाचा उत्सव' अशी गुळगुळीत झालेली विशेषणे लावली जातात. दिवाळीचे माहात्म्य, त्यातील सातत्य, त्यामागील विचार हे सारे बहुतेकदा लक्षात घेतले जात नाही. आपल्याला दिवाळी हा पाच दिवसांचा सण असतो आणि त्यांचे मुहूर्त-विधी हे सारे ठाऊक असते आणि त्यामागील कथा-आख्यायिकाही ठाऊक असतात. वास्तवात दिवाळी इतक्यापुरती मर्यादित नाही. पुरातन काळापासून सुरू असलेल्या या सणामागे फार मोठा भावार्थ आहे आणि त्यामुळेच हा सण भारताच्या नसानसांत भिनला आहे. हा सण सुरू कुठून झाला आणि तो उत्क्रांत कसा होत गेला, हे आपल्याला कथा-आख्यायिकांतून कळत असते. विजयाची, मांगल्याची प्रतीके त्यातूनच आली. दिवाळीचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य असे की, त्यात सामूहिकता, एकता आणि संवादाची सूत्रे गुंफलेली आहेत. काही वर्षांपूर्वी एका अभ्यासात असे आढळले होते की, सामूहिकरीत्या केलेल्या विधींच्या माध्यमातून समाजात व कुटुंबांत सद्भाव निर्माण होतो. उत्सवाच्या निमित्ताने जे लोक एकत्र येतात आणि त्यात सहभागी होतात. त्यांच्यात आपुलकी व सहकार्याचा भाव निर्माण होतो. एकमेकांप्रति नैतिक जबाबदारीची भावनाही निर्माण होते. सामाजिक व कौटुंबिक स्मृतींचे सातत्य जपतानाच तो ऐवज पुढच्या पिढ्यांना प्रदान करीत जाण्याची दिवाळसणाची ही रीत आगळीच म्हटली पाहिजे. एका



तत्त्वज्ञाचे म्हणणे असे आहे की, स्मृती जपणे म्हणजे फक्त गतकाळातील एखाद्या गोष्टीची आठवण करणे नव्हे, तर त्या स्मृतींच्या प्रेरणेने केलेले नैतिक कृत्य होय. तुम्ही फक्त एखादी स्मृती मनात जतन करीत असाल; पण त्यातून प्रेरणा घेऊन तशाच स्मृती निर्माण करण्यासाठी कोणतीच कृती करीत नसाल तर त्या स्मृतीला अर्थ उरत नाही. दिवाळीच्या सातत्यातला भाव आणि अर्थ हाच... काळ कितीही पुढे गेला तरी नैतिकता, सद्भावना, आपुलकी, जबाबदारी

अशा गोष्टींच्या स्मृतींचे सातत्य टिकविणारा. आपल्या संस्कृतीचे माहात्म्य आणि विशेषत्व जोपासणारा.

निकोलस वाईज नामक व्यक्तीने एक तुलनात्मक अध्ययन केले होते. त्याचा विषय होता ‘प्लेस, सोसायटी ॲण्ड दिवाली अराऊंड द वर्ल्ड’ आणि उद्देश होता जगाच्या विविध भागांत विखुरलेल्या भारतीयांच्या दीपोत्सवामागील भावनांचा. त्याने त्या अध्ययनावरून असे प्रतिपादित केले होते की, ऑकलंड, टोरोंटो किंवा लंडनमधील स्थलांतरित भारतीयांसाठी दिवाळी म्हणजे केवळ उत्सव नसतो. सणाचा तो काळ त्यांच्याकडून घर सावरण्यासाठी, घरपण



जपण्यासाठी आणि आपल्या माणसांना जवळ आणण्यासाठी वापरला जातो. रोषणाई आणि गाणी किंवा आरत्या यांतून स्वत्वाची ओळख निर्माण होते आणि भावबंध तयार होतात. स्थलांतरित असोत की, स्थायी स्वरूपात राहणारे लोक असोत, आपल्या भारतीय दर्शनात जो नित्य-अनित्याचा भाव आहे. त्यात नित्याचा आणि सातत्याचा बोध देणारा हा सण आहे. घर आवरणे, सजवणे, रंगरंगोटी, नवे कपडे, मिष्ठान्न, दागदागिने ही सारी दिवाळीची दृश्य रूपे. त्यातील प्रत्येक कृतीमागे अबोल असा सांस्कृतिक सातत्याचा भाव असतोच असतो.

एकीकडे दिवाळी हा इंद्रियांना सुखावणारा सण. तेलाच्या दिव्यांतून येणारा पवित्र गंध, रेशमी-तलम वस्त्रांचा स्पर्श, मिष्ठान्नांची चव, रांगोळीतील रेखीवपणा किंवा रोषणाईतून मिळणारे नेत्रसुख ही त्या सुखाची रूपे. त्यामागील ज्या भावाची चर्चा होत नाही तो म्हणजे उत्सवादरम्यान सर्वार्थाने सुखोपभोग घेण्याचा आणि तोच भोग इतरांना देत राहण्याचा भाव. अनेक अर्थ आणि अन्वयार्थ समजून घेण्याचा भाव. प्रकाशाला स्वतःसाठीच नव्हे, तर इतरांसाठीही वापरण्याचा भाव. शेतकऱ्यांच्या हंगामाची आठवण करण्याचा, वातावरणातील बदलांचे स्वागत करण्याचा, समृद्धीचे स्वागत करण्याचा आणि अनिष्टावर इष्टाचा विजय साजरा करण्याचाही भाव. कोविडच्या काळात सारे जीवनच ठप्प झाले होते. त्याला दिवाळीही अपवाद नव्हती. तरीही अनेक लोकांनी लॉकडाऊनच्या काळात व्हर्च्युअल पूजा केली. सोशल डिस्टन्सिंग ठेवून आरती केली आणि सणातील सातत्य राखले. स्वरूप बदलले तरी सांस्कृतिक सातत्य राखून सण साजरे करण्याची ही रीत त्या संकटाच्या काळात दिलासा देणारी होती. दीपोत्सवाच्या काळात केली जाणारी घरांची स्वच्छता आणि नवी वस्त्रे ही आंतरिक शुद्धीच्या मानवी असोशीची दृश्य रूपे. त्यातही सांस्कृतिक, धार्मिक, आध्यात्मिक आशय. आताशः दिवाळीचे सांस्कृतिक व नैतिक व्याकरण बदलत चालले आहे. अर्थकारणही वाढत चाललेले आहे. डिजिटल युगात मोठ्या कंपन्या, व्यावसायिक, सरकारे यांच्याकडून झगमगाट केला जातो. शुभेच्छा दिल्या जातात. खरेदीच्या ऑफर्सही जाहीर केल्या जातात. ऑनलाइन व्यवहार मोठ्या प्रमाणात होतात आणि तरीही दुकानांत गर्दी असते. आता वैयक्तिक भेटींची जागा डिजिटल ग्रीटिंगने घेतली आहे. तेलाचा दिवा जाऊन एलईडी लॅम्प आला आहे. देवदर्शनाऐवजी सेल्फीचे माहात्म्य वाढले आहे; पण दीपोत्सवाचे वैशिष्ट्य असे की, हा सण सतत नूतन होत राहिला. जुनी आणि बाह्य कात टाकून नव्या स्वरूपात उजळत राहिला. तेलाचा दिवा न लावता एलईडी लॅम्प लावला तरी आता कुणाची तक्रार नसते. प्रकाशाचे उजळणे महत्त्वाचे. भारतीयांच्या स्मृतींमध्ये तेजाळत राहिलेला दिवाळीचा प्रकाश याही काळात आसमंत आणि मने उजळून काढीत असतो. कारण दिवाळी हा खऱ्या अर्थाने प्रकाशाच्या असोशीचा, ओढीचा आणि आकर्षणाचा सण आहे. प्रत्येक संस्कृती आपापली प्रतीके-रूपके निवडत असते. दिवाळीच्या निमित्ताने भारतीय संस्कृतीने प्रकाशाचे रूपक निवडले आहे. यामागील मर्म समजून घेतले, तर दीपोत्सवाचा खरा आशय कळतो. प्रकाश म्हणजे ज्ञान, सातत्य, योग्य दिशा, मंगलाची कामना आणि भविष्याचा वेध. त्यामुळे कित्येक शतके-युगे लोटली, तरी कित्येक शासक आले-गेले तरी, तंत्र बदलले असले, तरी दीपोत्सव हे आपल्या सांस्कृतिक संचितातील शाश्वत तत्त्व म्हणून शिल्लक राहिले आहे. दीपोत्सवात लागणारा प्रत्येक दिवा आपल्याला प्राचीन काळापासूनचे शहाणपण सांगत असतो. कोणताच अंधार कायमस्वरूपी नसतो. आशावादी होऊन प्रकाशाचे सातत्य राखता येते आणि अंधारापासून पळण्यापेक्षा दिवे उजळून त्यालाच पळविता येते!

(लेखक हे नागपूर येथील नामवंत दैनिकाचे मुख्य संपादक आहेत.)

**रत्नदीपांनी उजळलेली पुण्यनगरी, फटाक्यांच्या आतषबाजीत न्हालेली गल्लीबोळ, सुगंधी फराळाचा दरवळ आणि आनंदाच्या लहरींनी भारलेली प्रत्येक मनं, अशी ही पुण्याची दिवाळी! ही दिवाळी केवळ रोषणाई, खरेदी आणि उत्सवाची नाही, तर संस्कृती, संवेदना आणि सामाजिक बांधिलकी यांची उजळ कहाणी आहे. दिवाळी अंकांच्या प्रकाशात झळकणारी 'अक्षर दिवाळी', 'दिवाळी पहाटे'चे सांस्कृतिक सूर आणि अनाथाश्रमातील मुलांच्या हातांनी सजवलेल्या पणत्या, हे सारे मिळून घडवतात एक अनोखा उत्सव, जो पुण्यनगरीच्या संस्कारी हृदयाचे दर्शन घडवतो. ही दिवाळी म्हणजे उत्साह, कृतज्ञता आणि आनंद यांचा संगम, 'अवनीवर उतरलेले आकाश' अनुभवायचे असेल, तर फक्त पुण्यातच!**

# रत्नदीपनगरी...पुण्यनगरी!

**डॉ. संगीता बर्वे**

*नक्षत्रांचे दीप उजळले*
*अवनीवर आकाश उतरले*
*अशा घडीला अवघी सृष्टी*
*मंगलमय झाली*
*आली दीपावली आली...*
*चैतन्याने वारा भरला*
*सुगंध उधळीत दिशांत फिरला*
*गारठलेली पहाट त्याने*
*शुचिर्भूत केली*
*आली दीपावली आली...*
*घराघराचे हसले अंगण*
*दारावरती सजले तोरण*
*नाजूक रेखीव हात रेखिती*
*प्रसन्न रंगावली*
*आली दीपावली आली...*
*अलंकृत ही गृहस्वामिनी*
*सजविते घरा तनमन अर्पुनी*
*घरात आली भाग्य लक्ष्मी*
*आज सोनपावली*
*आली दीपावली आली...*
*नव्या क्षणांचे स्वागत व्हावे*
*प्रेम जगाला द्यावे घ्यावे*
*हेच सांगती दीपकळ्यांच्या*
*लक्ष लक्ष ओळी*
*आली दीपावली आली...*





आकाशातले तारे काय चमकतील अशी पुण्यनगरी आता चमकू लागली आहे. रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना आकाशकंदील विक्रेत्यांच्या दुकानांच्या रांगाच रांगा लागलेल्या आहेत. विविध प्रकारचे, रंगांचे, आकारांचे आकाशदिवे अत्यंत कल्पकतेने टांगले आहेत. त्या आकाश कंदीलांनी शहर अक्षरशः उजळून निघाले आहे.

आकाशदिवे खरेदी करण्यासाठी मुलांबरोबर मोठ्यांची झुंबड उडाली आहे. हा घ्यावा की तो घ्यावा की पुढच्या दुकानातला घ्यावा. अशा विचारांमध्ये आपल्या आवडीचा आकाशदिवा खरेदी करून आई-बाबांच्या स्कूटरवरून, सायकलवरून, मोटारीमधून



जाणाऱ्या मुलांच्या चेहऱ्यावरून आनंद निथळतो आहे.

### फटाक्यांची आतषबाजी

फटाक्यांची आतषबाजी सुरू झाली आहे. मला तर वाटतं फटाके वाजवण्यात पुणे शहराचा फार वरचा क्रमांक लागत असावा. पहाट होताच ज्येष्ठांची झोपमोड करण्यात फटाके वाजवणाऱ्यांना अपरिमित आनंद होत असावा. आता ज्येष्ठांनाही याची सवय झाली आहे. तेही पहाटेच उठून बसतात. बहुधा फटाक्यांचे आवाज ऐकण्यासाठी त्यांचेही कान आसुसलेले असतात. गल्लीत जरा कुठे शांतता असेल तर चुकल्यासारखे वाटते आणि फटाक्यांचे प्रकारसुद्धा किती. विविध प्रकारचे आकाशात उडणारे बाण आणि त्यांची दिसणारी रंगसंगती! खरोखरीच नक्षत्रांचे दीप उजळले हे सिद्ध करणारी आतषबाजी! प्रत्येक घरावर दिव्यांच्या माळा सोडलेल्या आहेत. त्यामध्ये दिमाखात आकाशदिवा लावलेला. अगदी 'रत्नदीप नगरी' म्हणावी अशी ही आमुची पुण्यनगरी!

### गर्दीच गर्दी आणि खरेदी

गर्दीच गर्दी चहूकडे गं बाई, आली दिवाळी घराकडे... तशीही पुण्यात गर्दी आता प्रचंड वाढलेली आहे. सर्वांनाच गर्दीची सवयही झालेली आहे. मात्र दिवाळीची गर्दी आणखी वेगळीच. दिवाळी म्हणजे विक्रेत्यांची चंगळ आणि ग्राहकांचा खरेदीचा उत्साह. अगदी छोट्या-छोट्या गोष्टींपासून, दाराच्या तोरणापासून ते सोन्याच्या दुकानातल्या दागदागिन्यांपर्यंतची खरेदी!

सगळीकडे नुसती लगबग सुरू आहे. ग्राहकांचे खिसे रिकामे होत आहेत आणि विक्रेत्यांचे खिसे भरभरून वाहत आहेत, अशी ही सर्वांचीच खऱ्या अर्थाने दिवाळी!

### साफसफाई आणि फराळ

दिवाळी आली म्हणून घर आवरायलाच हवे. अगदी खिडक्या दारे साफ करण्यापासून घरातली पांघरूणं, गोधड्या धुण्यापर्यंत अखंड कामे सुरू आहेत. भरपूर सामान भरून चकल्या, लाडू, चिवडा, करंजी असे विविध पदार्थ वेगवेगळ्या प्रकारे करून पाहण्यात महिलावर्ग दंग आहे. नवनव्या गृहिणींना यु-ट्यूबवाल्या पदार्थ तयार करणाऱ्या महिलांचा आधार आहे. नोकरदार महिलांसाठी तर फराळाचं तयार मिळण्याची खास सोय पुण्यात वेगवेगळ्या ठिकाणी उपलब्ध आहे.

अगदी खुसखुशीत चकली कडबोळ्यांपासून चिवड्यांच्या वेगवेगळ्या प्रकारापर्यंत... ओल्या नारळाच्या करंजीपर्यंत सगळे काही हलवायांच्या दुकानांमध्ये सजून-धजून सज्ज आहे. चव असणाऱ्या महिलांचे हात आता भरपूर कामाला लागलेले आहेत. घरगुती फराळाचे पदार्थ तयार करण्यात आणि त्यांची विक्री करण्यात अनेक महिला अग्रेसर झाल्या आहेत. अनेक महिला संस्थासुद्धा अशा महिलांना कामावर ठेवून त्यांच्याकडून वेगवेगळे पदार्थ तयार



करून घेऊन रास्त दरात विकण्यासाठी सज्ज आहेत. विशिष्ट ठिकाणी फराळ विकत घेण्यासाठी लागलेल्या रांगासुद्धा तुम्हाला फक्त पुण्यातच दिसतील.

### कपड्यांची सजलेली दुकाने

कपड्यांची दुकाने रंगीबेरंगी दिव्यांनी सजून निघाली आहेत. दुकानाबाहेर लागलेल्या स्त्री-पुरुषांच्या, मुला-मुलींच्या पुतळ्यांवर म्हणजेच मॅनेक्विनवर रोज तऱ्हेतऱ्हेचे पोशाख चढवण्यात कामगार मग्न आहेत. बाहेरची गर्दी कमी म्हणून की, काय दुकानावरसुद्धा या कृत्रिम मॅनेक्विनची, पुतळ्यांची गर्दीच गर्दी करण्यात प्रत्येक दुकानदाराची अहमहमिका चालू असावी, इतकी या कृत्रिम माणसांची संख्या पुण्यामध्ये लक्ष्मी रोडवर, टिळक रोडवर, तुळशीबागेतल्या दुकानांसमोर वाढत चालली आहे. लक्ष्मीरोड, तुळशीबागच नव्हे तर अगदी कुठल्याही रस्त्यावर चालायला पावलापूरती जागा आहे. यातच समाधान मिळते आहे. लोक आनंदाने खरेदी करत आहेत. आनंदासाठीच आहे दिवाळी! वर्षभर अपरिमित कष्ट! नवीन



कपड्यांचा, फराळाचा, फटाक्यांचा, रांगोळीचा आनंद नको का साजरा करायला? म्हणून तर दिवाळीची खास सुट्टी असते सगळ्यांना!

घरकाम करणाऱ्या मदतनीसांपासून कचरा उचलणाऱ्या बायका, रस्ते झाडणारे कामगार, पोस्टमन सगळेच दिवाळीचा आनंद घेत असतात. कारण सर्वांना दिवाळीचा बोनस आपापल्या परीने मिळालेला असतो. त्यामुळे मुलांना नवे कपडे घेण्यात, घर स्वच्छ करण्यासाठी, सजवण्यासाठी, आकाशदिवा लावण्यासाठी, रांगोळी काढण्यासाठी, दिवाळीपूर्वी त्यांनी भरपूर आटापिटा केलेला असतो.

या गर्दीला आणि फटाक्यांच्या आवाजाला त्रासलेले काही जण तर नको या फटाक्यांचा आवाज, नको ती गर्दी, म्हणून चक्क शहर सोडून बाहेर थंड हवेच्या ठिकाणी किंवा टूर्स ॲण्ड ट्रॅव्हल्सबरोबर चक्क सहलीचा आनंद लुटण्यासाठी बाहेरगावी निघून गेलेले आहेत. कोणी आपापल्या गावाला शेतीवाडीवर आपल्या घरच्यांना भेटण्यासाठी गेले आहेत.

### दिवाळी अंक

आणि हो.... अगदी विशेष आणि महत्त्वाचे म्हणजे वेगवेगळ्या विषयांवरचे दिवाळी अंक! केवळ महाराष्ट्राची असलेली सुंदर परंपरा! अक्षर परंपरा! एकट्या पुण्यातूनच कितीतरी दिवाळी अंक प्रकाशित होत असतील. हंस, मोहिनी, मेनका, अक्षरधारा, मिळून साऱ्याजणी, चपराक, चांगुलपणाची चळवळ, पुण्यभूषण, साधना, नीहार, बालकुमार, लाडोबा, चिकू पिकू, कुल्फी, छात्र प्रबोधन, निर्मळ रानवारा.... मोठ्यांसाठी आणि मुलांसाठीसुद्धा दिवाळी अंकांची नुसती रेलचेल... प्रकाशनेच प्रकाशने सर्वत्र... त्यानिमित्ताने कवितांचे, गाण्यांचे कार्यक्रम... लेखकांना, रसिकांना प्रेमाचे, स्नेहाचे, आग्रहाचे आमंत्रण. दिवाळी अंकातील लेख, कविता, कथा. नवनवीन कल्पनांनी सजलेले प्रत्येक दिवाळी अंकाचे वैशिष्ट्यपूर्ण मुखपृष्ठ, प्रत्येक स्टॉलवर आपला अंक उपलब्ध असावा म्हणून प्रकाशकांची धडपड. अंक विक्रेत्यांची धडपड आणि या अंकांना पुणेकरांबरोबरच अवघा महाराष्ट्र देत असलेला भरघोस प्रतिसाद...ही खरी दिवाळी...अक्षर दिवाळी...अक्षय दिवाळी! फटाक्यांच्या, भुईनळ्यांच्या आतषबाजीबरोबरच कविता कथांची आतषबाजी. नवनव्या लेखकांना, कवींना या अंकांमध्ये स्थान मिळालेले पाहून त्यांच्या लेखणीमध्ये आणि नवलेखकांमध्येही संचारलेला उत्साह, ऊर्जा त्यांना आणखी लिहायला प्रवृत्त करते.

### दिवाळी पहाट

याशिवाय पुणेकरांना उत्साहाने आमंत्रित करणारे दिवाळी पहाटचे, विविध कार्यक्रम कवितांचे, नाटकांचे, अभिवाचनांचे, गाण्यांचे कार्यक्रम... अगदी पहाटे-पहाटेच मस्त आवरून दिवाळीच्या नव्या साड्या, दागदागिने, नवे कपडे परिधान करून रसिकमंडळी बालगंधर्व, यशवंतराव, एस.एम.जोशी, महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक स्मारक मंदिर, गणेश हॉल, अण्णा भाऊ साठे नाट्यमंदिर अशा कितीतरी नाट्यगृहांवर अगदी मंगल कार्यालयांमध्येसुद्धा आणि पुणेकरांच्या आणि सर्वांच्याच आवडत्या सारसबागेमध्येसुद्धा आपल्या लाडक्या कलावंतांच्या कार्यक्रमांसाठी हजेरी लावत असतात.

कार्यक्रमाच्या ठिकाणी काढलेल्या सुंदर-सुंदर रांगोळ्या, फुलांची सजावट, दिव्यांची तेजोमय आरास.. पणत्या... अंधशाळा अनाथाश्रम यांनी खास दिवाळीसाठी तयार केलेल्या पणत्या आणि आकाश दिवे. कल्पकतेने रंगवलेल्या या पणत्या नवनव्या प्रकारचे आकाशदिवे



अंधशाळा, अनाथ आश्रम अशा वेगवेगळ्या संस्थांमधील खास मुलांनी तयार केलेल्या असतात. तितक्याच लखलखीतपणे सजलेला रंगमंच आणि रंगमंचावरचे कलाकार... दिवाळी अशीही साजरी होते हे पाहण्यासाठी ग्रामीण भागातील अनेक मंडळी खास दिवाळीसाठी म्हणून पुण्यातील आपल्या नातेवाईकांकडे हजेरी लावतात आणि पुण्यातील ही नेत्रदीपक दिवाळी पाहून चकित होतात, धन्य होतात, संपन्न होतात, समृद्ध होतात. आपल्याही गावाकडे असे काही करायला हवे याची प्रेरणा घेऊन नव्या उमेदीने पुन्हा आपापल्या गावांकडे जातात. या उलट काही अस्सल पुणेकर या सगळ्यांकडे पाठ फिरवून किती हे कार्यक्रम! अगदी कंटाळा आला बुवा.. असे म्हणत टेकडीवर काठ्या टेकवीत फिरायलाही जातात आणि तिथे दिव्यांनी पणत्यांनी सजवलेल्या दिवाळीच्या कार्यक्रमांमध्ये भाग घेतात, तर असे हे दिवाळीत लखलखणारे, गाणारे संगीतमय झालेले पुणे आणि पुण्यातील दिवाळीनिमित्ताचे विविध कार्यक्रम आणि आता मुलांनो खास तुमच्यासाठी दिवाळीची माहिती..

हा आनंदाचा उत्सव प्रत्येकाच्या आयुष्यात नेहमीच नवीन प्रकाश घेऊन येतो. या सणाला दीपावली हे नाव का पडलं माहितीये? या उत्सवाची सुरुवातच प्रकाशमय दिव्यांनी होते म्हणून ही दीपावली. अश्विन वद्य त्रयोदशी ते कार्तिक शुद्ध द्वितीया असे तब्बल पाच दिवस दिवाळी असते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या सणासाठी आपल्याला मोठी सुट्टीही मिळते. आता दिवाळीचे पाच दिवस कोणते? ते कशा प्रकारे साजरे केले जातात? त्या दिवसांचे महत्त्व काय? हे तर तुम्हाला कळायलाच हवं.

अश्विन वद्य त्रयोदशीला दिवाळीची सुरुवात होते. हा दिवस असतो धनत्रयोदशीचा. यालाच धनतेरस असेही म्हणतात. या दिवशी धनाची पूजा करण्याची आपल्याकडे पद्धत आहे. मात्र धनत्रयोदशीच्या आदल्या दिवशी कोणाची पूजा केली जाते माहितीये! गोधनाची. गाय आणि वासराची पूजा ज्या दिवशी करतात, त्या दिवसाला म्हणतात वसुबारस. आपल्या भारतीय संस्कृतीत गाय किती पवित्र मानली जाते हे तर तुम्हाला माहितीच आहे, तर वसुबारस, धनत्रयोदशी आणि त्यानंतरचा तिसरा दिवस म्हणजे नरक चतुर्दशी. खऱ्या अर्थाने दिवाळीची लगबग सुरू होते ती या दिवसापासून. या दिवशी भल्या पहाटे उठून आंघोळ करायची असते. ती ही सुगंधी उटणं, सुगंधी तेल लावून.. लवकर उठून आंघोळ केली नाही, तर माणूस नरकात जातो असं म्हणतात.



त्यामुळे या दिवशी सगळ्यांनी लवकर उठायचे आणि मस्तपैकी तयार व्हायचं. हो...पण या दिवसाला नरक चतुर्दशी का म्हणतात हेसुद्धा आपल्याला माहिती पाहिजे ना! सांगते...

खूप-खूप वर्षांपूर्वी नरकासुर नावाचा राक्षस राजा होता. तो प्रजेला खूप त्रास द्यायचा. एकदा त्याने इंद्राचा ऐरावतच पळवला. सोळा हजार स्त्रियांना त्याने कैदेत ठेवले. लोक अगदी हैराण होऊन गेले. शेवटी गेले कृष्णाकडे. म्हणाले, वाचव रे बाबा या नरकासुरापासून! मग कृष्णदेवांनी नरकासुरावर केली स्वारी आणि टाकले ठार मारून त्याला. त्या सोळा हजार स्त्रियांना कृष्णाने ज्या दिवशी



नरकयातनांमधून सोडवले तो दिवस म्हणजे नरक चतुर्दशीचा दिवस. नरक चतुर्दशीनंतरचा पुढचा दिवस म्हणजे लक्ष्मीपूजन. अतिशय महत्त्वाचा दिवस आहे हा. घरातल्या लक्ष्मीची, संपत्तीची, वैभवाची पूजा करण्याचा दिवस. सगळीकडे झगमगणाऱ्या दिव्यांच्या माळा, दारापुढे घातलेली सुंदर रांगोळी, चमचमणारे आकाशदिवे आणि उडणारे फटाके यांनी धुंद आणि धुर्रर होऊन गेलेले वातावरण म्हणजे दिवाळी!

लक्ष्मीपूजनानंतरचा दिवस म्हणजे बलिप्रतिपदा. नवे कपडे, गोडाधोडाचे जेवण, फराळ, ओवाळणे असा भरगच्च कार्यक्रम या दिवशी असतो. दिवाळीचा शेवटचा दिवस म्हणजे भाऊबीज. या दिवशी बहीण भावाला ओवाळते. भाऊ तिला तिच्या आवडीची वस्तू किंवा पैसे ओवाळणी म्हणून देतो. सासरी गेल्यानंतरही बहिणीला भेटता यावे, तिच्यावरचे प्रेम व्यक्त करता यावे यासाठीची ही प्रथा पूर्वापार चालत आलेली आहे. अशा प्रकारे अश्विन महिन्याचे शेवटचे दोन-तीन दिवस आणि कार्तिक महिन्यातील पहिले दोन दिवस असा चार-पाच दिवस दिवाळीचा सण साजरा केला जातो.

आता दिवाळीत तुम्ही छान-छान ड्रेस घालणार. खूप-खूप फटाके उडवणार. भुईचक्र, फुलबाज्या... जरा जपून बरं का! उत्साहाच्या भरात काळजी न घेता फटाके उडवले तर काय होतं हे तुम्हाला माहिती आहे. चुकून गरम-गरम फुलबाजीवर आपला पाय पडतो. एखाद्यावेळी फटाक्याची ठिणगी डोळ्यात जाऊ शकते. काहीवेळा किरकोळ अपघात होतात; पण काहीवेळा हीच गोष्ट गंभीर स्वरूपसुद्धा धारण करू शकते आणि मग मात्र सगळ्यांना मनस्ताप होतो. शिवाय मोठमोठे आवाज करणारे, धूर सोडणारे, कानठळ्या बसवणारे ॲटमबॉम्ब उडवण्यात गंमत वाटते खरी; पण त्याचा वृद्धांना, नुकत्याच जन्मलेल्या तान्ह्या बाळांना, त्यांच्या आयांना, हॉस्पिटलमधल्या आजारी माणसांना, रुग्णांना त्या आवाजाचा किती त्रास होत असेल, याचासुद्धा विचार तुम्ही करायला हवा. खरंतर हा विचार तुमच्या मनात नक्कीच येत असणार कारण तुम्ही सर्व हुशार, कार्यक्षम मुले आहात. दिवाळीच्या निमित्ताने मला तुम्हाला आणखी एक सांगायचे आहे.

म्हणून दोस्तांनो,,, या आपल्या मित्रांना दिवाळीच्या निमित्ताने कुठल्या ना कुठल्या रूपाने मदत केली, तर त्यांनादेखील दिवाळी साजरी केल्याचा आनंद मिळेल. त्यांच्या चेहऱ्यावर उमललेले हसू पाहून आपणसुद्धा इतरांसाठी काही करू शकतो, याची जाणीव तुम्हाला होईल आणि त्यांच्या डोळ्यात चमकणाऱ्या आनंदाच्या ज्योती तुमच्या डोळ्यातही उजळतील. मग होईल तुमची खरी-खरी दिवाळी साजरी..!

मग करणार ना अशी दिवाळी साजरी?

(लेखिका या पुण्यातील बालसाहित्यिक, नामवंत कवयित्री आणि अनुवादिका असून, त्या अ.भा. मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या माजी अध्यक्षा आहेत.)

**कितीही संकटे आली तरी त्यावर मात करून सर्व सण उत्साह व श्रद्धेने साजरा करणे आणि नव्या उमेदीने वाटचाल करणे, हे महाराष्ट्राचे बलस्थान आहे! अतिवृष्टीसारख्या संकटाची पार्श्वभूमी या वर्षीच्या दिवाळीला आहे; पण त्यावर मात करून आपली परंपरा जतन केली जात आहे. दिवाळी म्हणजे आनंद, उत्साह, प्रकाश आणि नात्यांची उब यांचा सुंदर संगम.**

# विविधतेने नटते महाराष्ट्राची दीपावली!

**राजा माने**

भारतभर दिवाळी साजरी करण्याच्या पद्धती वेगवेगळ्या आहेत; परंतु महाराष्ट्रातील दिवाळीला एक खास ओळख आहे. परंपरेची नाळ जपत नव्या काळाशी जुळवून घेतलेली ही दिवाळी खरोखरच आगळीवेगळी आहे. महाराष्ट्राच्या प्रत्येक भागात दिवाळीचा रंग, सुगंध आणि रस वेगळाच दिसतो. कोकण, विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र किंवा खानदेश. प्रत्येक प्रदेशात दिवाळी साजरी करण्याची स्वतःची परंपरा, खाद्यसंस्कृती आणि श्रद्धा आहे.

## (पहिला दिवस) वसुबारस : गायमातेचा उत्सव

दिवाळीची सुरुवात वसुबारस या दिवसाने होते. महाराष्ट्रात याला विशेष महत्त्व आहे, कारण शेतकरी गायमातेचा सन्मान करतात. या दिवशी शेतकरी गाईंची पूजा करून त्यांना हलवा, तूप, गूळ, तांदूळ देतात. काही ठिकाणी गाईंना फुलांचे हार, हळद-कुंकू लावून त्यांची 'आरती' केली जाते. कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात हा दिवस मातृत्वाच्या प्रतीकाप्रमाणे साजरा केला जातो.

## (दुसरा दिवस) धनत्रयोदशी : आरोग्य व संपत्तीचे प्रतीक

या दिवशी लोक धन्वंतरी देवतेची पूजा करतात. वैद्य, डॉक्टर आणि औषधी व्यवसायाशी संबंधित लोक याला विशेष महत्त्व देतात. महाराष्ट्रात अनेक घरांमध्ये या दिवशी सोने-चांदी खरेदी करण्याची प्रथा आहे. काही ठिकाणी हा दिवस यमदीपदान म्हणूनही साजरा होतो. घराच्या प्रवेशद्वाराबाहेर एक लहानसा दिवा लावून यमराजाची कृपा मागितली जाते.

## (तिसरा दिवस) नरक चतुर्दशी : अभ्यंग स्नान – सुगंधी सकाळ

नरक चतुर्दशी म्हणजे महाराष्ट्रातील दिवाळीचा सर्वात सुगंधी दिवस! पहाटे लोक तेलाने अंग मळवतात, उटणे लावतात आणि सुगंधी पाण्याने स्नान करतात. अभ्यंग स्नानानंतर नवीन कपडे घालून देवांची पूजा केली जाते.

खास करून ग्रामीण भागात पहाटेच्या वेळी आकाशात फटाके फोडण्याची प्रथा आहे. लहान मुलांसाठी हा दिवस बटाटा फोडणीचा किंवा फटाक्यांचा दिवस असतो.

## (चौथा दिवस) लक्ष्मीपूजन : आर्थिक समृद्धीचा दिवस

लक्ष्मीपूजन हा दिवाळीचा सर्वात मोठा व भावनिक दिवस मानला जातो. महाराष्ट्रात या दिवशी व्यापारी वर्ग दुकाने सजवून लक्ष्मीमातेची, गणपतीची आणि वहन देवतेची पूजा करतो. गावागावात संध्याकाळी प्रत्येक घरात तेलाचे दिवे, आकाशकंदील आणि फुलांची सजावट केली जाते. कोकणात घराच्या अंगणात रंगोळीचे सुंदर नक्षीदार डिझाइन काढले जाते. काही ठिकाणी स्त्रिया लक्ष्मीची पायवाट काढतात, म्हणजेच ओल्या तांदळाच्या पीठात पायाचे ठसे उमटवून घरात लक्ष्मी प्रवेश करावा, अशी श्रद्धा.

## (पाचवा दिवस) पाडवा : नाती आणि सन्मानाचा दिवस

दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी येतो पाडवा किंवा गोवर्धन पूजा. या दिवशी पती-पत्नी परस्परांना भेटवस्तू देतात. काही ठिकाणी हा



दिवस बलिप्रतिपदा म्हणून साजरा होतो. ज्यात लोक राजा बळीच्या आठवणींना उजाळा देतात.

कोल्हापूर, सांगली आणि पुणे भागात या दिवशी बैलगाड्यांची सजावट करून बैलांची स्पर्धा घेतली जाते. ग्रामीण भागात हा दिवस शेतीशी जोडलेला आहे. शेतकरी बैलांची पूजा करतात आणि त्यांना गूळ-भाकरी खाऊ घालतात.

## (सहावा दिवस) भाऊबीज : स्नेहाचा उत्सव

महाराष्ट्रातील दिवाळीतील सर्वात भावनिक दिवस म्हणजे भाऊबीज. या दिवशी बहिणी आपल्या भावाला घरी बोलावतात, आरती ओवाळतात आणि त्याच्या कपाळावर अभ्यंग तिळक लावतात. बदल्यात भाऊ बहिणीला भेटवस्तू देतो आणि तिच्या आयुष्यभर सुखरूप राहण्यासाठी वचन देतो.

काही शहरी भागांमध्ये आजच्या काळात बहिणी ऑनलाइन भाऊबीज करत असल्यातरी त्यामागच्या भावना प्रेम, आपुलकी आणि कृतज्ञतेने भरलेल्या असतात.



## महाराष्ट्रातील वेगळ्या प्रादेशिक परंपरा

कोकणातील दिवाळी म्हणजे निसर्ग आणि सुगंध यांचा संगम असतो. कोकणात दिवाळीचा सण अतिशय रंगतदार असतो. नारळ, फुलं आणि सुगंधी पानांनी घरांची सजावट केली जाते. पारंपरिक उकडीचे मोदक, घारगे, चिवडा आणि अनारसे हे पदार्थ बनवले जातात.

गावातील लोक समुद्रकिनाऱ्याजवळील मंदिरे उजळवून ठेवतात. काही ठिकाणी मृत पूर्वजांच्या स्मरणार्थ एक दिवा पेटवला जातो.

## विदर्भात शेती आणि सण यांचा मिलाफ

विदर्भात दिवाळी म्हणजे शेतकऱ्यांचा उत्सव. येथे गाई-बैलांसाठी खास सजावट केली जाते. बैलगाड्यांवर फुलांचे हार, झेंडूचे तोरण लावले जातात. फटाक्यांपेक्षा मातीचे दिवे आणि गाण्यांवर जास्त भर दिला जातो. अमरावती, अकोला, यवतमाळ भागात दिवाळीच्या दिवशी झिम्मा-फुगडीचे कार्यक्रम, भजन स्पर्धा आणि रांगोळी स्पर्धा घेतल्या जातात.

## मराठवाड्यात संस्कृती व श्रद्धेचा संगम

छत्रपती संभाजीनगर, बीड, परभणी भागात दिवाळीला धार्मिक छटा असते. येथे किल्ल्यांवर, वाड्यांवर आणि मंदिरांवर दिवे लावून प्राचीन संस्कृतीचे दर्शन घडवले जाते. लोक किल्ल्यांच्या अवशेषांवर दिवे पेटवून राजांच्या गौरवकथांचे नाटक सादर करतात, हे एक अनोखे वैशिष्ट्य आहे.

## सामूहिक उत्सव आणि मैत्रीचा रंग!

कोल्हापूर, सांगली, सातारा भागात दिवाळीला मैत्रिणींचा सण म्हणूनही ओळख आहे. स्त्रिया 'फराळ पार्टी' आयोजित करतात. गाणं, नृत्य, खेळ आणि दिव्यांच्या सजावटीतून आनंदाचा उत्सव साजरा केला जातो. कोल्हापुरात महालक्ष्मी देवीच्या मंदिरात विशेष पूजन केले जाते आणि शहरभर दीपोत्सवाच्या रांगोळ्या पाहायला मिळतात.

## खानदेशातील दिवाळी

धुळे, जळगाव भागात दिवाळीच्या काळात लोकनाट्य, भजन आणि नृत्यस्पर्धा आयोजित केल्या जातात. येथे दिवाळी म्हणजे केवळ घराचा सण नसून गावकुसाबाहेरही एक सांस्कृतिक मेळावा असतो. लोक 'भवई' आणि 'तमाशा' सादर करतात. लोककलांची ही परंपरा आजही जपली जाते.

आज दिवाळीची झळाळी थोडी बदलली आहे. फटाक्यांचा आवाज कमी झाला आहे; पण पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याची जाणीव वाढली आहे.

मुंबई, पुणे, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये दिवाळी फेस्टिव्हल, हस्तकला बाजार, दिवाळी फॅशन प्रदर्शन या नव्या स्वरूपातही साजरी केली जाते, तरीही महाराष्ट्रातील प्रत्येक घरात अजूनही तेलाचा दिवा, सुगंधी उटणे आणि गरम फराळाचा सुवास हा दिवाळीचा आत्मा जपून ठेवतो.

महाराष्ट्रातील दिवाळी म्हणजे परंपरा, प्रेम आणि प्रकाशाचा उत्सव. प्रत्येक प्रदेश, प्रत्येक कुटुंब आणि प्रत्येक हृदय या सणात एकत्र उजळते. गायमातेपासून लक्ष्मीपूजेनंतरच्या भाऊबीजेपर्यंत प्रत्येक दिवस अर्थपूर्ण आणि सांस्कृतिक मूल्यांनी परिपूर्ण असतो. प्रत्येक दिवा एक संदेश देतो, अंधारातून प्रकाशाकडे, द्वेषातून मैत्रीकडे, आणि दुःखातून आनंदाकडे...

संपादक, माध्यम तज्ज्ञ व राजकीय विश्लेषक, मुंबई.

**दिवाळीच्या निमित्ताने लहान मोठ्या अशा सर्व गावांमध्ये, शहरांमध्ये मोठी आर्थिक उलाढाल होते. छोटे-मोठे व्यवसाय करणाऱ्यांना दिवाळीच्या निमित्ताने थोडा फार आर्थिक लाभ होतो. मोठ्या प्रमाणावर व्यापार होतो. वाहने, घरगुती उपकरणे, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, फर्निचर, सोन्या-चांदीचे दागिने, कपडे यांची खरेदी-विक्री मोठ्या प्रमाणात झाली आहे आणि अजूनही सुरू आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्यासुद्धा बाजारपेठेत मोठी उलाढाल होत आहे.**

# सर्वसामान्य जनतेचा आनंदोत्सव

**चिंतामणी सहस्रबुद्धे**

*सूर्ये अधिष्ठिली प्राची।*
*जगा राणीव दे प्रकाशाची।*
*तैशी वाचा श्रोतयां ज्ञानाची।*
*दिवाळी करी।।*

संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानाची दिवाळी व्हावी, सर्वत्र ज्ञानाचा प्रकाश पसरावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. दिवाळीचे एवढे सार्थ प्रयोजन आणि यथार्थ अर्थ आजपर्यंत क्वचितच कोणी सांगितला असेल. दिवाळी हा खरोखरच आनंदाचा, उत्साहाचा आणि प्रकाशाचा असा वार्षिक उत्सव आहे. दैनंदिन जीवनातील सर्व अडचणी अडथळे, समस्या काही काळ बाजूला ठेवून दिवाळी हा उत्सव साजरा केला जातो. लहान, थोर, गरीब, श्रीमंत असे सर्वजण या प्रकाशाच्या उत्सवात सामील होतात. सांगली जिल्ह्यातही हा उत्सव दरवर्षी परंपरेनुसार अत्यंत उत्साहात साजरा होतो.

या वर्षी जिल्ह्याच्या बहुतांश भागात अतिवृष्टीचे संकट आहे. शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. त्यामुळे त्या संकटाच्या छायेतच हा उत्सव साजरा होत आहे. अर्थातच या उत्सवाच्या निमित्ताने आपल्या शेतकरी बांधवांचीही सर्वजण निश्चितच आठवण ठेवतील, अशी अपेक्षा आहे. कारण जिल्ह्याची आजपर्यंतची परंपरा तशीच आहे. आजपर्यंत अशा संकट काळामध्ये संकटग्रस्तांच्या घरीसुद्धा दिवाळी साजरी व्हावी, यासाठी सर्वांनी आपल्या परीने प्रयत्न केले आहेत.

सांगली जिल्ह्यातील पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण अशा सर्व भागांमध्ये हा उत्सव दरवर्षी अतिशय उत्साहाने साजरा होतो. नैसर्गिक संकट, कोरोनासारखी आपत्ती अशा काळामध्ये निश्चितच उत्सवावर थोडाफार परिणाम होतो; परंतु तरीही शक्य तेवढ्या प्रमाणात उत्सव साजरा करायची परंपरा आजपर्यंत टिकून राहिलेली आहे. सांगली, औंध, कुरुंदवाड, जत, मिरज, तासगाव अशा संस्थानांच्या कार्यक्षेत्रात सांगली जिल्ह्यातील बहुतांश भाग समाविष्ट होता. या सर्व संस्थानांच्या कार्यक्षेत्रातही दिवाळीचा उत्सव इतिहास काळातही अत्यंत उत्साहात साजरा होत असे. उत्सवाचे काही संदर्भ काळाच्या ओघात बदलले आहेत. आधुनिकता आली आहे; परंतु वसुबारस, धनत्रयोदशी, नरकचतुर्दशी, लक्ष्मीपूजन, पाडवा, भाऊबीज अशा क्रमानेच दिवाळी साजरी केली जात होती, असे ऐतिहासिक कागदपत्रांवरून स्पष्ट होते.

गेल्या ५० ते ६० वर्षात दिवाळीचे स्वरूप खूपच बदलले आहे. फराळाचे परंपरागत पदार्थ अजूनही कायम आहेत; परंतु त्यामध्ये आता काही नव्या पदार्थांचीही भर पडली आहे. सांगलीसारख्या मध्यवर्ती शहरातसुद्धा १०० वर्षांपूर्वी विजेचे दिवे नव्हते. त्यावेळी कंदील, समई, पणत्या यांचेच महत्त्व होते. साहजिकच दिवाळीच्या काळात विद्युत रोषणाईपेक्षा समई आणि पणत्या यांच्या प्रकाशाचीच रोषणाई अधिक दिसत असे. गेल्या काही वर्षांत दसरा, दिवाळी किंवा गुढीपाडवा या सणांच्या निमित्ताने मोटारसायकल, मोटारी यांची खरेदी वाढली आहे. अगदी ५०-६० वर्षांपूर्वीही दिवाळीच्या वेळी सायकलची खरेदी हीसुद्धा मोठी अपूर्वाईची बाब होती.



सांगली दिवाळीसाठी बाजारपेठेत होणारी मोठी उलाढाल. (सर्व छायाचित्रे : रवी काळेबेरे, सांगली)

दिवाळी हा प्रकाशाचा उत्सव आहे. त्यामुळे तो साजरा करत



असतानाच अनेक व्यक्ती, संस्था, संघटना या उत्सवात ज्यांना दिवाळीचा लाभ मिळत नाही, अशांसाठी अनेक उपक्रम राबवतात. त्यामध्ये अनाथाश्रम, बालसुधारगृह, झोपडपट्ट्या अशा ठिकाणी दिवाळीचा फराळ, दिवे, फटाके असे पोहोचवण्याचा प्रयत्न करतात. विशेष मुलांच्या संगोपनासाठी काही संस्थांकडून भेटकार्ड, पणत्या, आकाशकंदील असे मुद्दाम तयार करून घेतले जातात. त्यामुळे विशेष अशा मुला, मुलींसाठी खरोखरच पुण्याईचे काम करणाऱ्या अशा संस्थांना थोडा आर्थिक दिलासाही मिळतो. गेल्या काही वर्षांत दिवाळीच्या निमित्ताने बालगोपाळ जे किल्ले तयार करतात त्यासाठीच्या स्पर्धाही आयोजित केल्या जातात. त्याचबरोबर 'फटाके टाळा दिवाळी साजरी करा' असे आवाहन करणारा उपक्रमही अनेक जण अमलात आणतात. किमान मोठ्या आवाजाचे फटाके शक्यतोवर वापरू नका असे आवाहन यानिमित्ताने केले जाते.

दिवाळी हा जसा सांस्कृतिक उत्सव आहे, तसाच तो आर्थिक उत्सवसुद्धा आहे. केंद्र सरकारने जीएसटीच्या रचनेमध्ये मोठा बदल करून जनतेला मोठा दिलासा दिला आहे. त्यामुळे या उत्सवाच्या निमित्ताने बाजारपेठेत खरेदी-विक्रीचाही मोठा उत्सव सुरू झालेला आहे. त्याचे प्रत्यंतर आपल्याला ठिकठिकाणच्या बाजारपेठांमध्ये आले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दसरा, दिवाळी सुरू होण्यापूर्वीच जनतेला या उत्सवात मोठ्या उत्साहाने सहभागी होण्याचे आवाहन केले होते केले. या सर्व पार्श्वभूमीवर दसरा, दिवाळीच्या निमित्ताने केवळ स्थानिकच नव्हे, तर संपूर्ण देशातीलच बाजारपेठांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दिवाळीच्या निमित्ताने लहान-मोठ्या अशा सर्व गावांमध्ये, शहरांमध्ये मोठी आर्थिक उलाढाल होते. छोटे-मोठे व्यवसाय करणाऱ्यांना दिवाळीच्या निमित्ताने थोडा फार आर्थिक लाभ होतो. मोठ्या प्रमाणावर व्यापार होतो. वाहने, घरगुती उपकरणे, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, फर्निचर, सोन्या-चांदीचे दागिने, कपडे यांची खरेदी-विक्री मोठ्या प्रमाणात झाली आहे आणि अजूनही सुरू आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्यासुद्धा बाजारपेठेत मोठी उलाढाल होत आहे.

दिवाळीच्या निमित्ताने छोटे मोठे कारखाने, उद्योग यांच्याकडून कामगारांना बोनस दिला जातो. सांगली, मिरज, इस्लामपूर, पलूस, विटा, तासगाव अशा उद्योगधंदे असलेल्या परिसरात बोनस हा विषय महत्त्वाचा ठरतो. साहजिकच दिवाळी खरेदीसाठी कामगारांना त्याचा मोठा फायदा होतो.

सांगली जिल्ह्यात गेल्या काही वर्षांत उसाचे पीक प्रमुख झाले आहे. सहकारी तसेच खासगी साखर कारखान्यांची संख्याही वाढलेली







आहे. या साखर कारखान्याच्या माध्यमातून त्या-त्या भागाचा मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. दिवाळीच्या काळात शेतकऱ्यांनी कारखान्यांना पाठवलेल्या उसाच्या बिलांपैकी काही रक्कम दिवाळीसाठी म्हणून देण्याची सांगली जिल्ह्यात गेल्या कित्येक वर्षांची प्रथा आहे. या वर्षीही जवळजवळ प्रत्येक साखर कारखान्याने शेतकऱ्यांना उसाच्या बिलाची काही रक्कम दिवाळीसाठी म्हणून शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा केली आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांची दिवाळी गोड व्हावी, हा उद्देश त्यामुळे सफल होतो आहे.

सांगली, मिरज, विटा, इस्लामपूर, तासगाव, कवठेमहांकाळ, जत, शिराळा, पलूस, कडेगाव अशा सर्व शहरांमध्ये दिवाळीच्या निमित्ताने फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल होते. या वर्षीही ती झाली आहे. सांगली, मिरज, कुपवाड महापालिकेच्या क्षेत्रातील उलाढाल तर लक्षणीय असते. यामध्ये कापड, वाहने, भांडी, सोन्या-चांदीचे दागिने, सजावटीच्या वस्तू, विद्युत रोषणाईच्या वस्तू, फराळाचे जिन्नस, फटाके अशा अनेक वस्तूंची फार मोठ्या प्रमाणावर खरेदी विक्री होते. साहजिकच बाजारपेठेमध्ये एक प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण होते. यावर्षीही तसेच वातावरण निर्माण झाले.

दिवाळी आणि फराळाचे पदार्थ यांचे नाते वर्षानुवर्षांचे आहे. दिवाळी जवळ आली की, घरोघरी फराळाच्या पदार्थांची तयारी सुरू होते. फराळासाठी लागणाऱ्या विविध कच्च्या मालाची बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर आवक होते. त्यांची विक्रीसुद्धा प्रचंड प्रमाणावर होते. गेल्या काही वर्षांमध्ये फराळाचे तयार पदार्थ विकण्याचा व्यवसाय फार मोठ्या प्रमाणावर विकसित झाला आहे. या फराळाच्या विक्रीलासुद्धा मोठा प्रतिसाद मिळतो. महिला बचतगटही आता दिवाळीच्या काळात पणत्या, आकाश कंदील, फराळाचे तयार पदार्थ यांच्या उत्पादनामध्ये आघाडीवर असतात.

दिवाळीच्या निमित्ताने एस.टी.ची वाहतूकही मोठ्या प्रमाणावर वाढते. एस.टी. महामंडळातर्फे या काळात जादा एस.टी. बसेस सोडल्या जातात आणि त्यांनाही फार मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळतो. एकूण सगळे वातावरण दिवाळीमय बनते. नातेवाईक एकमेकांना भेटतात. सांगली जिल्ह्यातील अनेक गावातील तरुण मुले-मुली शिक्षणाच्या आणि नोकरीच्या निमित्ताने परगावात राहतात. दिवाळीच्या निमित्ताने ते सर्वजण गावाकडे, घराकडे येतात. साहजिकच प्रत्येक कुटुंबामध्येसुद्धा दिवाळीचा आनंद खऱ्या अर्थाने द्विगुणित होतो.

भारतीय संस्कृतीतील सणांमध्ये दिवाळीचे स्थान सर्वात उज्ज्वल आहे. हा सण केवळ प्रकाशाचा नाही, तर आत्मप्रकाशाचा उत्सव आहे. अंधकारावर प्रकाशाचा, असत्यावर सत्याचा आणि अधर्मावर धर्माचा विजय साजरा करणारा. वसुबारसपासून भाऊबिजेपर्यंत पाच दिवसांचा हा सोहळा धार्मिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अशा सर्वच पातळ्यांवर नवे चैतन्य निर्माण करणारा आहे. घराघरातील दिव्यांबरोबरच मनामनातील अंधकार दूर करण्याचा संदेश देत दिवाळी आत्मशुद्धी, ऐक्य आणि मानवतेच्या मूल्यांची नव्याने ज्योत प्रज्वलित करते.

# अंधकारातून प्रकाशाकडे प्रवास...

**उमाजी म. केळुसकर**

भारताच्या सांस्कृतिक परंपरेत वर्षभर अनेक सण, उत्सव साजरे केले जातात; पण या सगळ्या सणांमध्ये दिवाळीचे स्थान अत्यंत वेगळे आणि अनन्यसाधारण आहे. दिवाळी म्हणजे फक्त चार दिवस दिवे लावणे, फटाके फोडणे, मिठाई वाटणे किंवा नवीन कपडे परिधान करणे एवढ्यावर मर्यादित नाही; ती भारतीय समाजजीवनातील सर्वात मोठी सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक पुनर्रचना घडवून आणणारी पर्वणी आहे. ही फक्त प्रकाशाची नव्हे, तर नवचैतन्याची, नवसंकल्पाची आणि आत्मशुद्धीची प्रेरणा देणारी परंपरा आहे.

दिवाळीचा उगम आणि त्यामागील अर्थ या सणाला असलेल्या भावनिक गाभ्याशी निगडित आहे. रामायणातील प्रसंगानुसार भगवान श्रीरामांनी रावणाचा वध करून अयोध्येत परत येताना अयोध्यावासीयांनी दिव्यांच्या प्रकाशात त्यांचे स्वागत केले, तोच दिवस दिवाळी म्हणून ओळखला जातो. या कथेतून 'अंधकारावर प्रकाशाचा विजय', 'असत्यावर सत्याचा विजय' आणि 'अधर्मावर धर्माचा विजय' हे



मूलभूत मूल्य अधोरेखित केले गेले आहे. दिवाळी म्हणजेच आशेचा, न्यायाचा आणि नैतिकतेचा विजय. काळानुरूप ही संकल्पना सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनासोबत अधिक व्यापक झाली आहे.

प्रत्येक धर्म, प्रत्येक समाज दिवाळीचे अर्थ वेगळ्या स्वरूपात घेतो. जैन धर्मात हा दिवस भगवान महावीरांचा निर्वाणदिन म्हणून पवित्र




मानला जातो, तर शीख धर्मात गुरु हरगोबिंद यांची मुक्तता झाल्याच्या दिवसाचे स्मरण म्हणून 'बंदी छोड दिवस' म्हणून साजरा केला जातो. या विविध अर्थांमुळे दिवाळी हा सण भारतीय समाजाच्या धर्मनिरपेक्ष आणि बहुसांस्कृतिक स्वभावाचे जिवंत उदाहरण ठरतो.

दिवाळीचा सण प्रत्यक्षात अनेक दिवस चालणारा आहे आणि प्रत्येक दिवसाला स्वतंत्र धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अर्थ आहे. त्याची सुरुवात वसुबारसने होते. या दिवशी गायींचे पूजन केले जाते. मातृत्व आणि संवर्धनाचे प्रतीक असलेल्या गायींना अन्नदान दिले जाते. नंतर येते धनत्रयोदशी, जी आयुर्वेद आणि आरोग्याचा दिवस आहे. या दिवशी धन्वंतरी देवतेची पूजा केली जाते, कारण आरोग्य हेच खरे धन मानले गेले आहे. लोक या दिवशी सुवर्ण खरेदी करून समृद्धीची सुरुवात करतात.

यानंतर येतो नरक चतुर्दशीचा दिवस, जो दिवाळीच्या धार्मिक तत्त्वज्ञानातील अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. कथेनुसार भगवान श्रीकृष्णांनी या दिवशी नरकासुराचा वध केला आणि पृथ्वीला त्याच्या अत्याचारातून मुक्त केले. हा दिवस अंधकार, अहंकार आणि अधर्मावर प्रकाश, नम्रता आणि धर्माच्या विजयाचे प्रतीक आहे. यालाच छोटी दिवाळी असेही म्हणतात. या दिवशी सकाळी लवकर उठून सुगंधी उटणे लावणे, अभ्यंगस्नान करणे ही परंपरा आहे. शरीराची शुद्धी, मनाची प्रसन्नता आणि आत्मशुद्धी यासाठी हा विधी अत्यंत अर्थपूर्ण मानला जातो. हे स्नान केवळ शरीर धर्मासाठी नाही, तर मनातील 'नरकासुर'-म्हणजेच वाईट प्रवृत्ती, मत्सर, राग आणि लोभ-यांचा नाश करण्याचे प्रतीक आहे.

नरक चतुर्दशीनंतर येते लक्ष्मीपूजनाची रात्र, जी दिवाळीचा सर्वात उजळ क्षण असतो. या दिवशी घराघरांत देवी लक्ष्मीचे पूजन केले जाते. समृद्धी, शांतता आणि सौभाग्य यांची कामना केली जाते. व्यापारी वर्गासाठी हा अत्यंत महत्त्वाचा दिवस असतो. नवीन खातेवही सुरू करून व्यापारातील यशासाठी देवीला प्रार्थना केली जाते. या दिवशी संपूर्ण गाव, शहर, देश प्रकाशाने न्हाऊन निघतो. प्रत्येक घरातील दिवा म्हणजे केवळ सजावट नव्हे, तर अंधकारावर विजयाचे प्रतीक आहे.

दिवाळीचा तिसरा दिवस म्हणजे बलिप्रतिपदा किंवा पाडवा. महाराष्ट्रात हा दिवस पती-पत्नीच्या स्नेहबंधनाचा सण म्हणून साजरा होतो. पत्नी आपल्या पतीला ओवाळते आणि पती तिच्या दीर्घायुष्यासाठी मंगलकामना करतो. नववर्षाची सुरुवात या दिवशी होते आणि 'सुख, शांती, समृद्धी'ची प्रार्थना केली जाते.

दिवाळीचा शेवटचा आणि भावनिकदृष्ट्या अत्यंत हृदयस्पर्शी दिवस म्हणजे भाऊबीज. या दिवशी बहीण भावाला ओवाळते, त्याच्या दीर्घायुष्याची आणि सुखाची कामना करते, तर भाऊ तिचे रक्षण करण्याचा संकल्प करतो. या प्रथेच्या मागे प्रेम, स्नेह आणि कुटुंबातील बांधिलकीची सुंदर भावना आहे. आधुनिक समाजात जिथे नाती तुटत चालली आहेत, तिथे भाऊबीज हा सण बंधुत्व, नात्यांची उब आणि कौटुंबिक ऐक्य यांचे प्रतीक ठरतो. हा दिवस प्रत्येक भावंडाला आपल्या आयुष्यातील नात्यांची किंमत ओळखायला भाग पाडतो.

आर्थिक दृष्टिकोनातून दिवाळी हा सण भारतीय अर्थव्यवस्थेचे इंजिन मानले जाते. शेतकरी आपल्या शेतमालाची विक्री करून नव्या हंगामाची तयारी करतो, व्यापारी नवीन वह्या-खाते सुरू करतात, 'लक्ष्मीपूजन' करून आर्थिक समृद्धीची प्रार्थना करतात, आणि सर्वसामान्य नागरिक नवीन वस्त्र, दागिने, घरगुती वस्तू, वाहने विकत घेतात. या काळात बाजारपेठा चैतन्यमय होतात, रोजगारनिर्मिती वाढते आणि 'खरेदी' हा उपभोग नव्या आर्थिक चक्राला गती देतो. या दृष्टीने पाहता दिवाळी ही केवळ धार्मिक किंवा सांस्कृतिक घटना नसून आर्थिक पुनरुत्थानाचे प्रतीकही आहे.

दिवाळीचे दुसरे महत्त्व म्हणजे सामाजिक ऐक्य आणि कौटुंबिक जिव्हाळा. आधुनिक काळात व्यस्त जीवनशैली, शहरीकरण आणि तंत्रज्ञानाने माणसाला एकाकी केले आहे. दिवाळी मात्र कुटुंबाला पुन्हा एकत्र आणते. आईने बनवलेले फराळ, घराची साफसफाई, सजावट, रांगोळ्या, देवपूजा, भेटवस्तूंची देवाण-घेवाण या सगळ्या गोष्टी नात्यांतील उब पुन्हा जागवतात. वृद्धांना, लहानग्यांना आणि दूर राहणाऱ्या नातेवाईकांनाही या निमित्ताने एकत्र येण्याची संधी मिळते.

दिवाळीचा अर्थ फक्त बाह्य साजशृंगारात नाही. खरी दिवाळी तेव्हा होते, जेव्हा मनातील अंधकार नष्ट होतो. द्वेष, मत्सर, लोभ, अहंकार

आणि राग यांच्या ज्वाळांनी आपली आतली शांतता नष्ट झाली आहे. या अंधकारातून बाहेर पडण्यासाठी दिवाळीचा प्रकाश म्हणजे आत्मपरीक्षणाची संधी आहे. ‘दिवा लागो ज्ञानाचा, जळो अंधार अज्ञानाचा’ हीच खरी दिवाळीची शिकवण आहे. आपल्या आतल्या दोषांना जाळून टाकण्याची, आत्मशुद्धीची आणि नवे संकल्प घेण्याची वेळ म्हणजे दिवाळी.

दिवाळी ही पर्यावरणाच्या दृष्टीनेही एक गंभीर संदेश देते. आज आपण फटाके, प्रदूषण, ध्वनी आणि कचऱ्याच्या समस्येत सण हरवत चाललो आहोत. प्रकाशाचा सण असताना आपण धुराचा सण साजरा करू लागलो आहोत. ही विरोधाभासी स्थिती आहे. आपल्या मुलांच्या आरोग्यावर, निसर्गावर आणि प्राण्यांवर या सर्वांचा विपरित परिणाम होतो. त्यामुळे पर्यावरणपूरक दिवाळी ही केवळ ‘ट्रेंड’ नव्हे, तर जबाबदारी आहे. घरात मातीचे दिवे लावणे, स्थानिक उत्पादकांकडून वस्तू घेणे, आणि शुद्ध आनंदाने सण साजरा करणे, हेच दिवाळीचे खरे सौंदर्य आहे. दिवाळी ही केवळ भारतातच नव्हे, तर संपूर्ण जगात भारतीय ओळखीचा अभिमान बनली आहे. परदेशात राहणारे भारतीय ‘फेस्टिव्हल ऑफ लाईट्स’ म्हणून दिवाळी साजरी करून जगभरात भारतीय संस्कृतीचे तेज पसरवत आहेत. ही परंपरा केवळ धार्मिक विधींपर्यंत मर्यादित राहत नाही, तर सांस्कृतिक राजदूत म्हणून जगात भारताची ओळख निर्माण करते.

आधुनिक समाजात दिवाळीचा अर्थ अधिक व्यापक झाला आहे. आज दिवाळी म्हणजे केवळ घरातील दिवे नव्हे, तर समाजातील उपेक्षित, गरीब, आणि वंचित घटकांच्या जीवनात प्रकाश आणण्याची जबाबदारीही आहे. आपण एखाद्या गरीब मुलाला पुस्तक देऊ शकतो, शेतकऱ्यांच्या मुलांना मदत करू शकतो किंवा वृद्धाश्रमातील लोकांसोबत दिवाळी साजरी करू शकतो. खरा आनंद तेव्हाच मिळतो जेव्हा आपल्या आनंदाचा काही अंश आपण इतरांच्या चेहऱ्यावर हास्य आणण्यासाठी वापरतो.

भारतीय समाजात दिवाळीचा संबंध केवळ धर्माशीच नाही, तर तत्त्वज्ञानाशीही आहे. हा सण आपल्याला सांगतो की, जीवनात प्रकाश आणि अंधकार हे दोन्ही कायम राहणार; पण त्यातही ज्याने प्रकाश निवडला, तोच खरा ज्ञानी. जीवनात संकटे येतात, निराशा येते; पण त्या अंधकारातही जो आशेचा दिवा पेटवतो, तोच यशस्वी ठरतो. म्हणूनच दिवाळी ही केवळ कॅलेंडरवरील तारीख नाही, ती मानसिक आणि आत्मिक स्थिती आहे जी आपल्याला प्रत्येकवेळी नव्याने उठायला शिकवते.

आजच्या काळात जेव्हा जगभर संघर्ष, अस्थिरता आणि तणावाचे वातावरण आहे, तेव्हा दिवाळीचा संदेश अधिक महत्त्वाचा ठरतो. ती आपल्याला सांगते की, हिंसेपेक्षा प्रेम श्रेष्ठ, लोभावर समाधान श्रेष्ठ, आणि द्वेषावर क्षमा श्रेष्ठ आहे. समाजातील एकोपा, सामंजस्य आणि परस्पर सहकार्याच्या मूल्यांना दिवाळी नव्याने उजाळा देते.

दिवाळी म्हणजे अखंड चैतन्य, अखंड प्रेरणा. ती भूतकाळाच्या आठवणींना उजळवत वर्तमानाला नव्या ऊर्जेने परिपूर्ण करते आणि भविष्याकडे आशेने पाहायला शिकवते. तिच्या प्रकाशात माणूस स्वतः ला ओळखतो, आपल्या समाजाशी नातं जोडतो, आणि विश्वाशी समरस होतो.

म्हणूनच दिवाळीचा खरा अर्थ हा केवळ सण साजरा करणे एवढाच नाही; ती आहे आत्मजागर, ती आहे कृतज्ञतेची अभिव्यक्ती, ती आहे माणुसकीच्या मूल्यांना पुन्हा उजळवणारा क्षण. दिवाळीचा प्रत्येक दिवा आपल्याला स्मरण करून देतो की, अंधकार कितीही दाटला तरी एका छोट्याशा ज्योतीनेही प्रकाश पसरवता येतो आणि तो प्रकाश म्हणजेच सत्य, ज्ञान, प्रेम आणि करुणा याच चार गोष्टी दिवाळीच्या तेजाचा खरा आधार आहेत.



दिवाळी म्हणूनच केवळ एक सण नाही, तर ती जीवन तत्त्वज्ञान आहे, जे शिकवते की, प्रत्येक अंधकारानंतर प्रकाश असतो. प्रत्येक शेवट म्हणजे नव्या सुरुवातीची नांदी असते. म्हणूनच आपण म्हणतो, अंधकारातून प्रकाशाकडे, अज्ञानातून ज्ञानाकडे, असत्यातून सत्याकडे, हीच दिवाळीची खरी साधना आणि तिचे अनंत महत्त्व...

रायगड-अलिबाग.

**लोकसाहित्य हे समाजाच्या सांस्कृतिक जीवनाचे जिवंत दर्पण आहे आणि त्यातील ओवीगीते ही स्त्री–मनाचा सहज, स्वाभाविक आणि हृदयस्पर्शी आविष्कार आहेत. जात्यावर दळण दळताना उमटलेली ही ओवी म्हणजे श्रमगीत नव्हे, तर स्त्रीच्या भावविश्वाची कविता आहे. सण, संस्कृती, नातेसंबंध आणि जीवनानुभवांचा कोमल गुंफलेला पट ओवीतून दिसतो. विशेषतः दिवाळी सणाच्या ओव्या या बहीण–भावाच्या नात्यातील प्रेम, ओढ, आठवणी आणि आत्मीयतेने ओतप्रोत आहेत. या ओव्या केवळ गाणी नसून आपल्या लोकसंस्कृतीचा अमूल्य ठेवा आणि मराठी स्त्रीच्या आत्म्याचा स्वर आहेत.**

# ओवीगीतातील दिवाळी!

**प्रा. डॉ. जयद्रथ सुभाषराव जाधव**

लोकसाहित्य हे आपल्या संस्कृतीचा ठेवा असून लोकभाव लोकसाहित्याचा आत्मा असतो. मौखिक परंपरेने चालत आलेला हा प्रवाह सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा इतिहास आहे. लोकसाहित्याच्या लोकवाङ्मयात लोककथा व लोकगीत हे दोन मुख्य प्रकार असून अनेक प्रकारच्या लोकगीतांना स्त्रियांनी अजरामर केले आहे. त्यात जात्यावरच्या ओवीगीतांचा भरणा अधिक आहे. ओवीगीत म्हणजे स्त्री-मनाचा सहज उद्‌गार आहे, स्त्री-मनाचा हुंकार आहे. जात्यावर बसले की, ओवी सुचते हे यामुळेच म्हटले जाते. सहजता ही ओवींची खरी ओळख आहे. स्त्रियांच्या मनाचा अस्सल आत्माविष्कार म्हणजे ओवी आहे. 'ज्या वाङ्‌मयात स्त्रियांनी आपला आत्मा संपूर्णपणे ओतला ती म्हणजे ओवी होय', असे साने गुरुजींनी म्हटले आहे.



ओवी हा लोकलयीतून, लोक जाणिवेतून विकसित झालेला छंद आहे. मराठी साहित्याचा प्रारंभ मौखिक ओवी वाङ्‌मयातून झालेला आहे. म्हणूनच याचा प्रभाव कवी मुकुंदराज, महानुभाव व संतांच्या साहित्यावर दिसून येतो. जात्यावरची ओवी ही साडेतीन चरणी, चार चरणी आणि साडेचार चरणामधून गायिली जाते. ओवी हे श्रमगीत आहे. दळण कांडण करताना श्रम हलके वाटावे, म्हणून ओवी म्हटली गेलेली आहे. प्रत्येक ओवी ही स्वतंत्र व स्वयंपूर्ण असते, तशीच ती प्रत्येक वेळी नवा आविष्कार असते. म्हणून ओवीला एक प्रयोगात्म लोकाविष्कार म्हटले आहे. कारण ती प्रत्येक वेळी वेगवेगळ्या लय आणि चालीतून म्हटली जाते.

समाजजीवनाची गाथा म्हणजे ओवी आहे. मानवी नातेसंबंध, सामाजिक सहसंबंध, मानवी आचार-विचारांचे, धार्मिक वृत्ती-प्रवृत्तीचे, सण-समारंभ व उत्सवाचे सहजतेने चित्रण ओवीत आहे. यामुळेच स्वाभाविक उर्मीतून ओवी जन्माला येते. मराठी संस्कृतीचे दर्शन ओवीतून होते. जात्याच्या लयीबरोबर ओवी गाणारी स्त्री शीघ्र कवयित्रीच आहे. ती निरक्षर आहे, परंतु ती अडाणी नाही. तिचे एक स्वतंत्र आत्मभान आहे. हे आत्मभान संस्कारातून, अनुभवातून, निरीक्षणातून आलेले आहे. त्यात जीवनानुभवाचे मर्म आहे. कौटुंबिक आचार-विचार, नात्यागोत्याची माया आणि गुंतागुंत, सामाजिक रितीरिवाज, लोकरूढी व परंपरा, सण-समारंभ, व्रतवैकल्ये व उत्सवाच्या परंपरा आणि कुलधर्म-कुलाचाराची जाणीव यात आहे. ती कुटुंब, समाज व संस्कृतीशी अंतर्बाह्य एकरूप झालेली आहेत. या संस्कृतीने तिचे भावविश्व घडविलेले आहे. धार्मिक ग्रंथांचे तिचे म्हणून एक स्वतंत्र आकलन आहे. यामुळे जात्यावर ओवी गाणारी स्त्री प्रतिभावान कवयित्रीच आहे. जात्यावरच्या ओव्या आपण जर नीट तपासून पाहिल्या, तर त्या उत्तम कविता आहेत. पारंपरिक स्त्रियांनी जात्याला साक्षी ठेवून विपुल ओवीगीते निर्माण केलेली आहेत.

जात्यावरच्या ओवीतून जसे कौटुंबिक नात्याचे भावदर्शन दिसून येते, तसेच सण-समारंभाचे चित्रणही दिसून येते. समाजजीवन हे लोक उत्सव, लोक भावनेने उजळून निघालेले आहे. हीच आपली लोकसंस्कृती आहे. लोकसंस्कृतीचे खरे मूलाधार सण आणि उत्सव आहेत. यामागे जसा आनंद आहे. तसेच निसर्ग, प्राणी, पशु-पक्ष्यांशी एकरूप होणे आहे. म्हणून ऋतुमानाप्रमाणे अनेक सण-समारंभ आपण साजरे करतो. या सणांना सामाजिक, धार्मिक आधार दिलेला दिसून येतो. भारतीय नववर्ष गुढीपाडव्याला सुरू होते. यानंतर नागपंचमी, पोळा, रक्षाबंधन, महालक्ष्मी, दसरा, दिवाळी, संक्रांत व होळी असे अनेक सण आपण साजरे करतो. या सणांविषयी स्त्रियांनी असंख्य ओव्या गायिलेल्या आहेत. या ओव्यातून सण-समारंभाचे दर्शन घडते. म्हणून ओवी म्हणजे आपल्या सांस्कृतिक इतिहासाचे स्वरूप आहे. भारतीय सणांमध्ये दिवाळी सण सर्व सणांचा राजा समजला जातो. दिवाळी सणाचे अनेक अंगांनी वर्णन जात्यावरच्या ओवीतून स्त्रियांनी केले आहे. आनंदाने, उत्साहाने हा सण साजरा करताना सासरी नांदणाऱ्या लेकीची, बहिणीची आठवण होणे शक्य आहे. या सणाला भावाने बहिणीला माहेरी आणावे, ही परंपरा आहे.

*सनामंधी-सण, सण दिवाळीचा मोठा,*
*चलत्यात चारी वाटा, बहिण भावंडाच्या...*

किंवा

*माझ्या गं दारावून घुंगराच्या गाड्या गेल्या,*
*भावानं बहिणी नेल्या दिवाळी सणाला...*

दिवाळी सणापूर्वीची ही लगबग ओवीत अशी व्यक्त होते. दिवाळीची बोलावणी पाठवताना आवड-निवड केली जात नाही, परंतु आई-वडिलांची नजर दूरदेशी नांदणाऱ्या, परिस्थितीने गांजलेल्या व मानाने थोरल्या लेकी-बहिणीवर अधिक असते.

*सणामध्ये सण,*
*सण दिवाळी थोरली,*
*बहीण बोलवा दुरली*

दसरा सण संपताच बहिणीला माहेरच्या बोलावण्याची आस लागते.

*दसरा दिवाळी, एका महिन्यात दोन सण*
*वाट पाहते तुझी,*
*लाडाची बहीण*

अशा ओव्यातून स्त्री आपल्या मनातील सुप्त मनोभाव व्यक्त करते.

आई-वडिलांच्या नंतर भाऊ आपल्या संसारात मग्न होतो. आपापल्या लेकीबाळीत गुरफटतो अन् बहिणीचा विसर पडतो. बहिणीची आठवण भावाला राहत नाही; पण बहीण मात्र भावाच्या आठवणीने व्याकुळ होते. प्रसंगी अनेकांकडून निरोप देते. तो मनोभाव व्यक्त करताना बहीण म्हणते,

*दसऱ्यापासून दिवाळी विसदिशी,*
*सख्ख्या बंधुराया मला घ्यायला कधी येशी*

या ओवीत सख्ख्या बंधुराया असे म्हटले आहे. याचा अर्थ मी सावत्र बहीण नसून सख्खी बहीण आहे आणि मला दिवाळी सणाला बोलावणे हे हक्काचे आहे. भावाची वाट पाहण्यात दिवाळी साजरी होते. बहीण सासरीच राहते, परंतु तिचे मन मात्र माहेरी असते. मुराळी म्हणून भावाचे बोलावणे का आले नसावे याचा ती विचार करताना म्हणते,

*वळवाच्या पावसाची वड्या खोऱ्याला साठवण,*
*बंधुला झाली लेक,*
*नाही बहिणीची आठवण*

किंवा

*लिंबाच्या लिंबोळ्या लिंबाखाली पसरल्या,*
*भावाला लेकी झाल्या बहिणी त्यांनी विसरल्या*

हे बहिणीचे निरीक्षण अत्यंत उत्तम आणि वास्तवाची जाणीव करून देणारे आहे.

या दोन ओव्यांमधून व्यक्त केलेले निरीक्षण चिंतनशील आहे. बहीण भावाच्या नाते संबंधाचा दुरावा उलगडून सांगितला आहे. पंचमी व दिवाळीचा सण सासुरवाशीण स्त्रीसाठी फार महत्त्वाचा असतो. या सणाला ती माहेरला जाण्यासाठी आतुर असते.

*सांगते रे बंधुराया,*
*बारा सणाला नको येऊ,*
*आली वर्षाची दिवाळी,*
*वाट बघायला नको लावू...*

वर्षातून एकदा येणाऱ्या दिवाळी सणाला तिला यावेसे वाटणे, यात काही गैर नाही. माहेरला येणे हा सासुरवाशीण स्त्रीसाठी मोठा विसावा असतो. सुखदुःखाची देवाणघेवाण असते. माहेरच्या माणसांच्या गाठीभेटी असतात. भावाची नाजूक परिस्थिती ओळखून असते.

*करनी रे धरनीची,*
*नाही रे मी असोसी,*
*बंधू माझे राजस,*
*तुम्ही सुखी मी संतोषी*

माहेरच्या करनीपेक्षा भाऊ सुखात राहणे, हे बहिणीला महत्त्वाचे वाटते.

जात्यावरच्या ओवीतून स्त्रियांच्या वाट्याला आलेले दुःख अनेक पदरी आहे. सासरी नांदणाऱ्या स्त्रियांच्या आशा आकांक्षा, आवडी-निवडी पूर्ण करण्यासाठी ती माहेरची अपेक्षा ठेवते. तिच्या गरजांची पूर्तता करणे ही जबाबदारी माहेरच्या माणसावरच असते, असा समज आहे. ती सासरे नांदते, ती कुटुंबासाठी अहोरात्र कष्ट करते, परंतु तिला आवडलेली साडीचोळीविषयी ती सासरच्या माणसांकडे बोलत नाही, तर ते आपल्या भावाला ओवीतून सांगताना म्हणते,

*चोळ्यावर चोळ्या घालून झाल्या जुन्या,*
*बंधुजी किती सांगू?*
*दोन्ही दिवाळ्या गेल्या सुन्या...*

या ओवीतून सासुरवाशीण स्त्रीची मनोव्यथा स्पष्ट होते.

दिवाळी सणात भाऊबिजेला खूप महत्त्व आहे. भाऊबिजेवर असंख्य ओव्या आहेत. या ओव्यातून भाऊ-बहिणीच्या नात्याचा मनोभाव प्रगट होतो. या संबंधांना वेगवेगळ्या भावनेची किनार लाभली आहे.

*भावाला भाऊबीज करते, भाच्याला दिवाळी*
*पुतळ्याची माळ, ताठी घालतो पिवळी*
*भावाप्रमाणे भाच्याचे कौतुक बहिणीला असते.*
*दिवाळीच्या दिवशी, माझ्या परातीत हार,*
*ओवाळीते सावकार माझ्या मातेचं बाळ...*

जात्यावरच्या ओवीचे वैशिष्ट्य म्हणजे नात्याचा प्रचंड गौरव दिसून येतो. ओवीत येणारे भाऊ बाप, भाचा ही पात्रे आत्मप्रौढीपूर्वक रंगवली आहेत. म्हणून भावाला सावकार, वकील, पाटील, मारवाडी अशा उपमा देते.

*दिवाळीच्या दिवशी बहीण भावाला ओवाळीती,*
*लुगड्याची घडी भाऊ घालितो ताटी*

बहिणीला ओवाळणी म्हणून भाऊ तिच्या पसंतीची करणी करून बहिणीचे मन आनंदी ठेवतो.

*दिवाळी बाई तुझं बिगी-बिगी येणं,*
*भाऊ भाच्चेयाचं कुळं, उजवाया जाणं*

बहिणीने दिवाळीला माहेरी जाणे म्हणजे बंधूंच्या कुळाचा उद्धार होतो. बंधूच्या शेतीबाढीचे, मान-सन्मानाचे, बुद्धिचातुर्याचे कौतुक करणे असते. दिवाळी भेट म्हणजे भाऊ-बहिणीच्या नात्यांमध्ये गोडवा पेरण्याचे काम असते. भाऊ बहिणीचा ऋणानुबंध अधिकाधिक वृद्धिंगत करण्याचा मानस असतो. काळ बदलला, साधने बदलली, कुटुंब लहान झाली, परंतु यातून दिवाळीच्या निमित्ताने स्त्रियांनी व्यक्त केलेली भावना मात्र कमी झालेली नाही. लोकसाहित्याचा हा महत्त्वाचा गुण आहे.

लोकसाहित्य लोकांच्या भावनेशी अस्सलपणे जोडलेले आहे. पुढेही काळ बदलेल; परंतु त्यातला मनोभाव मात्र तोच असेल.

शिवाजी महाविद्यालय, रेणापूर.

**दिवाळी हा प्रकाशाचा सण आहे, जो अंधारावर प्रकाशाचा आणि वाईटावर चांगल्याचा विजय दर्शवतो. मराठीतील 'दिवाळी' या शब्दाची उत्पत्ती संस्कृतमधील 'दीपावली' या शब्दापासून झाली आहे. दीप: याचा अर्थ 'दिवा' किंवा 'प्रकाश'. आवली : याचा अर्थ 'रांग' किंवा 'ओळ'. म्हणजेच, दीपावलीचा अर्थ 'दिव्यांची रांग' असा होतो. मराठी भाषेत उच्चारण सुलभतेसाठी आणि बोलीभाषेतील वापरात 'दीपावली'चे रूपांतर 'दिवाळी' असे झाले आहे.**

# तमसो मा ज्योतिर्गमयः

**विवेक सयाजीराव सौताडेकर**

दिवाळी हा सण अनेक देशांमध्ये व विविध धर्मीय लोक साजरा करतात हे विशेष! दिवाळी हा सण साधारणपणे सहा दिवस चालतो. या काळात लोक घरे स्वच्छ करतात, दिव्यांची आरास करतात, रांगोळी काढतात, नवीन कपडे घालतात, पणत्या आणि आकाशकंदील लावतात. अश्विन पौर्णिमा (कोजागिरी पौर्णिमेला) प्रत्येकाच्या घरावर आकाश कंदील लावले जातात. ते आकाश कंदील कार्तिक पौर्णिमेपर्यंत ठेवतात. तुलसी विवाह हासुद्धा या सणाचा मुख्य भाग आहे. दिवाळीच्या प्रत्येक दिवसाचे पौराणिक महत्त्व आख्यायिकेच्या माध्यमातून सांगितले जाते.

## वसुबारस

या दिवसाला 'गोवत्स द्वादशी' असेही म्हणतात. याला ग्रामीण भाषेत गाय-गोऱ्याची बारस असेही म्हणतात. आपला देश हा कृषिप्रधान आहे. त्यामुळे पूर्वीपासून आपल्या देशात गो-धनाला खूप महत्त्व आहे. पूर्वीच्या काळी संपूर्ण अर्थव्यवस्था ही शेती आणि गो-धनावर आधारित होती. गो-धनाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस.

वसुबारसेच्या दिवशी गुरांच्या गोठ्याची स्वच्छता, रंगरंगोटी, जनावरांची सजावट, गोठ्यांमध्ये संध्याकाळी पणत्यांची आरास करून गुरांना ओवाळतात, पुरणपोळीचा किंवा दही-भाताचा नैवेद्य दिला जातो. जोंधळे, किंवा बाजरीत गूळ कालवून ते गायींना खाऊ घातले जाते. वसुबारसेच्या निमित्ताने गायींच्यासमोर -

*दिन दिन दिवाळी, गाई म्हशी ओवाळी ।*
*गायीचा चारा, बैल नवरा । गाई कुणाच्या लक्ष्मणाच्या ॥*

अशाप्रकारची गाणी म्हणण्याची परंपरा मराठवाड्यात ग्रामीण भागात आजही प्रचलित आहे.

## धनत्रयोदशी

धनत्रयोदशी हा आरोग्यदेवतेचे स्मरण करण्याचा, तिच्या प्रति ऋण व्यक्त करण्याचा आणि दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करण्याचा दिवस! समुद्रमंथनामधून समुद्रातून आरोग्याची देवता मानल्या गेलेल्या धन्वंतरीचा पाचवे रत्न म्हणून लाभ झाला. या धन्वंतरीचा हा उत्सव होय.





## नरक चतुर्दशी

नरक चतुर्दशी म्हणजे दिवाळीचा तिसरा दिवस. याच दिवशी श्रीकृष्णाने नरकासुराचा वध केला. या विजयाच्या प्रीत्यर्थ हा दिवस आनंदाने साजरा केला जातो, असेही म्हटले जाते.

नरक चतुर्दशी या दिवशी सूर्योदयापूर्वी तेल आणि उटणे लावून अभ्यंगस्नान केले जाते. स्नान करतेवेळी मराठवाडा भागामध्ये 'पिसुळा' नावाची वनस्पती पायाखाली चिरडली जाते. हे नरकासुराच्या वधाचे प्रतीक मानले जाते. अभ्यंगस्नानाच्या वेळी यमाचे तर्पण, नरकभय निवारणाकरिता एक दिवा लावणे, रात्री दिव्यांची आरास करणे, नवीन वस्त्रे परिधान करून आतषबाजी करणे, असे या सणाचे स्वरूप आहे.

## लक्ष्मीपूजन (आश्विन अमावास्या)

आश्विन कृष्ण अमावास्या हा दिवस लक्ष्मीपूजन म्हणून साजरा होतो. रावणाचा वध करून भगवान राम अयोध्येला परतले म्हणूनही हा दिवस साजरा केला जातो, अशी आख्यायिका आहे. या दिवशी भल्या पहाटे उठून अभ्यंगस्नान करतात. सामान्यतः लक्ष्मीपूजन संध्याकाळी करण्याची प्रथा आहे. लक्ष्मी आणि कुबेराची पूजा मांडली जाते.

लक्ष्मीपूजन हा दुकानदार व्यापारी-उद्योजक यांच्यासाठीही मोठा सण आहे. या दिवशी जमा-खर्चाच्या वह्यांची पूजा केली जाते. हिशेबाची जुनी खाती बंद करण्यात येतात आणि नवीन खाती उघडली जातात. व्यापारी वर्षाचा हा अखेरचा दिवस मानला जातो.

## बलिप्रतिपदा (पाडवा)

या दिवशी बलीराजाची पूजा केली जाते आणि पती-पत्नी एकमेकांना शुभेच्छा देतात. अलीकडच्या काळात कायद्यानुसार एप्रिल ते मार्च हे व्यापारी वर्ष ठरवण्यात आल्याने सर्व व्यापारी-उद्योजकांना त्याच पद्धतीने हिशेब ठेवावे लागतात. त्यामुळे पारंपरिक कार्तिक ते आश्वीन या व्यापारी वर्षाचे औचित्य उरलेले नाही. तरीही पारंपरिक पद्धतीनुसार, लक्ष्मीपूजनाच्या दिवशी हिशेब वह्यांचे पूजन आणि बलिप्रतिपदेला नवे व्यापारी मुहूर्त ही प्रथा पाळली जात आहे. विक्रम संवत इसवीसनपूर्वी ५६ वर्ष सुरू झाले, असे मानले जाते. महावीर संवतानुसारही नवे वर्ष याच दिवशी सुरू होते.

### कार्तिक शुक्ल द्वितीया (भाऊबीज)

कार्तिक शुक्ल द्वितीया हा दिवस भाऊबीज म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. भाऊ आणि बहीण या नात्यामधला जिव्हाळा, प्रेम, आत्मियता व्यक्त करण्याचा हा दिवस. या दिवसाला भ्रातृद्वितीया किंवा यमद्वितीया असेही म्हटले जाते. भाऊबिजेच्या दिवशी भाऊ-बहिणीला भेटायला जातो. बहीण-भावाला औक्षण करते त्याला करदुडा, पान-सुपारी व हातावर साखर देते. याप्रसंगी भाऊ-बहिणीला ओवाळणी म्हणून साडी-चोळी किंवा कुठलीही वस्तू देतो.

### शेणाच्या गवळणी घालण्याची प्रथा

दिवाळीच्या या पाच दिवसांमध्ये अंगणात शेणापासून मानवी आकृत्या बनविल्या जातात. ज्यात शेती संस्कृती, ग्रामीण जीवन आणि पाणी भरणाऱ्या, स्वयंपाक करणाऱ्या आणि बाजार मांडून बसलेल्या स्त्रियांची रूपे तयार केली जातात. स्त्रियांच्या दैनंदिन



जीवनाचे प्रतिनिधित्व करतात. यात पारंपरिक गवळणींमध्ये शेणाचे गोकुळ मांडले जाते. या गोकुळात गवळणी, कृष्ण, बळीराजा, पांडव आणि पेंद्या यांसारखी पात्रे तयार केली जातात. विधीपूर्वक पूजा करून या गवळणींचे पूजन केले जाते. मराठवाड्यासह अनेक ग्रामीण भागात आजही ही प्रथा सुरू आहे.

*सण दिवाळीचा आला । नामा राउळासी गेला ॥ १ ॥*
*हाती धरूनी देवासी । चला आमुच्या घरासी ॥ २ ॥*
*देव तेथुनी चालिले । नामयाच्या घरा आले ॥ ३ ॥*
*गोणाईनें उटणें केलें । दामाशेटीनें स्नान केलें ॥ ४ ॥*

जनाबाईंनीही आपल्या या अभंगाच्या माध्यमातून दिवाळीचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

### दिवाळीचा फराळ

दिवाळी आणि फराळ हे नाते पूर्वापार चालत आले आहे. गव्हाचे पीठ, मैदा, गूळ, तांदूळ, साखर, तेल आणि मसाल्याच्या पदार्थांपासून गोड, तिखट आंबट असे कित्येक पदार्थ खाण्यासाठी बनवले जातात. यात प्रामुख्याने बुंदीचे लाडू, रव्याचे लाडू, बेसनाचे लाडू, वळीव लाडू ,शंकरपाळी, चकली, करंजी, अनारसे, खोबरा चिक्की, बेसन चिक्की, गुलाब जामून, खव्याची चिक्की, खांडवा, शेवयाचा भात, काटी कुंडुळे, शेव, चुरमुरे चिवडा, पोह्यांचा चिवडा, फुलवलेल्या पोह्यांचा, पापड, कुरवडी यांसारख्या पदार्थांचा समावेश असतो. दिवाळीच्या आनंदात भर घालतात.

### तुलसी विवाह

यावेळी तुलसी वृंदावन सजावट, पणत्यांची आरास, मंगलाष्टके, वस्त्रमाळ, हिरव्या बांगड्या, उसाची फांदी, आवळा या साहित्यांसह तुळशीचे औक्षण करून फटाक्यांच्या आतिशबाजीमध्ये मानवी विवाहाप्रमाणे तुलसी विवाह या भागामध्ये साजरा केला जातो.

### शिखधर्मीयांची दिवाळी

दिवाळीच्या दिवशीच १५७७ साली सुवर्णमंदिराचा पायाभरणी समारंभ झाला होता. १६१९ साली गुरु हरगोविंद यांची ग्वाल्हेरच्या तुरुंगातून मुक्तता झाली, तेव्हा दिवाळीच होती. तेव्हापासून त्यांच्या स्वागतासाठी सुवर्णमंदिरात दिव्यांची रोषणाई करण्याची प्रथा यापुढेही कायम ठेवली आहे.

### जैनधर्मीयांची दिवाळी

मराठवाडा भागामध्ये दरवर्षी कार्तिक अमावस्येला जैन बांधव भगवान महावीरांचा निर्वाण दिन जैन मंदिरामध्ये पहाटेच्या वेळी भगवान महावीरांच्या चरणी एक लाडू अर्पण करतात, त्याला 'निर्वाण लाडू' असे म्हणतात. या दिवशी जैनधर्मीयांचा चातुर्मास संपतो, म्हणूनही त्याला महत्त्व आहे. अशा प्रकारे लातूरसह सबंध मराठवाड्यात सर्व धर्मीयांमध्ये दिवाळी हा सण साजरा केला जातो.

(लेखक हे लातूर जिल्हा शासकीय इतिहास संशोधक मंडळाचे सदस्य आहेत.)

**भारतीय संस्कृतीत सण म्हणजे केवळ उत्सव नव्हे, तर सामाजिक ऐक्य, कौटुंबिक जिव्हाळा आणि संस्कारांचा संगम आहे. त्यातही दिवाळी हा सण सर्वात तेजस्वी, सर्वाधिक व्यापक आणि सर्वाधिक भावस्पर्शी आहे. अंधारावर प्रकाशाचा विजय, दुःखावर आनंदाचा आणि अन्यायावर न्यायाचा सण म्हणून दीपावलीतून आपल्याला जीवनात आशा, श्रद्धा आणि सामाजिक ऐक्य व जबाबदारी यांचा संदेश मिळतो.**

# मराठवाड्याचे सांस्कृतिक संचित

**भैरवनाथ कानडे**

मराठवाड्याची भूमी ही केवळ तपश्चर्येची आणि भक्तीची नाही, तर कष्ट, श्रम, मातीचा सुवास आणि शेतीप्रधान जीवनशैलीने नटलेली आहे. तुळजापूरसारख्या पवित्र भूमीत दिवाळी हा फक्त सण नसून, तो शेतकऱ्याच्या श्रमाला आलेल्या फळाचा, भक्ताच्या श्रद्धेला मिळालेल्या तेजाचा आणि समाजाच्या एकतेला लाभलेल्या आनंदाचा उत्सव आहे.

दिवाळीच्या आगमनाने गावागावांत उत्साहाचे नवे रंग भरतात. शेतीतील पीक काढणीचे दिवस, सुगीचे दिवस सुरू होतात. अंगणात धान्याच्या राशी सजतात, घराघरांत नवीन धान्याचा सुवास दरवळतो. गायी-बैलांचे पूजन केले जाते, कारण त्यांनी वर्षभर शेतकऱ्याच्या



श्रमात साथ दिलेली असते. पशुधन पूजनानंतर शेतकरी कृतज्ञतेने त्यांच्या कपाळी हळदकुंकू लावतो, गळ्यात माळ बांधतो. त्या क्षणी देव, निसर्ग आणि श्रम यांचा सुंदर संगम अनुभवास येतो.



घराघरांत फुला-पानांच्या तोरणांनी दारे सजवली जातात. अंगणात रांगोळ्या उमटतात, मातीचे किल्ले बांधले जातात, ज्यात बालकांच्या कल्पकतेसोबत स्वराज्य स्थापनेच्या पराक्रमाची परंपरा जोपासली जाते. दिवाळी म्हणजे फक्त प्रकाशाचा उत्सव नाही, तर जीवनातील श्रम, श्रद्धा, संस्कृती आणि आनंद यांचा एकत्रित सोहळा आहे.

मराठवाड्यातील दिवाळी हा केवळ घराघरातील दीपोत्सव नाही, तर भौगोलिक विविधता, सामाजिक सहभाग आणि सांस्कृतिक वैभव यांचा अप्रतिम व अद्वितीय संगम आहे. विशेषतः धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर येथे आई तुळजाभवानीच्या पावन मंदिरातील दीपोत्सव या सणाला अद्वितीय धार्मिक आणि सांस्कृतिक आयाम प्रदान करतो. येथे प्रत्येक दीपमाळा, प्रत्येक विधी, प्रत्येक भक्तांचा उत्साह मराठवाड्याच्या सांस्कृतिक आत्म्याचा आरसा आहे.

आई तुळजाभवानी महाराष्ट्राची कुलस्वामिनी मानली जाते. तुळजापूर येथे श्री तुळजाभवानी मंदिराचा इतिहास शतकांपर्यंत पसरलेला असून, दीपोत्सव धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि भौगोलिकदृष्ट्या अद्वितीय अनुभव देतो. मंदिर परिसर दिवाळीत प्रज्वलित दीपमालिकांनी उजळतो आणि भक्तांची उपस्थिती, हळदीकुंकूचा सुगंध, पारंपरिक विधी, पारंपरिक वाद्यांचा ध्वनी आणि सामूहिक पूजा दीपोत्सवाला धार्मिक भक्ती व सांस्कृतिक अनुभव दोन्ही प्रदान करतो. या सर्व सोहळ्याला वेगळे रूप मिळते. कारण येथे तुळजाभवानीच्या कृपेचा तेजस्वी प्रकाश दरवर्षी दीपोत्सवात उजळून निघतो. मंदिरात देवीची विशेष पूजा, आरती आणि दर्शनासाठी असंख्य भाविक गर्दी करतात. तुळजाभवानी मंदिर परिसर सुवर्णदीपांनी झळाळतो, आकाशात फटाक्यांचा गजर, संबळाचा कडकडाट होतो आणि संपूर्ण तुळजापूर श्रद्धा, आनंद आणि भक्तिभावाने ओथंबून जाते.

भक्तांच्या उपस्थितीत लोकसंस्कृती 'कीर्तन व भजन संध्या' आयोजित केल्या जातात. लोककला, कविसंमेलन, लोकनृत्य आणि नाट्यप्रयोग या माध्यमातून परंपरा आणि सांस्कृतिक वैभव जपत हा उत्सव सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्यादेखील समृद्ध बनतो. स्थानिक स्त्रिया फराळ तयार करतात, रांगोळी काढतात आणि घरगुती कंदील सजवतात, तर पुरुष आणि युवक मंदिरातील सामाजिक उपक्रम आणि वातावरण व्यवस्थापनात सहभागी होतात. वृद्धाश्रम, अनाथाश्रम आणि गरजू लोकांसाठी अन्न व कपडे वाटप करणे अशा शहरातील या उपक्रमांमुळे हा दीपोत्सव सामाजिक जबाबदारीचा आणि दातृत्वाचा संदेश देतो.

लक्ष्मीपूजनादरम्यान तुळजापूर मंदिरात संपन्न होणारा भेंडोळी उत्सव हा या दीपोत्सवाचा अत्यंत रंगीबेरंगी आणि आनंददायी आणि तितकाच पारंपरिक आख्यायिका लाभलेला भाग आहे. भेंडोळी उत्सवाच्या माध्यमातून मंदिर परिसरात श्रद्धा भावनेने भक्तगण आपल्या श्रद्धेचा आणि आनंदाचा साक्षात्कार करतात. हा उत्सव धार्मिक श्रद्धा, सामाजिक एकात्मता आणि सांस्कृतिक उत्साह यांचा संगम आहे. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वजण या उत्सवात सामील होतात. ज्यामुळे दिवाळीचा आनंद सर्व स्तरांपर्यंत पोहोचतो. प्रकाशाच्या लखलखाटात आणि भक्तीच्या स्वरात तुळजापूर एक



जिवंत, तेजस्वी चित्र बनते आहे. मातेच्या कृपेने आमचं आयुष्य उजळो... मंदिरात, बाजारात, गल्लीबोळात सर्वत्र ही एकच भावना असते,

भौगोलिकदृष्ट्या धाराशिव जिल्हा आणि तुळजापूर परिसराचे वैविध्य दीपोत्सवाला अद्वितीय बनवते. मराठवाडा हा प्रदेश भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण असून त्यात उत्तर, मध्यभाग, दक्षिण आणि पूर्व भागातील शहरी व ग्रामीण फरक दीपोत्सवात झळकत राहतो. शहरी भागात आधुनिक सजावट, सांस्कृतिक संध्या आणि प्रदर्शने दिसतात, तर ग्रामीण भागात पारंपरिक फराळ, मातीचे दिवे, सामूहिक पूजन आणि शेतकऱ्यांशी संबधित लोककला अनुभवायला मिळते. या विविधतेमुळे तुळजापूर दीपोत्सव संपूर्ण मराठवाड्यात एक वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक अनुभव म्हणून प्रसिद्ध आहे.

दीपोत्सवाच्या काळात मंदिर परिसर, रस्ते आणि घरांची सजावट दृष्टीस आकर्षक दिसतात. हजारो मातीचे दिवे, तेलदीपे आणि रंगीत कंदील उजळतात. सामूहिक दीपदानाच्या विधीत भक्तांचा उत्साह आणि श्रद्धा मंदिराच्या पवित्रतेला आणखी गंभीर बनवते. कीर्तन व भजन संध्या, पारंपरिक लोकसंगीत आणि नाट्यप्रयोग हे सांस्कृतिक अनुभव वाढवतात. मुलांसाठी सांस्कृतिक कार्यशाळा आणि बालसाहित्य वाचन आयोजित केल्यामुळे युवा पिढीला परंपरा, इतिहास आणि संस्कृती समजावण्याची संधी मिळते.

दीपोत्सवात पर्यावरणपूरक उपायांचे पालन केले जाते. मातीचे दिवे, प्लास्टिकमुक्त फराळ, घरगुती कंदील आणि मातीची, ऐतिहासिक किल्ले बांधणी, दारी तोरण, आकर्षक रेखीव रंगोळी सजावट व हरित दिवाळी अभियान यामुळे हा दीपोत्सव परंपरा जपणे आणि सामाजिक-पर्यावरणीय जबाबदारी निभावणे या दृष्टीने आदर्श ठरतो. स्थानिक कारागीर आणि महिला स्वयंउद्योजकांना प्रोत्साहन दिले जाते. ज्यामुळे आर्थिक व सांस्कृतिक दोन्हीदृष्ट्या योगदान वाढते.

तुळजापूरचा दीपोत्सव हा केवळ धार्मिक सोहळा नाही; तो मराठवाड्याच्या मातीशी, श्रमाशी आणि संस्कृतीशी जोडलेली जिवंत परंपरा आहे. सुगीचे दिवस, घरात आलेले नवे धान्य, पशुधनाची पूजा, फुलांच्या तोरणांची सजावट आणि तुळजाभवानीच्या कृपामय प्रकाशाने उजळलेले मंदिर या साऱ्यांच्या संगमाने दिवाळी म्हणजे खऱ्या अर्थाने समृद्धीचा आणि समाधानाचा सण ठरतो.

दिवाळी फक्त दिवे पेटवण्याचा उत्सव नाही, तर मन, नातेसंबंध, संस्कृती, सामाजिक योगदान आणि पर्यावरणीय जाणीव यांचा उत्सव आहे.

धाराशिव जिल्ह्यातील आई तुळजाभवानीचा दीपोत्सव आणि लक्ष्मीपूजन या दिवशी होणारा भेंडोळी उत्सव मराठवाड्याच्या दिवाळीला एक अद्वितीय सांस्कृतिक आयाम आणि लोकजीवनाचा अभिमान देतो. दीपोत्सवाच्या माध्यमातून भक्तांना आध्यात्मिक समृद्धी, सामाजिक ऐक्य, सांस्कृतिक संवर्धन आणि पर्यावरणीय जाणीव अनुभवायला मिळते. दिवे फक्त तेलाने पेटत नाहीत; श्रद्धा, संस्कार, सामाजिक सहभाग आणि संस्कृतीने उजळतात. तुळजापूर दीपोत्सव ही श्रद्धा आणि संस्कृतीच्या उजेडाची साक्ष आहे.

(लेखक हे शासनाच्या धाराशिव जिल्हा मराठी भाषा समितीचे सदस्य व महाराष्ट्र शासन राज्य शिक्षक पुरस्कार विजेते आहेत.)

महाराष्ट्रात बंजारा समाज हा मोठ्या संख्येने आहे. हा समाज काळानुसार बदलला असला तरी, या समाजाची स्वतंत्र बोलीभाषा, समृद्ध लोकसाहित्य आणि 'तांडा संस्कृती' अजूनही काही प्रमाणात टिकून आहे. बंजारा संस्कृतीचा आत्मा हा तांड्यातील जीवनात आहे. देशभरात हा समाज वेगवेगळ्या नावाने, भिन्न प्रवर्गात आहे. महाराष्ट्रात दोन मुख्यमंत्र्याच्या रूपाने १६ वर्षे राजकीय नेतृत्व या समाजाने दिले आहे. बंजारा हा मुळातच 'उत्सवप्रिय' समाज असून अनेक 'सण' सामुहिक पद्धतीने साजरे केले जातात. त्यामुळे समूह जीवनाचा सहज आविष्कार यांच्या परंपरेत दिसतो.

# बंजारा युवतींचा 'दीपोत्सव'

**प्रा. डॉ. निशा मुडे–पवार**

'बंजारा' हा मूलतः भटका समाज आहे. मिठाचा लवण व्यापार करणारा 'लमाणी' जंगलात राहणारा 'बनजारा', गोरबोली बोलणारा 'गोरमाटी' अशा नावाने हा समाज ओळखला जातो. एकेकाळी गाई-गुरांसाठी चारा आणि पाणी शोधणारा, सैनिकांना 'रसद' पोहोचवणारा हा भटका समाज, गेल्या काही शतकांत आपल्या वस्तीत म्हणजेच 'तांड्यात' स्थिर झाला आहे.

भारतातील २६ राज्यांमध्ये बंजारा, बंजारी, बंजारे, बाजीगर, ब्रजवासी, लमाणी, लमाण, लंबाडा, सुगाली, लबाना, लभाण, बळदिया, लदेनिया, कांगशिया, शिगाडे, शिरकीबंद, शिरकिवालागोर बंजारा, लंबाडा/लंबारा, लंभाणी, चरण बंजारा अशा वेगवेगळ्या २७ नावांनी आणि भिन्न प्रवर्गात बंजारा समाज विभागलेला आहे. महाराष्ट्रात 'बंजारा' समाज हा 'विमुक्त जाती'मध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. सोलापूर, बीड, धाराशीव, लातूर, औरंगाबाद, जालना, नांदेड, यवतमाळ, जळगाव, अकोला, बुलडाणा, वाशीम आणि नागपूर या जिल्ह्यात हा समाज आहे.

या समाजाचा समान धागा म्हणजे 'बंजारा संस्कृती' आहे. देशातील अनेक राज्यात राहणाऱ्या, बंजारा समाजाच्या बोलीभाषेवर त्या-त्या राज्यातील प्रादेशिक भाषेचा प्रभाव दिसून येतो. प्रादेशिक संस्कृती, प्रथा आणि परंपरा या समाजाने स्वीकारल्या असल्या, तरी 'तांडा संस्कृती' जपली आहे. देशाच्या विविध राज्यांत विखुरलेल्या बंजारा समाजाला तांडा संस्कृतीतील बोलीभाषा, वेशभूषा, आभूषणे, लोकगीत, लोककथा, म्हणी आणि वाक्प्रचार लोकनृत्य, वाद्यकला, कशिदा विधी, परंपरा, चालीरिती, खाद्यपदार्थ, जीवनशैली, पद्धती आणि लोकपरंपरा यामुळे एकत्र बांधले आहे.

बंजारा हा पशुपालक, कृषी-निसर्गपूजक आणि उत्सवप्रिय समाज आहे. त्यामुळेच बंजारा समाजातील सणांना, कृषी-धार्मिक आणि निसर्गाचे अधिष्ठान आहे. एकच बोलीभाषा आणि संस्कृती असलेले बंजारा लोक गाव आणि शहरापासून लांब असलेल्या 'तांड्यात' राहतात. इतर काही समाजाचे अपवाद वगळता, बंजारा लोकच फक्त तांड्यात राहत असल्यामुळे या समाजाचे 'सण' एकजिनसी समूहाच्या आणि लोकजीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. बंजारा लोकसाहित्यामध्ये लोकगीत (गिद), कथा (साकी), नृत्य, म्हणी केणावट पहेली यांचा प्रामुख्याने समावेश होतो. बंजारा बोलीभाषा, वेशभूषा, सण-वार, लोकसाहित्य आणि सामाजिक जीवन आज काही प्रमाणात लुप्त होताना दिसत आहे. भारतीय ग्रामीण संस्कृती जशी बदलत आहे, तशीच तांडा संस्कृतीदेखील अपवाद नाही. तांड्यातील नायक, कारभारी आणि पंच याचे समाजातील प्रभाव हा कमी होत आहे. या समाजातील आणि इतर अभ्यासक बंजारा लोकसाहित्याच्या माध्यमातून या लोकसंस्कृतीचा जाणीवपूर्वक आणि सजगपणे अभ्यास करत आहेत. त्यामुळे ही संस्कृती नवीन पिढीला अधिकृतपणे समजण्यास नक्की मदत होऊ शकेल.



बंजारा समाजात दिवाळी हा महत्त्वाचा सण मानला जातो. कार्तिक महिन्यात येणाऱ्या अमावस्येच्या दिवशी 'लक्ष्मीपूजन' आणि दिव्यांची पूजा करण्याची प्रथा आहे. धन-धान्य, समृद्धी घेऊन येणाऱ्या दिवाळीचा, लक्ष्मीपूजनाचा दिवस हा 'काळी अमावस' या नावाने

ओळखला जातो. वर्षांतील बारा अमावस्यापैकी कार्तिक महिन्यात येणारी ही अमावस्या अधिक खडतर मानली जाते. या दिवशी 'पशुबळी' देण्याची पद्धत या समाजात होती; पण आता ही प्रथा कालबाह्य झाली आहे. आता लक्ष्मीपूजनाच्या दिवशी पुरणपोळीचे जेवण किंवा गोड पदार्थ केला जातो.



दिवाळी हा कुमारिका मुलींचा सण असून मुलींना या सणात अधिक मान असतो. मुली या 'लक्ष्मी' आहेत, अशी मान्यता बंजारा समाजात आहे. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी संध्याकाळी मुली, तांड्यातील नायकाच्या घरी, अंगणात एकत्र जमा होतात. ताटात, मातीची मोठी पणती ढाकणी घेऊन गाई-गुरं, घरातील लहान-मोठ्या व्यक्तींना 'ओवाळणी' करतात. 'मेरा' करण्यासाठी मातीचा मोठा दिवा ढाकणी गावातील कुंभाराकडून विकत आणला जातो. त्यानंतर घरोघरी जाऊन 'ओवाळणी' म्हणजेच 'मेरा' मागतात. गरीब-श्रीमंत हा भेदभाव न करता, सर्वजणी एकत्र येऊन, हा 'दीपोत्सव' रात्री उशिरापर्यंत साजरा करतात. तांड्यातील लोक आपल्या आर्थिक कुवतीनुसार. मुलीच्या आरतीच्या ताटात सुट्टे पैसे 'ओवाळणी'मध्ये देतात. 'वर्षे दणेरी कोट दवाळी---बापू तोण मेरा', वर्षातून एकदा येणारी मौल्यवान दिवाळी, बापू तुम्हाला ओवाळते असे म्हणत वडिलांना ओवाळतात. यावेळी मुली, व्यक्तीची नात्यानुसार नावे घेऊन वरील गाण, पुन:पुन्हा म्हणतात. दिवाळीची अनेक गाणी गायली जातात. यामध्ये -

*'रात अंधेरी रे वीरा भाऊ-दिवलो लगा दीजो*
*रात्र अंधारी आहे, भाऊ दिवा लाव*
किंवा

*गोळ गुळ घालू दिवाळी तोन दिवो घालू*
*बापुरीये नंगरी हरीभरी*
*हरीभरी नंगरी फुलभरी*

*बापूची नगरीत हरीभरी समृद्धी राहू दे*
*दिवाळीला दिवा लावू ..गोड गूळ देऊ...*

दिवाळीच्या बलिप्रतिपदेच्या दिवशी, बंजारा मुली उपवास करतात. सकाळी माळरानावरील किंवा शेताच्या कडेने असलेल्या गुलाबी-पांढऱ्या रंगाचे तृण फुले कुर्डु किंवा 'कोंबडा झेंडू आणि इतर फुले गोळा करतात. या फुलांना बंजारा लोक 'लांबडा' असे म्हणतात. तांड्यातील प्रत्येक गोठ्यात किंवा गोठ्याच्या बाहेर, शेणापासून पाच पांडव तयार करून, माळरानातून आणलेली फुले खोचून मुली गाई-बैलाची नावे घेत गाणी म्हणतात, 'गोधन' पूजतात आणि शेवटी 'आन धन लाया लसकर देस ये-दवाळी मावली' अन्नधान्य, दुध-दूभतं दे. दिवाळी माऊली अशी विनंती करतात. याप्रसंगी पुढील गीत म्हटले जाते -

*फुल रे फुल गायी गोटा फुल*
*बांड्या, बुच्या. केवड्या, मेवड्या,*
*धोळी कठार, लांबी हारे,*
*डोडी भरी गावडी, तलाव भरो छाज...*

तसेच यावेळी 'विरारे दामणेती छुटिये बाळदा' भावाच्या गोठ्यातून गुरा-ढोराचा कळप सुटला आहे असेही गीत म्हटले जाते. यावरून गोधन आणि गोधनाचे महत्त्व या समाजात किती आहे. हे लक्षात येते. संध्याकाळी, या मुली नायकाच्या घरी, गोड जेवणाने उपवास सोडत असत. आता नायकाच्या घरी मुलींना जेवण देण्याची पद्धत कमी झाली आहे.

भारतात भाद्रपद पौर्णिमेपासून सुरू होणारा 'पितृपक्ष पंधरवडा' हा सर्व पूर्वजांचे स्मरण करण्यासाठी केला जातो. सर्वपित्री अमावास्या या दिवशी दिवशी पूर्वजांसाठी पिंडदान करतात; पण बंजारा समाजात, बलिप्रतिपदेच्याच दिवशी सकाळी पितरांना होम-हवनद्वारे खीर, कढाव, लापशी असे आणि तुपाचा 'धपकार' अग्नीला अर्पण केला जातो. सर्व पूर्वजांचे स्मरण केले जाते. आरदास विनंती केली जाते.

इतर समाजाप्रमाणे बंजारा समाजदेखील काही प्रमाणात बदलला आहे. या समाजाला आपली ओळख टिकवून ठेवणे यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. बंजारा समाजाच्या नवीन पिढीला बंजारा बोलीभाषा, वेशभूषा आणि परंपरा याविषयी माहिती होणे आवश्यक आहे. त्याशिवाय बंजारा बोलीभाषेतील सौंदर्य, अर्थ आणि अर्थाच्या छटा त्यांना समजणार नाही. बोलीभाषा, 'तांडा संस्कृती' मौखिक परंपरा याविषयी नवीन पिढीला माहिती दिली पाहिजे. शिक्षण नोकरी आणि रोजगारामुळे बंजारा लोकांना शहरात राहणे, आता अनिवार्य झाले आहे. हे सामजिक वास्तव असले तरी 'सेन साई वेस' सर्वावर कृपा कर, अशी वैश्विक आरदास प्रार्थना करणारा हा समाज महत्त्वपूर्ण आहे, यात शंका नाही.

**(लेखिका या कोल्हापूर येथील वृत्तपत्र विभागाच्या विभाग प्रमुख आहेत.)**

महाराष्ट्रात सध्या 'दिवाळी पहाट' हा उपक्रम खूप लोकप्रिय झालेला आहे. दिवाळीच्या पहाटे सुंदर-सुंदर गाणी गाऊन पहाट अजूनच सुंदर करण्यात येते. या कार्यक्रमांतून काही मराठी कलावंत मात्र आवर्जून मराठी गीते प्रस्तुत करतात. कारण 'दिवाळी पहाट'ची गाणी ही प्रसंगाला व वेळेला साजेशी असावी, असे काही प्रस्तुतकर्त्यांना मनापासून वाटते. त्या अनुषंगाने आणि त्या निमित्ताने महाराष्ट्राची संपूर्ण समृद्ध अशी गीतपरंपराच प्रस्तुत लेखात मांडण्यात आली आहे. वाचकांना यातून महाराष्ट्रातील समृद्ध गीतपरंपरा, तर माहीत होईलच, त्याबरोबर त्यातील ज्ञान-विज्ञानही माहिती होईल, अशा पद्धतीने व भावनेने प्रस्तुत लेख लिहिला गेला आहे.

# महाराष्ट्राची समृद्ध गीतपरंपरा

डॉ. दत्ता हरकरे



आमचा देश भारत आणि आमचा प्रदेश महाराष्ट्र! भारत हा शब्दच एक ज्ञानमय परंपरा सांगणारा आहे. (भा + रत ) भा म्हणजे प्रकाश आणि रत म्हणजे एकरूप होणे. अर्थात प्रकाशाशी एकरूप होणारे. प्रकाश हे ज्ञानाचे सूचक आहे. अर्थात ज्ञानाशी एकरूप होणाऱ्या ज्ञानियांची भूमी म्हणजे भारत भूमी होय, असे विसाव्या शतकातील श्रेष्ठ योगी पुरुष योगी मनोहर सांगतात. महाराष्ट्र शब्दाची सुद्धा उकल करताना ते सांगतात की, महाराष्ट्र हा शब्द मरू+ हट्ट अशा दोन उपशब्दांपासून बनला आहे. मरू म्हणजे जंगल आणि हट्ट म्हणजे प्रदेश. अर्थात महाराष्ट्र म्हणजे दाट जंगलांचा प्रदेश. म्हणून येथे राहणारे मरुहट्टे म्हणजे मराठी आणि येथील भाषा मरुहट्टी म्हणजे मराठी. या मराठीबद्दल संत ज्ञानेश्वर म्हणतात, 'माझ्या मराठाची बोलु कवतिके, परी अमृताते पैजा जिंके' अर्थात माझ्या मराठीची गोडी अमृतापेक्षाही मधूर आहे. अशी ही मराठी भाषा महाराष्ट्राची प्रादेशिक भाषा. हिचे गोडवे गावे तेवढे कमीच! अशा या महाराष्ट्रात अनेक भाग आहेत, उपप्रदेश आहेत. मूळ भाषा मराठी असली तरी प्रत्येक भागात, गावागावात ती बदलत जाते. अर्थात मूळ मराठीच; पण स्वरूप वेगळे आणि अजून मोहक. मग प्रत्येक भागात तेथील हवामान, राहणी, तेथील उपलब्धी अशा अनेक विषयांना धरून सुंदर सुंदर गीते बनतात, स्वरबद्ध होतात. ते गीत मग त्या विभागाचे लोकगीत बनते. अशी महाराष्ट्राची जवळपास १०० सुंदर-सुंदर लोकगीते बनली आहेत. त्यातीलच काही लोकगीतांचा आणि आवडत्या गीतांचा हा आढावा!

महाराष्ट्राची संस्कृती व परंपरा ही शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात जास्त जपली गेली आहे. कारण शहरी भागात धावपळीच्या जीवनात परंपरा व संस्कृती पूर्णपणे जपणे थोडे कठीण जाते. गावात मात्र दिवसाची सुरुवातच सुंदर सूर्योदय, पक्ष्यांचा किलबिलाट, कोंबड्यांचे आरवणे अशा सुंदर दृश्याने होते. मग अशा वेळी सडासंमार्जन करताना आणि तुळशीवृंदावनासमोर रांगोळी काढताना महिला सुंदर मंजुळ स्वरांत सूर्योदयाचे सुंदर गीत गात असतात, त्या गीताला भूपाळी म्हणतात. अशा अनेक सुंदर भुपाळ्या बनल्या आहेत, ज्या सर्वत्र गायल्या जातात. जुन्या काळी यानंतर घरच्या महिला जात्यावर पीठ दळायच्या आणि ते दळताना श्रमपरिहार व्हावा, म्हणून काही गीते गुणगुणत असत. तीच गीते नंतर जात्यावरची गाणी म्हणून गायल्या जाऊ लागली. नंतर परमेश्वरासमोर प्रार्थना करण्यात येई. ते भक्तिगीत म्हणून प्रसिद्ध झाले. जुन्या संतांनी परमेश्वराचे वर्णन असलेली पदे लिहिली ते अभंग म्हणून गायल्या जाऊ लागले. अभंग आणि भक्तिगीत हे दोन्ही प्रकार परमेश्वराचेच वर्णन सांगतात. फक्त फरक एवढाच की, अभंगांमध्ये नाममुद्रा असते जसे की, तुका म्हणे, नामा म्हणे, एका जनार्दनी, ज्ञानदेव म्हणे वगैरे. भक्तिगीतात अशी नाममुद्रा नसते. तसेच अभंग हे प्राचीन संतांनी लिहिले असतात, तर भक्तिगीते आधुनिक कवींनी लिहिलेली असतात. असे अनेक अभंग आणि अनेक भक्तिगीते महाराष्ट्रात सर्वत्र तल्लीन होऊन गायली जातात. महाराष्ट्रात अन्नाला पूर्णब्रह्म म्हटले आहे. म्हणून जेवतानासुद्धा प्रथम 'वदनी कवळ घेता, नाम घ्या श्रीहरीचे' हे चार ओळींचे पद म्हटल्यावरच जेवणाला सुरुवात होते.

शेतकरी सकाळी शेतावर जाताना आपली बैलगाडी चालवतात व त्यावेळी जिवाशिवाची बैलजोड म्हणून गाणे म्हणत शेतात जातात.



शेतात पेरणी करतानासुद्धा काही गीते म्हणतात, त्यांना पेरणीगीत म्हणतात. काळ्या मातीसाठीसुद्धा गीत गायले जाते, 'काळ्या मातीत मातीत...'

मंदिरामध्ये किंवा घरी देवाला हात जोडताना पंचारत्या म्हटल्या जातात व त्यानंतर मंत्रपुष्पांजली म्हटली जाते. या सर्वांतून नकळतपणे घरच्या लहानग्यांना उच्च संस्कार प्राप्त होत असतात. मंदिरांमध्ये



होणारा कीर्तन हा प्रकार भक्तांना अतिशय आवडतो. 'कृ' या शब्दापासून कीर्तन हा शब्द बनला आहे. कृ म्हणजे कर्म! म्हणून कीर्तनात कर्मयोगावर जास्त आख्याने असतात.

संध्याकाळी घरची आई आपल्या मुलांना देवासमोर बसवून त्यांच्याकडून 'शुभंकरोती कल्याणम्' हा श्लोक म्हणवून घेते. हा बालसंस्कारच आहे. भक्तिप्रांतात अजूनही बरेच प्रकार आहेत गीतांचे, जसे की देवीसाठी गायला जाणारा गोंधळ, जोगवा, रोडगा, देवी गीत वगैरे. मल्हारी मार्तंडसाठी मल्हारी गीते, जेजुरी गीते व वाघ्या मुरळी गायले जातात. भगवान दत्तात्रेयसाठी पालखी गीत गायले जाते. ज्यामध्ये 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा' असा सुंदर जयघोष असतो. दिवाळी कार्तिक महिन्यातच असते. त्यात सकाळी पाच वाजता उठून सुंदर काकड आरती म्हटली जाते. ही काकड आरती म्हणजे पांडुरंगालाच विनवणी असते. दिवाळीच्या सणात दीपगीते व दिवाळी गीते गायली जातात. दिवाळी म्हणजे पुन्हा दीपाचे अर्थात तेजाचे अर्थात ज्ञानाचेच पूजन असते. हीच भारताची आणि महाराष्ट्राची ज्ञानमय परंपरा आहे. सकाळी एक पांढऱ्या कपड्यातला, मोरपीस लावलेला भिक्षेकरी फिरतो व गीत म्हणत असतो, त्याला वासुदेव म्हणतात आणि त्याच्या गाण्याला वासुदेव गीत म्हणतात. देवीच्या नवरात्रातसुद्धा अशाच पद्धतीने बाया जोगवा गाऊन जोगवा मागत असतात. गवळण हा गीत प्रकार संत एकनाथांनी रुजवला आणि त्यात गोपी व कृष्णाची सुंदर कथा असते. खंजिरी वाजवून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जी स्वरचित पदे गात असत ती पदे खंजिरी भजन म्हणून पारंपरिक गीते झाली. नाटक हे महाराष्ट्राचे आवडते मनोरंजनाचे माध्यम. यात जी गीते गायली जातात, त्यांना नाट्यगीते म्हणतात. यातच सुरुवातीला नटराजासाठी जे गीत गायले जाते त्याला नांदी म्हणतात.

आपला महाराष्ट्र ज्यांनी घडवला ते छत्रपती शिवाजी महाराज! त्यांच्या शौर्याचे वर्णन ज्या गीतात येते, त्याला पोवाडा असे म्हणतात. या पोवाड्यात सर्व शूरवीरांच्या गाथा येतात जसे की, बाजीप्रभू देशपांडे, तानाजी मालुसरे, छत्रपती संभाजी महाराज वगैरे. ग.दि. माडगूळकर यांनी गीतरामायण लिहिले व सुधीर फडके यांनी ते संपूर्ण आपल्या आवाजात गाऊन अजरामर केले. गीतरामायणमधील गीतेसुद्धा आता प्रभु रामचंद्रांवरील पारंपरिक गीते म्हणूनच गायले जातात. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी स्वतंत्रतेला देवीचे व आईचे स्वरूप देऊन गीते रचली, जसे की जयोस्तुते, सागरा प्राण तळमळला वगैरे. ही गीते आता स्वातंत्र्यगीते म्हणूनच सर्वत्र गायली जातात. शरद ऋतूत महिला भुलाबाईंची मंजुळ गाणी गातात. काही भागात यांना भोंडल्याची गाणीसुद्धा म्हणतात. हा लोकगीताचाच प्रकार आहे. आई मुलीला सासरी पाठवताना विरहाच्या दुःखात गाणे म्हणते त्याला पाठवणी गीत म्हणतात. तसेच पुढे मुलगी गर्भवती झाल्यावर तिचे डोहाळे पुरवायला काही गाणी म्हटली जातात. मुल जन्माला आल्यावर पुन्हा नामकरण करते वेळीसुद्धा महिला काही गाणी म्हणतात. त्यांना बारसे गीत म्हणतात. लग्नात वधुवरांसाठी लग्न लागताना काही श्लोक व गीते म्हणतात त्यांना मंगलाष्टक म्हणतात. मंगल + अष्टक ! म्हणजे लग्नाच्या मंगल प्रसंगी आठ कडव्यांचे मंगल गीत अर्थात मंगलाष्टक!

अशा पद्धतीने महाराष्ट्रात जीवनातील प्रत्येक प्रसंगांवर विविध गीते वेळोवेळी रचली गेली व गायल्या गेली. हीच गीते पुढे पारंपरिक गीते व लोकगीते बनली. अशी महाराष्ट्राची जवळपास १०० गीते आहेत, जी त्या-त्या प्रसंगी गायली जातात व प्रत्येक वेळी महाराष्ट्राच्या संस्कृतीची ओळख करून देतात. महाराष्ट्राच्या या पूर्ण पारंपरिक समृद्ध गीतपरंपरेची ओळख करून देणारा 'आई मराठी जय महाराष्ट्र' हा कार्यक्रम नागपूरच्या कनक सूर मंदिरातर्फे ५० ते



१०० कलावंतांना घेऊन पारंपरिक वेषात सादर केला जातो. तो प्रत्येक मराठी माणसाने बघावा असा आहे. प्रसिद्ध गायिका कनका गडकरी यांच्या संकल्पनेतून हा विक्रमी कार्यक्रम साकारला आहे. महाराष्ट्राची भूमी म्हणजे संतांची, ज्ञानियांची, विचारवंतांची, शूरांची, योद्ध्यांची, थोर साहित्यिकांची, शूर महिलांची भूमी आहे. या सर्वांची ओळख महाराष्ट्राच्या या समृद्ध गीतपरंपरेतून होते. म्हणूनच महाराष्ट्राची अशी समृद्ध गीतपरंपरा केवळ गीतपरंपरा नसून ती एक संस्कारपरंपरा आहे.

*आई मराठी - जय महाराष्ट्र*

(पी. एचडी. संगीत), आकाशवाणी उच्च श्रेणी गायक.

प्रकाशाचे दान देणारा, नात्यांचा गोडवा वाढवणारा हा उत्सव दिवाळी! काळाच्या ओघात पणत्या एलईडी झाल्या, फराळ रेडिमेड झाला आणि सण साजरे करण्याची पद्धतही बदलली. तरीही दिवाळीचे मूळ सार प्रकाशाचा विजय, प्रेमाचा उत्सव आणि एकतेचा संदेश हे आहे. हा संदेश आजही प्रत्येकाच्या मनात झळाळतो. परंपरा आणि आधुनिकतेचा अशा सुंदर मिलाफाने नाशिकची दिवाळी अनोख्या उजेडाने फुलते.

# प्रकाशाचे दान, नात्यांचा उत्सव!

किरण लोखंडे

आता अशा दिवाळीचे अप्रूप राहिलेले नाही. काळाचा सांधा बदलला, जीवनाचे सत्त्व अन् तत्त्वही बदलले. जीवनशैलीत आमूलाग्र परिवर्तन झाले. नवे जगणे, नवे प्रश्न, नवा सूर असे सारे काही आले...तम भेदून टाकणाऱ्या तेजाचाही कायापालट झाला. सणावारांची पद्धती, रीतीभाती कालौघात बदलल्या आणि बदलत आहेत. अर्थातच परंपरा आणि आधुनिकता यांचा मेळ घालत माणूस अधिकाधिक उत्सवी होतो आहे. अवघा महाराष्ट्र कृषी संस्कृतीच्या मातीत माखलेला असल्यामुळे स्वाभाविकत: येथील सणावारांना मृद्‌गंध व्यापून उरलेला आहे. दीपावलीच्या आख्यायिका आणि त्यानुरूप वैशिष्ट्ये ल्यालेले दिवस साजरे करण्याची प्रथाही सार्वत्रिक असली, तरी दर दहा कोसावर बदलणाऱ्या जीवनप्रवाहानुसार दिवाळी अगदी अल्पसे बदलते रूप धारण करते, यास नाशिक जिल्हा अपवाद नाही!

महाराष्ट्राची धार्मिक आणि सांस्कृतिक राजधानी असा लौकिक असलेल्या नाशकातील उत्सव आणि परंपरांना एक खास वारसा लाभला आहे. काळ बदलला, नाशिक 'वाइन कॅपिटल' म्हणून विकसित झाले, तरीही येथील दिवाळीचा उत्साह आजही तसूभरही कमी झालेला नाही. बदल झाला असेल, तर तो फक्त तिच्या साजरी करण्याच्या पद्धतीत! 'पारंपरिक भक्ती' आणि 'आधुनिक व्यवहार' यांचा सुंदर मिलाफ दीपोत्सवाच्या साजरीकरणात झाला आहे.



नाशिक जिल्ह्यात विशेषत: ग्रामीण आणि आदिवासी पट्ट्यात दिवाळी आजही तिच्या मूळ स्वरूपात, माती आणि श्रमाशी जोडली गेलेली आहे. वसुबारस हा दिवाळीच्या पहिल्या दिवसाची नाळच मुदलात कृषी संस्कृतीशी जोडली गेली आहे.

*'दिन दिन दिवाळी, गायी म्हशी ओवाळी*
*गायीचे पाडे पित्तर पाडे, ढेऱ्यामागे राऊत घोडे*
*राऊतामागे धन्नापूर, धन्नापूरची गोगलगाय*
*गोगलगायीची शिंगे, महादेवाची लिंगे...'*

असे गाणं म्हणत आणि नदीतील लव्हाळीपासून तयार केलेल्या व नागाच्या फणीचा आकार असलेल्या दिवटीत तेल मागत लहानगी मुलं गावभर फिरत असत. शेतकरी आपल्या गाई-वासरांचे पूजन करतो. या परंपरेत गाईला ओवाळून गोडधोड नैवेद्य दाखवला जातो आणि तिच्या पायावर पाणी घालून हळद-कुंकू लावले जाते. याच दिवशी दिवाळीच्या पहिल्या पणत्यांनी घर अंगण उजळून निघते. आताशा पशूधन कमी झाले असले, तरी सवत्स धेनूचे पूजन करण्याची पंरपरा जपण्याचा पुरेपूर प्रयास केला जात असतो.

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भागातील दिवाळीचा पहिला दिवस मात्र साजरा होतो तो वाघबारस नावाने! आदिवासी हा सण वाघदेवतेला समर्पित करतो. वाघदेव म्हणजे जंगल, निसर्ग आणि गुराढोरांचे रक्षक! दिवाळीपूर्वीच गावात साफसफाई करून केंद्रस्थानी 'वाघोबाच्या' पूजेसाठी जागा निवडली जाते. ती शेणाने सारवली जाते. त्या ठिकाणी सावरी किंवा सागाच्या दोन फांद्या उभ्या केल्या जातात आणि अंबाडीच्या दोरीने तोरण बांधले जाते. देवांच्या सान्निध्यात तांदळाच्या पुंजके, शेंदूर, गूळ, आणि फुलांनी सजावट केली जाते. वाघदेवाच्या पूजेला कोंबडा किंवा बोकडाचा नैवेद्य दाखवला जातो. काही ठिकाणी अंडे ठेवले जाते किंवा जिवंत पिल्लू ठेवून त्यास रानात सोडले जाते. विशेष म्हणजे गावातील प्रत्येक घरातून तांदूळ, गूळ व पैसे जमा करून सामूहिक पूजा केली जाते. पूजेनंतर गावातील गुरेढोरे एकत्र आणून वाघोबाच्या मंदिराजवळ त्यांना ओवाळले जाते आणि त्यांच्या रक्षणासाठी देवतेला प्रार्थना केली जाते. शेवटी ग्रामस्थ सामूहिक जेवण करतात, त्यात नवीन पिकांमधील नागली, उडीद, भात यांचे पदार्थ असतात. वाघबारस म्हणजे आदिवासी जीवनात निसर्ग, प्राणी आणि मानव यांच्यातील समन्वय दर्शवीत 'रक्षण आणि आदर' या भावनांच्या प्रकटीकरणाचा उत्सव! याशिवाय, डोंगऱ्या देवाचा उत्सव याच काळात साजरा केला जातो. पाडव्याच्या दिवशी गावोगावी आपल्या सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणाऱ्या नृत्यादींचा कार्यक्रम पार पडतो.

दिवाळीचा उत्साह नरकचतुर्दशीला पहाटेच्या अभ्यंगस्नानाने कळसाला पोहोचतो. सुगंधी उटणे आणि तेल लावून केलेले हे स्नान केवळ शुद्धीसाठी नव्हे, तर आरोग्यासाठीही महत्त्वाचे मानले जाते. लक्ष्मीपूजन हा दिवाळीचा मध्यबिंदू. संध्याकाळी लक्ष्मी, गणपती आणि सरस्वतीची पूजा केली जाते. नाशिक हे मोठे व्यापारी केंद्र असल्यामुळे, व्यापारीवर्गात हिशेबाच्या वह्या (चोपड्या) आणि तिजोरीची पूजा करण्याची परंपरा मोठ्या भक्तीने पाळली जाते. घरातील महिला सायंकाळी पारंपरिक मातीच्या पणत्यांची आणि आकाश कंदिलांची रोषणाई करतात. हा साधा, शांत आणि आध्यात्मिक प्रकाश आजही बघावयास मिळतो. बलिप्रतिपदा, म्हणजेच दिवाळी पाडवा, साडेतीन मुहूर्तांपैकी एक. पती-पत्नीचे प्रेम दर्शवणारे औक्षण (ओवाळणे) आजही पाडव्याला मोठ्या श्रद्धेने केले जाते. पारंपरिक फराळाच्या देवाण-घेवाणीतून आणि ओवाळणीच्या विधीतून नात्यांचा गोडवा वृद्धिंगत करण्याची परंपरा नाशिकने आजही जपली आहे.

दिवाळी हा खरे तर नात्यांचा उत्सव! त्यातही बहीण-भावाच्या नात्याचा प्रकाश आसमंत उजळून टाकावा असाच! पूर्वीच्या काळी दिवाळी असायची ती खास माहेरास येणाऱ्या लक्ष्मीची! ती कशी हे सांगण्याचा मोह येथे टाळता येत नाही!



पहाटेच्या गार वाऱ्यात ती सासुरवाशीण सारवलेल्या अंगणात रांगोळी रेखाटत असायची. अर्थात बोटांच्या चिमटीतून रांगोळी झरझरते आहे; पण मनात मात्र लाडका भाऊ अजून का आलेला नाही म्हणून हुरहूरही दाटलेली असायची. दूरवरून बैलगाडीच्या चाकांचा, बैलांच्या गळ्यांतील घुंगरांचा आवाज येतोय! तिच्या भावाची गाडी ही अशी धुक्यातून वाट काढत येताना दिसली की म्हणायची,

*'भाचा आला राती, भाऊ माझा आला काल*
*पाठीचा बंधू बोले, बाई दिवाळीला चाल'*

आपला मुऱ्हाळी कसा आहे, हे सांगताना लहानपणी झालेल्या

भांडणाचा दाखला घेऊन ती सांगते,

*'बहीण-भावाचा झगडा झाला राणी*
*बहिणीच्या डोळां पाणी, भाऊ चिंतावला मनी'*

असा हा तिचा भाऊ भांडला, चिडला तरीही बहिणीचे कष्ट पाहून दु:खी होणारा, तिच्या पायात काटा रुतला, तर हळहळणारा... असा चिडणारा, भांडणारा किंचित दुबळा भाऊ असावा, तो का असावा, हे ती पटवून द्यायची.

*'दुबळा पाबळा भाऊ बहिणीला असावा*
*चोळी बांगडीचा, एका रातीचा विसावा'*

हा भाऊ कसाही असला तरी तो दिवाळीला साडी-चोळी करतो, बहीण हक्काने त्याच्याकडून भाऊबीज घेते.

भाऊ बहिणीला घेऊन घरी आल्यावर आई लगबगीने पुढे व्हायची. मुलीला घट्ट मिठी मारायची. वर्षानंतरच्या प्रदीर्घ विरहानंतर झालेल्या त्या भेटीत आनंदाचे ढग डोळ्यांतून पाझरायचे.

भाऊबिजेच्या दिवशी तर घरात गोकुळ नांदायचे. भल्या पहाटे उठून बहीण भावाला उटण्याची सुगंधी आंघोळ घालायची. गावातल्या मारुतीला अगोदर ओवाळून यायची. भावाच्या मस्तकावर अभिष्टचिंतनाने तांदूळ टाकायची, कुंकुमतिलक करायची, सोन्याच्या दागिन्यांसह डोक्याभोवती पाच फेरे मारून तोंडात पुटपुटायची, 'इडापीडा जावो, बळीचे राज्य येवो.' भावाची सर्व चिंता दूर होवो. त्याचे अरिष्ट नष्ट होवो' ही सदिच्छा व्यक्त करायची.

*'दिवाळीच्या दिवशी भाऊ दिवाळ काढील*
*गाई खुट्याची सोडील, चोळी अंजिरी काढील'*

ओवाळणीसाठी भाऊ दिवाळ म्हणजेच ओवाळणी देईल आणि त्या ओवाळणीसह दारासमोरची लक्ष्मी गाय आणि सर्वांत महागडी अंजिरी चोळी घेईल, हा बहिणीचा हट्ट भाऊ पूर्ण करत असे!

प्रत्येक बहीण अशी हट्टी नसायची. काही बहिणी खूप समंजस असायच्या, ओवाळणी दिली नाही, तरी काही फरक पडत नाही, असं सांगून त्या म्हणायच्या,

*'नको देऊ-घेऊ, नको येऊ न्यायला*
*सुखी राहा बांधवा, भूषण गायला'*

मला काही देऊ-घेऊ नको. फक्त तू सुखी राहा, तू सुखी असणे हीच माझी ओवाळणी! तू सुखी असलास, तरच तुझे भूषण, मोठेपणा सांगता येईल. तू इकडे सुखी तर मी माझ्या घरी (सासरी) सुखी आहे.

*'फुटली बांगडी नाही करू हळहळ*
*भावाच्या जिवावर मला कशाचा काळ'*

भाऊ हेच माझे सर्वस्व, त्याने ओवाळणी दिली नाही, त्यासाठी हळहळ करीत नाही. उलट तो भाऊ आहे म्हणून तर सर्व आहे. असा समंजसपणा बहिणीत असायचा. ओवाळून झाले की, गोडधोड चार घासांची पंगत उठायची. गप्पांना रंग यायचा.

दिवाळीचे मंगल मंतरलेले दिवस कापरासाखरे उडून जायचे. मग सासरी जाण्यासाठी बहिणीची तयारी व्हायची. आईच्या डोळ्यांचा कडा ओल्या व्हायच्या. मुलीचा चेहरा पुन:-पुन्हा ओंजळीत पकडून ती रडत राहायची. गाडी तयार असायची. जड पावलाने बहीण गाडीत बसायची. ती गाडी दूर जात असताना रस्त्यावरच्या धुळीमध्ये हरवायची. त्या धुळीतच गाडी दूर दूर जायची. बैलांच्या गळ्यांतील घंट्यांचे आवाज विरून जायचे. माहेरची माणसे डोळे पुसत पुढच्या दिवाळीची वाट पाहत उभी राहायची.

आता तशी दिवाळी दिसत नाही, अनुभवता येत नाही. मग ती असते कशी? गेल्या काही दशकांत नाशिक शहर झपाट्याने विकसित झाले, त्याचा स्पर्श ग्रामीण भागालाही झाला. दिवाळीच्या उत्सवात आधुनिकतेचा झगमगाट आणि व्यावसायिकता यांचा प्रभाव वाढला. नोकरी करणाऱ्या आणि वेळेची कमतरता असलेल्या कुटुंबांमध्ये रेडिमेड फराळाची मागणी प्रचंड वाढली. अर्थातच, त्यामुळे उत्कृष्ट दर्जाचा घरगुती फराळ विकणाऱ्या महिला बचतगटांची मोठी साखळी तयार झाली आहे. चकली, शंकरपाळी, लाडू, करंजी या पारंपरिक पदार्थांची चव कायम ठेवून त्यांना व्यावसायिक रूप देण्यात आले आहे. यामुळे पारंपरिक फराळ बनवण्याचा 'श्रम' कमी झाला; पण त्याचबरोबर अनेक महिलांना 'रोजगार' मिळाला आहे.

पारंपरिक मातीच्या पणत्या आणि हाताने बनवलेल्या कंदिलांची जागा एलईडी लाईट माळा, चायनीज कंदील आणि आधुनिक फॅन्सी लाईट्सनी घेतली आहे. ही रोषणाई अधिक चमकदार आणि आकर्षक असली तरी, त्यामध्ये मातीच्या दिव्यांचा साधेपणा आणि शांतता हरवली आहे. केवळ आकर्षकतेसाठी रोषणाई करण्याकडे अधिक कल दिसतोय.

वाढते प्रदूषण आणि ध्वनिप्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर 'पर्यावरणपूरक दिवाळी' ही संकल्पना स्वीकारण्यास कासवगतीने का असेना, येथील रयतेची स्वागतार्ह पावले पडत आहेत. आता कमी आवाजाचे फटाके वापरण्याकडे जाणीवपूर्वक बघितले जात आहे. अनेक शाळा, संस्था आणि गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये 'नो क्रॅकर्स'चे आवाहन केले जाते. नैसर्गिक रंगांच्या रांगोळ्या, मातीच्या पणत्या वापरण्यावर अधिक भर दिला जातोय. प्रशासनानेही फटाक्यांच्या विक्री आणि वापरासंबंधी कठोर नियम लागू केले आहेत.

कधी काळी मोजक्या ठिकाणी साजऱ्या होणाऱ्या 'दिवाळी पहाट' या सांस्कृतिक संकल्पनेने आता मोठे व्यावसायिक रूप घेतले आहे. दिवाळी पाडव्याला भल्या पहाटे शास्त्रीय संगीत, सुगम संगीत आणि विविध कलांच्या कार्यक्रम आयोजित केले जाते. अनेक नामवंत कलाकारांच्या उपस्थितीत होणारे हे कार्यक्रम कलाप्रेमींसाठी एक मोठी पर्वणी असते. यामुळे दिवाळी केवळ घरगुती सण न राहता, तो सामुदायिक आणि कलात्मक उत्सव बनला आहे.

भेटवस्तूंची देवाणघेवाण, कपडे खरेदी आणि घरातील उपकरणांची खरेदी मोठ्या प्रमाणात ऑनलाइन पद्धतीने होऊ लागली आहे. पाडव्याच्या मुहूर्तावर सोने-चांदी, वाहने आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूंची खरेदी करण्याची वृत्ती वाढली आहे. दिवाळी आता धनवृद्धी आणि उपभोगाचे प्रतीक बनली आहे. प्रत्येक पिढीत कालाचक्रानुसार बदल होतात, ते अपरिहार्य आणि स्वीकाहार्य आहेच. आधुनिकतेचा स्वीकार करताना आपल्या मूळ धार्मिक भावना आणि सामाजिक बंध विसरता कामा नये. रोषणाईची साधने बदलली, फराळाचे स्वरूप बदलले; पण 'प्रकाश, आनंद आणि नात्यांचा गोडवा' देणाऱ्या दिवाळीचे प्रत्येकाचा काळजात एक गाव वसले आहे..!

**(लेखक हे नाशिक येथील नामवंत दैनिकाचे संपादक आहेत.)**

**निसर्गाशी अखंड नाते जोडणारा आदिवासी समाज दिवाळीचा सण वेगळ्या पद्धतीने साजरा करतो. शहरांतील फटाक्यांच्या झगमगाटाऐवजी येथे दिसते निसर्गपूजनाची तेजस्वी परंपरा, जिथे मातीचे दिवे, शेतीची पाळ, जनावरांचे पूजन आणि एकोपा यांचा सुंदर संगम अनुभवास येतो. असग देवहो सणासुखाला नांगजोस अशी निसर्गदेवतांकडे केलेली प्रार्थना हा सण अधिक अर्थपूर्ण बनवते. शेती, पशुपालन आणि पर्यावरणाशी एकरूप झालेला हा उत्सव केवळ धार्मिक विधी नव्हे, तर निसर्गप्रेम, कृतज्ञता आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा जिवंत संदेश देतो.**

# पर्यावरणपूरक दिवाळी निसर्गपूजन

**निखिल मेस्त्री**

पुढील वर्षी शेतात भरघोस धन-धान्य मिळू दे, अशी विनवणी आदिवासी समाज कनसरी, नारायण, हिमाय, वरुण, चढोबा, वाघ्या आदी निसर्ग देवी-देवाकडे करतात. अर्थात दिवाळीच्या शुभमुहूर्तावर हे साकडे निसर्ग देवाला आदिवासी समाज पिढ्या दर पिढ्या करत आलेला आहे. अर्थात आदिवासी समाज हा निसर्गपूजक समाज असल्याने या समाजाचे निसर्गात अबाधित स्थान आहे. जन्मापासून ते मृत्यूपर्यंत प्रत्येक प्रक्रियेत निसर्गाला प्राधान्यक्रम आणि अग्रक्रम देऊन निसर्गाप्रति कृतज्ञता व्यक्त करणे, ही आदिवासी समाजाची परंपरा आजही सुरू आहे. त्यातच दिवाळी सणाला इतर गोष्टींचा गवगवा न करता निसर्गपूजनेला विशेष महत्त्व या समाजाने आजही कायम ठेवले आहे.

असग देवहो सणासुखाला नांगजोस (सर्व निसर्ग देवी देवतांनो सणासुदाला सुख-समाधान लाभो) अशा शब्दात कुलदेवाला साकडे घालून पुढच्या वर्षीच्या दिवाळीला निसर्गाची कृपा राहू दे, अशी विनंती करून दिवाळी साजरी करण्याची ही परंपरा आजही पिढीजात कायम आहे. निसर्गाशी समरस असल्याने आदिवासी समाज हा बहुतांश शेतीवर आधारित आहे. दिवाळी पूजनाआधी कुटुंबे शेतीची कडक पाळ करतात. कोथिंबीर, कोहळे, काकडी, चवळी, ऊस, मुळा, कोंबडी, ताडी या निसर्गाचे कडक व पाळ अर्थात पूजन केले जाते. घरातील प्रमुख स्त्रिया त्यादिवशी पूर्ण उपवास करतात. पूजनाच्या नंतर भगत अर्थात भटजीमार्फत पाळ केलेल्या म्हणजे पूजलेल्या वस्तू खाण्याची परवानगी दिली जाते आणि त्यानंतरच पाळ सोडला जातो. या विधिवत पूजेनंतर सर्व देवांना नारळ दिवे अर्पण केले जातात. माती कोडीचे दिवे तयार केले जातात आणि तेच तेवले जातात. निसर्गपूरक वस्तूतून निसर्गपूजनाची पर्यावरणपूरक दिवाळी अशी अनोखी परंपरा एक वेगळा संदेश



आणि आदर्श निर्माण करणारी आहे.

आदिवासी समाज सलग चार दिवस दिवाळी साजरी करतात. चारही दिवस निसर्गाशी निगडित असलेले विविध पूजन केले जाते. दीवालीचा पहिला दिवस म्हणजे चवदस दिवसापासून सुरू होतो. चवदासच्या दिवशी चवळे, नारळ, वालुक, करांदे, करवेली, गुरकोहला, साखर कोहला यांचे पूजन करतात. या दिवसात घरातील थोरली आणि मोठी माणसे वरगना देव अर्थात कुल देव हे दुधाने अथवा तांदळाच्या पाण्याने धुतले जातात. तसेच देवांची टोपली शेणाने सारवली जाते. हिरवा, हिमाय, नारन, बरान या देवांना शेंदूर लावला जातो. गाय वागुलला शेंदुर लावतात. कुडा काड्यांची कच्ची घरे लाल माती शेणाने लिंपली जाऊन घराला नवीन साज चढवतात.



आदिवासी समाज हा कुटुंब संस्कृती जपणारा समाज असल्यामुळे पाडापाड्यांमध्ये, गावागावांमध्ये हा समाज एकत्रित येऊन पहिल्या दिवशी सर्व देवी-देवतांचे पूजन करतात

दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी निसर्गातून उगवलेल्या वस्तू खाण्याची परंपरा आहे. छायाची किंवा कोहरे पानांमध्ये काकडीच्या सावेल्या वाफवून (वाफवलेला पारंपरिक खाद्यपदार्थ) त्या कुटुंबातील सर्वांना दिला जातो. एकत्रित बसून खाण्याचा हा सण म्हणजे दिवाळीचा सण असे समाज मानतो. जुन्या काकडीच्या गऱ्यात वालूक आणि पीठ साखर घालून भाकरी करण्याची दिवाळीची परंपरा आजही ग्रामीण भागात कायम आहे. या दिवसात चवळी आणि करवंदे खाण्याचा कार्यक्रमही घराघरांमध्ये साजरा केला जातो.

बारशीनंतर तेरस, चवदास आणि पुनम असे दिवाळीचे दिवस आदिवासी बांधवांच्या जीवनात आनंद भरभरून देणारे आहेत. गावदेव झाल्यानंतर खळ्याचा देव केला जातो. गावदेव झाल्यानंतरच इतर सांसारिक बाबींना मुभा मिळते. खळ्याचा देव पुजल्यानंतरच लग्नाचा व्यवहार केला जातो. तत्पूर्वी आदिवासींमध्ये लग्नाचा शब्द; पण तोंडी घेतला जात नाही. दिवाळी या सणांमध्ये घरात असलेल्या पाळीव जनावरांना अर्थात गुराढोरांना विशेष महत्त्व दिले जाते. जनावरांच्या शिंगांना लाल गेरू लावून त्यांना साज शृंगार चढवला जातो काही गावांमध्ये ढोरांची दिवाळी करण्याची परंपरा आजही आहे. गुरांचे गोठे, शेण साचवून ठेवलेली शेणकईची जागा आणि खळे अशा ठिकाणी औषधी चिराट ठेवून त्याची कोडी लावली जातात. अर्थात यामागे गुरांचे आरोग्य चांगले राहावे अशी परंपरा आहे.

दिवाळीच्या सणामध्ये आदिवासींच्या गाव पाड्यावर तारपांचा सूर कानावर गुणगुणतो. लहानांपासून थोरल्यांपर्यंत तारप्याच्या आणि घुंगुरवाली काठीच्या तालावर अर्थात चाला आल्यावर संपूर्ण पाडा आणि गाव फिरताना पाहायला मिळतो, हे सर्व दोन दिवस आपल्या परिसरात डुहुरली पद्धतीच्या नाचाने बेधुंद होतात.

तारपकरी आपल्या तारप्यावर वेगवेगळे सुर वाजवून घुंगुरवाली काठीच्या अर्थात घोरकाठीच्या तालावर मौज आणतो. बायांचा चाला, देवांचा चाला, रानोडी चाला, टाल्यांचा चाला, चवलेचा चाला, जोड्यांचा चाला, नवऱ्यांचा चाला, मुऱ्हा चाला, ऊसल्या चाला, सलातेचा चाला, बदक्या चाला, लावरी चाला, थापडिचा चाला, लोखीचा चाला, म्हाताऱ्याचा चाला, उसळ्याचा चाला या वेगवेगळ्या तारपा सुराच्या आणि नृत्य चालीवर बेभान होऊन दिवाळीचा आनंदोत्सव साजरा केला जातो. एकीकडे शहरी भागांमध्ये दिवाळीसाठी पैसे खर्च केले जातात, तर दुसरीकडे ग्रामीण भागांमध्ये निसर्गाशी समरस व एकरूप होऊन त्याच निसर्गपूजनाची परंपरा दिवाळीच्या निमित्ताने आदिवासी समाज कायम ठेवून पर्यावरणपूरक दिवाळी साजरा करण्याला महत्व देतात. या महत्त्वातून पर्यावरणपूरकतेचा संदेश आदिवासी संस्कृतीतून साऱ्या जगाला घेणे अधोरेखित होत आहे.

(लेखक हे नामवंत पत्रकार आहेत.)

**दिवाळी ही केवळ दिव्यांची आणि फटाक्यांची नाही, तर आदिवासी संस्कृती, कृषिपरंपरा, सामाजिक बांधिलकी आणि कला वैविध्याने उजळलेला एक जिवंत उत्सव आहे. वाघबारसच्या अनोख्या पूजा परंपरेपासून ते रसिकांच्या 'दिवाळी पहाटे'च्या सांस्कृतिक मैफलीपर्यंत आणि अनाथ मुलांच्या चेहऱ्यावर उजळणाऱ्या आनंदापर्यंत हा दीपोत्सव अहिल्यानगरचा आत्मा आणि संस्कृती दोन्ही प्रकट करतो.**

# परंपरा व जिवंत लोकसंस्कृतीचे मिश्रण

**प्रा. डॉ. नवनाथ काशिनाथ वाव्हळ**

खरंतर दीपावली हा दिव्यांचा उत्सव. *'जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवंत।'* ही भारतीय संस्कृतीची धारणा आहे. उपयुक्त प्राण्यांविषयी कृतज्ञता व आदरभाव व्यक्त करण्याच्या भूमिकेतून प्राणीपूजेचा उदय झाला. दिवाळीच्या सुरुवातीच्या प्रथेमधील वसुबारस, वाघबारस या अर्थाने संदर्भ महत्त्वाचा ठरतो. दिवाळीचे स्वरूप, प्रथा-परंपरा या प्रदेशानुसार वेगवेगळ्या दिसतात. त्यास आपला अहिल्यानगर जिल्हा हा कसा अपवाद असेल बरं? तो वैशिष्ट्यपूर्ण सण उत्सव, अनोख्या परंपरा, जगावेगळी खाद्यसंस्कृती आणि अभिनव नवोपक्रमांचा आविष्कार असणारा प्रदेश. येथेच नद्यांच्या काठी मानवाच्या सामूहिक जीवनाची सुरुवात झाली. नागरीकरणाच्या एका टप्प्यावर जोर्वे, दायमाबाद, नेवासे, कोतूळ, ढवळपुरी अशी प्राचीन लहान मोठी महानगरे येथे उदयाला आलेली आढळून आलीत. इतकेच नव्हे, तर याच भूमीत आद्य शेतकरी शेती करू लागला. मात्र त्या आद्य शेतकऱ्यांच्या गाव-वसाहती या ताम्र पाषाणयुगीन होत्या. त्यातून कृषी जीवनाच्या परंपरेतून सण उत्सवाची मोठी परंपरा निर्माण झाली. या भूभागावर प्राचीन काळापासून सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकुट, चालुक्य, यादव, बहामनी, निजामशाही, मुघल, मराठे, पेशवे, इंग्रज आदि सत्तांचे वर्चस्व होते. या सर्व सत्ताधीशांची ही भूमी सामरिकदृष्ट्या महत्त्वाची होती. ती राजकीय केंद्र राहिल्यामुळे येथे दिवाळीला इतिहासाची वेगळीच छटा आहे. आदिमानव, विचारी मानव आणि प्रगत मानवाच्या उत्क्रांतीनुसार दीपोत्सवामध्येसुद्धा बदल झाले आहेत. या बदलांची पार्श्वभूमी अहिल्यानगरला लाभली आहे. पौराणिक साहित्य, वैदिक साहित्य, मौर्य साम्राज्य, सातवाहन, यादव, संत ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीत आणि चक्रधर स्वामीच्या लीळाचरित्रात दिवाळीचे वर्णने आली आहेत. त्यावरून येथील दिवाळी सणाची कल्पना आपल्याला येते. तर अहिल्यानगर जिल्ह्यातील दिवाळीची आगळी-वेगळी वैशिष्ट्ये, जिल्ह्यातील दीपावलीच्या अनोख्या परंपरा, दिवाळीच्या निमित्ताने घराघरातून केले जाणारे खमंग फराळ, खाद्यपदार्थ खास अहिल्यानगरमध्येच दिसतील. त्यातून निर्माण झालेली जगभर ओळखलेली वैशिष्ट्यपूर्ण खाद्यसंस्कृती. या दीपोत्सवाच्या निमित्ताने जिल्ह्याने सामाजिक भान जपत वैशिष्ट्यपूर्ण नवनवीन उपक्रम राबविले आहेत.

दीपोत्सवाच्या संदर्भाने विचार करता मानवाच्या उत्क्रांतीत मध्याश्मयुग (Mesolithic Age) हे अत्यंत महत्वाचे आहे. मध्याश्मयुग म्हणजे इसवीसन पूर्व आठ हजार ते इसवीसन पूर्व चार हजार वर्षांपूर्वीचा काळ होय. मध्याश्मयुगीन मानवाच्या वैशिष्ट्यात दीपावली सणाची पूर्वपीठिका सापडते. याच काळात मानवाला



अग्नीचा शोध लागला, तर मध्याश्मयुगाच्या शेवटच्या काळात शेतीचा शोध लागला. मात्र त्याला त्या अग्नीचा उपयोग करायला नवाश्मयुग उजेडावे लागले; नवाश्मयुग (Neolithic Age) म्हणजे इसवीसन पूर्व चार हजार ते इसवीसन पूर्व एक हजार वर्ष हा काळ. शेतीमुळे मनुष्यजीवनास स्थैर्य प्राप्त झाले व समूहाने गावात राहण्यास सुरुवात झाली. अग्नी, शेतीचा शोध आणि शेतीमुळे गाव वसाहतीतील स्थिर जीवन या सर्वांचा थेट दीपोत्सवाशी संबंध आहे. या काळातील मानवाची हत्यारे आपल्या नेवाशात आणि गोदावरी खोऱ्यात सापडली आहेत. म्हणून या अहिल्यानगर जिल्ह्यातील दिवाळी सणाला इतका मोठा पूर्व इतिहास असलेला सापडतोय. हे या दीपोत्सवाचे वेगळेपण आढळते.



आपल्या संस्कृतीत दिव्यांना मोठे महत्त्व आहे. इसवीसन पूर्व अडीच हजार ते दीड हजार वर्षांपूर्वी सिंधू संकृतीतील जोर्वे, नेवासे आणि दायमाबाद या अहिल्यानगर जिल्ह्यातील प्राचीन नगरमधील समाजजीवनात मातीचे विविध खेळणी सापडली आहेत. त्या अवशेषात पुरातत्त्व संशोधकांना मातीच्या दिव्यांचे अवशेषही मिळालेत. त्यावरून प्राचीन काळापासून मानवाचा दिव्याशी असणारा घनिष्ट संबंध होता, हा तर्क लावतो येतो. मानवाचा दिव्याशी जन्मापासून मृत्यूपर्यंत आलेला संबंध मोठ अनोखा होता.

आपल्याकडे दीप वा दिवा हा ज्ञान, विवेक आणि उजेडाचे प्रतीक म्हणून ओळखला जातो. तो आध्यामिक साधनांचा अंतिम आधार आहे. मातीचा लहानसा दिवा त्याचा तेजस्वी ज्योतीने अंधाराला छेदतो; प्रकाशाचे किरण पसरवतो. आपल्या सांस्कृतिक परंपरेत दिव्याचे महत्त्व इतके आहे की, पवित्र कार्यात दिव्याचा वापर करतो. म्हणून तो सामर्थ्याचे प्रतीक आहे. दिवे लावण्याच्या परंपरेच्या संदर्भात दररोज वापरले जाणारे दैनिक साधन आणि नैमित्तिक म्हणजे खास प्रसंगी वापरला जाणारा दिवा अशी सामान्यपणे विभागणी करता येईल. दिवाळीचा दीप हा दुसऱ्या प्रकाराशी नाते सांगतो. अहिल्यानगर जिल्ह्यात प्राचीन व मध्ययुगीन काळात अप्रतिम स्थापत्य वापरून सुंदर मंदिरे उभारलीत. त्यातील खास देवीच्या आणि शिवालयातील मंदिरासमोरील भल्या थोरल्या उंच दीपमाळा पाहावयास मिळतात. तिथे शेकडो दीप ठेवण्याची व्यवस्था आढळते. ते दीप दिवाळीचे की धार्मिक इतर कार्यक्रमाचे!.

अहिल्यानगर जिल्ह्यातील दिवाळी ही शेती, श्रद्धा आणि सामाजिक एकतेचा संगम आहे. ती फक्त दिव्यांचा नव्हे, तर मातीचा, संस्कृतीचा आणि श्रमाचा सण म्हणूनही ओळखली जाते. अहिल्यानगर जिल्ह्यातील दिवाळीचे स्वरूप मराठी लोकपरंपरा, ग्रामीण जीवनशैली आणि आदिवासी प्रभाव यांनी प्रभावित आहे. आपल्या समाजाच्या संस्कृतीचे महत्त्वाचे अंग म्हणजे सण, उत्सव, सोहळे होय. जिल्ह्यातील दिवाळी सणाचे वेगळेपण हे या भागाच्या इतिहास, परंपरा आणि ग्रामीण संस्कृतीशी घट्ट जोडलेले आहे. अहिल्यानगर परिसरातील काही वारसा स्थळांवर दिवाळीत तोफांचा सण आणि दिव्यांची रोषणाई परंपरेने केली जाते. जिल्ह्यातील साहित्यात Feasts and Festivals - Maharashtra Gazetteers मध्ये निदर्शित आहे की, दिवाळी म्हणजे lights चा सण असून तो आषाढच्या कृष्णपक्षाच्या तृतीयेपासून सुरू होतो. तो पुढे चार ते पाच दिवस चालतो. या गॅझेटमध्ये नमूद आहे की, जिल्ह्यात लोक विविध धार्मिक विधी, घरघराबाहेर दिवे लावणे, लोक मैत्रीपूर्ण गोष्टी व उत्सव साजरे करतात. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाच्या दिवाळी वर्णनात म्हटले आहे. महाराष्ट्रातील सामान्य दिवाळीमध्ये वसुबारस, धनत्रयोदशी, लक्ष्मीपूजा, दिव्यांची रोषणाई या विधी प्रचलित आहेत. दिवाळीचे मराठी स्वरूप Divali in Maharashtra या स्रोतात स्पष्ट केले आहे की, मराठी घरांमध्ये हा उत्सव वसुबारसापासून सुरू होतो. महानुभाव पंथाच्या इतिहासातील काही नोंदींनुसार, त्यांनी 'अनेक दिवाळीचा उत्सव नगर जिल्ह्यातील डोमेग्राम आणि आंबा, शेकटा किंवा नागलवाडी येथे साजरा केला होता,' यावरून या जिल्ह्याचा दिवाळीशी एक जुना संबंध दिसून येतो.

वाघबारसची अनोखी परंपरा. आदिवासी लोकसंस्कृतींचा आविष्कार. अहिल्यानगर जिल्हा हा प्रथा व परंपरेने नटलेला जिल्हा आहे. येथे आदिवासी क्षेत्रात वाघबारसची अनोखी परंपरा ही दिवाळीची सुरुवात समजली जाते. अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर आणि अकोले तालुका हा आदिवासीबहुल क्षेत्र म्हणून ओळखले जाते. या भागात वैशिष्ट्यपूर्ण दिवाळी सण हा साजरा केला जातो. अकोले तालुक्यातील पिंपरकणे बितका, शेणित, घाटघर, रतनवाडी, हरीश्चंद्रगडाच्या पायथ्याजवळील पेठियाची वाडी, देवगाव, म्हैसबन भागातील परिसरात आदिवासी समाजबांधव वाघबारसची अनोखी परंपरा दिवाळीच्या निमित्ताने पाळतात. आदिवासी वाघांचे पूजन करून दिवाळीची सुरुवात केली जाते. आदिवासींच्या जीवनात विशेष महत्त्व असलेला हा दीपोत्सव आहे. यावेळी नवस फेडला जातो. हिंस्र पशुपासून आपल्या कुटुंबाचे व जनावरांचे संरक्षण करण्यासाठी वाघाला कोंबडा व बोकडाचा नैवेद्य दाखवला जातो.

याशिवाय डांगर-खीर हाही नैवेद्यात असतो. वाघ देवतांची मंदिरे तालुक्यात बऱ्याच ठिकाणी दिसतात. घाट रस्त्यावर, सह्याद्रीच्या रानावनात वाघोबांच्या मूर्त्या लाकडावर वाघोबाची चित्र कोरीव काम करून शेंदूर लावून ठेवतात. ते पेठीयाच्या वाडीजवळील भैरवनाथाच्या कला लगडावर म्हणजे कोंबड किल्ल्यावर गावकरी जातात. कोंबडा, बोकड कापून नैवेद्य दाखवतात. पाचनईजवळ कोंड्याच्या कुंडातील घराजवळ वाघबारस साजरी होते. प्रत्येक घरातून एक कोंबडा नैवेद्य द्यावा लागतो. कोंबडा दिला नाही, तर रात्री वाघ घराजवळ येऊन कोंबडा पळवतो. वनातून लाकूड फाटा आणल्यानंतर त्याच्या घराजवळ वाघ गुरगुरतो. पाळीव प्राण्यावर हल्ला करतो. अशा आख्यायिका जुन्या जाणत्या आदिवासींकडून ऐकायला मिळतात. हा मोठा उत्सव असतो. गुराखी वाघोबाचे मंदिर परिसर गाईच्या शेणाने, गोमुत्राने ती जागा पवित्र करतात. रांगोळी, फुलांच्या माळा लावल्या जातात. देवांना शेंदूर लावला जातो. गावात, देवळात शेकोटी पेटवली जाते. लोक जमतात. गुराखी आपल्यापैकी एकाला वाघ बनवतात. त्याला पळायला लावतात. आमच्या शिवारी येशील का? विचारले जाते. वाघ झालेला गुराखी नाही, नाही. म्हणतो नारळ फोडून देवाची पूजा केली जाते. पाया पडून ते पुढील प्रमाणे आराधना करतात. आमचे व्यवहारांचे, गुराढोरांचे खाड्या जनावरांपासून रक्षण कर! आम्हाला चांगले पीक येऊ दे. जनावरांना आजारांपासून दूर ठेव. आदिवासी तरुण सण मागतात. गुरांची देवाची पूजा केली जाते. गोडधोडीचा नैवेद्य दाखवतात. मग तरुण-तरुणी चाल धरून रंगीबेरंगी कपडे घालून आपल्या पाड्यावर नाचकाम करतात. त्यावेळी मोरांची, बदकाची, लावरी चाल, पायाची, देवाची अशा विविध चाली असतात. पुरुषवाडीतील अनोखी दिवाळी, जिथे गावातील लोक एकत्र येऊन आग लावतात आणि सामुदायिकरीत्या अन्न शिजवतात.

अहिल्यानगर जिल्ह्यात शहरी आणि ग्रामीण भागातही दिवाळी मोठ्या धुमधडाक्यात साजरी केली जाते; पण हा दीपोत्सव साजरा करण्याच्या प्रथा परंपरा थोड्या भिन्न पाहावयास मिळतात. त्याचा संबध तेथील स्थानिक इतिहास, प्रथा व परंपरेचा पगडा नाकारता येत नाही. खेड्यात पंधरा दिवसांपासूनच घराघरातून दिवाळीची लगबग सुरू होते. गुराखी दररोज संध्याकाळी एकमेकांच्या गुराच्या वाडग्यात जाऊन दिवाळीची पारंपरिक गाणी म्हणतात -

*दिन दिन दिवाळी,*
*गाई म्हशी ओवाळी.*
*गाई म्हशी कोणाच्या?*
*लक्ष्मणाच्या.*
*लक्ष्मण कोणाचा?*
*आई बापाचा.*
*दे माय खोबऱ्याची वाटी, वाघाच्या पाठीत घालीन काठी.*

**या गाण्याचा अर्थ :** या गाण्यातून दिवाळीच्या दिवसांमध्ये गायी-म्हशींबद्दल आदर व्यक्त केला जातो. ग्रामीण संस्कृतीमध्ये गाय आणि इतर जनावरांना खूप महत्त्व आहे, कारण ती शेतीच्या कामात मदत करतात आणि दूध देतात. त्यामुळे दिवाळीच्या सुरुवातीला त्यांचे पूजन केले जाते.

शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात धार्मिक अधिष्ठान व प्रभाव जादा दिसतो. शहरी भागात त्यानिमित्ताने उपलब्ध वेळ, पैसा असतो. ग्रामीण दिवाळीची वैशिष्ट्य म्हणजे गोवत्स द्वादशी आणि वसुबारस या दिवशी शेतकरी गाई-म्हशींची विशेष पूजा करतात; त्यांना तेल, हळद, कुंकू लावून हार घालतात. धान्य, तूप, कापूस आणि नव्या पिकाची पूजा केली जाते. हे या जिल्ह्यातील शेतीप्रधान जीवनाचे प्रतीक आहे. पाथर्डी, शेवगाव, नेवासा भागात शेतकऱ्यांकडे पाडव्याचा बैल मिरवणूक हा मोठा उत्सव असतो. अहिल्यानगर शहर आणि ग्रामीण भागात फटाके, पणत्या आणि दिव्यांची आरास यात ग्रामीण कलाकुसरीची झलक दिसते, तर फड आणि हरिपाठ या धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन दिवाळीत होते.

स्त्रियांची 'भाऊबीज ओवाळणी' विशेष पारंपरिक पद्धतीने केली जाते. काही ठिकाणी गावातली सख्यांची दिवाळी म्हणून सामूहिक ओवाळणी केली जाते. तसेच येथे खाद्यसंस्कृती आहे. देशी खाद्यपदार्थ आणि फराळ जिल्ह्यातील ग्रामीण भागात दिवाळीची तयारी पारंपरिक स्वरूपाची असते. भाकरी, दाल, भाजी, तिखट, ठेचा; पण मोठ्या शहरांमध्ये आधुनिक फराळ आणि रेडिमेड पदार्थांची मागणी वाढली आहे. त्यातही चकली, लाडू, करंजी यांना जास्त मागणी दिसते. तसेच जिल्ह्यातील मोठ्या शहरात स्वतःचे हाताने फराळ करण्यापेक्षा



बाहेरून आणण्याची पद्धत अलीकडे दिसून येते. स्थानिक मिठाई दुकाने विशेष बॉक्स आणि पारंपरिक पदार्थ तयार करतात. चिवडा, शेव-पापडी, कानकेश्वरचा लाडू आणि बेलीघाटचा करंजा ही स्थानिक चव प्रसिद्ध आहे. त्यासाठी मोठ मोठे ब्रँड तयार झाले आहेत. त्यांची स्वतंत्र ओळख राज्यात आहे. दिवाळीत प्रत्येक घरात गोडान्न, करंजी, चकली, लाडू या पदार्थांची तयारी होते, परंतु नगर जिल्ह्यात तूप आणि ज्वारीच्या पीठाचा वापर अधिक दिसून येतो. सामाजिक-सांस्कृतिक उत्सवाची मोठी रेलचेल असते. अहिल्यानगर, राहाता, संगमनेर, श्रीगोंदा आणि कोपरगाव येथे संघटित दिवाळी स्नेहसंमेलने, कविसंमेलने आणि लोकनाट्य कार्यक्रम होतात. काही भागात अजूनही मातीच्या तेलाचे दिवे वापरण्याची परंपरा टिकून आहे, कारण लोक परंपरा टिकवायची या हेतूने ते जपतात.

अहिल्यानगरमध्ये दिवाळी अद्वितीय स्थानिक परंपरा, चमकदार रोषणाई आणि सामुदायिक उत्सवांसह साजरी केली जाते. नगरमधील दिवाळी ही वारसा विधी आणि आधुनिक उत्सवांचे एक जिवंत मिश्रण असेल. येथे बाजारपेठा आणि खरेदीसाठी मोठी झुबंड उडते. अहिल्यानगरमधील गजबजलेल्या दिवाळी बाजारपेठांमध्ये मिठाई, दिवे आणि पारंपरिक कपडे असतात. या निमित्ताने विविध मंदिरात विधी आणि पूजा केली जाते. फटाके आणि प्रदर्शने असतात. दिवाळी दरम्यान आयोजित फटाके आणि सामुदायिक कार्यक्रम नगरला उजळवतात. नगरमध्ये सांस्कृतिक केंद्रांमध्ये मेळे, संगीत कार्यक्रम आणि नृत्य सादरीकरणे आयोजित केली जातात. येथे अनाथ, निराधार, वंचितांच्या जीवनात आनंद व प्रेम देण्यासाठी सामाजिक भान जपले जाते. येथील विविध स्वयंसेवी संस्थांच्या वतीने चालविली जाणारी बालगृहे आणि अनाथगृहांतील अनाथ व गरीब मुलांसाठी दिवाळीनिमित्त मिठाई, खाऊ; तसेच खेळणी व नव्या कपड्यांसह विविध आवश्यक साहित्याचे वाटप दानशुरांकडून सुरू झाले आहे. विविध सेवाभावी संस्थांनी यासाठी पुढाकार घेतला आहे. काही ठिकाणी दिवाळी साहित्य दिव्यांना (अंध-अपंग) लोकांकडून बनवून विकले जातात. अहिल्यानगरमध्ये अभीरक्षण गृह; तसेच 'स्नेहालय', 'अनामप्रेम', 'सावली'; तसेच जिल्ह्यातील ग्रामीण निवारा केंद्रांसारख्या अनेकविध संस्थांतून गरीब मुलांचा सांभाळ केला जातो. या मुलांच्या शिक्षणासाठी विविध उपक्रम राबवले जातात. दिवाळीनिमित्त यापैकी बहुतांश मुले-मुली आपल्या घरी जातात; पण अनेकजण येथेच राहून दिवाळी साजरी करतात. या मुलांना दिवाळीचा आनंद मनमुराद लुटता यावा, म्हणून सेवाभावी संस्थांच्या वतीने त्यांना विविध खाद्यपदार्थ, नवे कपडे व अन्य जीवनावश्यक गरजेचे साहित्य दिले जाते. सध्या नगरमध्ये विविध संस्थांतून असे उपक्रम सुरू आहेत.

## निवारा बालगृहामध्ये मदत

जामखेड येथील बीड रस्त्यावर असलेल्या ग्रामीण विकास केंद्राच्या निवारा बालगृहातील निराधार, अनाथ, वंचित विद्यार्थ्यांना टोल लॉजिस्टिक इंडिया कंपनीच्या वतीने दिवाळीनिमित्त उबदार कपडे व दिवाळी फराळ वाटप करण्यात येते. सालाबादप्रमाणे कोपरगाव येथील सूर्यतेज संस्थेच्या वतीने दीपावली पाडव्यानिमित्त घर तेथे रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. 'घर तेथे रांगोळी' स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी आपल्या घरासमोरील अंगणात रांगोळी काढली जाते.

शब्दगंध साहित्य परिषद अहिल्यानगरच्या वतीने दीपावली निमित्ताने काव्यसंमेलन असते. ही दिवाळीतील साहित्यिक मेजवानी मोठी आगळी-वेगळी असते. रसिक ग्रुपची दिवाळी पहाट कार्यक्रम जिल्ह्याची सांस्कृतिक ओळख. अहिल्यानगर जिल्ह्यातील सांस्कृतिक ओळख असलेला रसिक ग्रुप, अहिल्यानगरच्या वतीने दरवर्षी दिवाळी पहाट या कार्यक्रमाची गेल्या ३५ वर्षांपासून आयोजन केले जाते. त्यास तमाम अहिल्यानगर जिल्ह्यातील हजारो रसिक श्रोते दरवर्षी उदंड प्रतिसाद देतात. येथे राजकीय दिवाळीची छटाही अनुभवयास मिळते. 'दिवाळीच्या दिवसांत अनेकदा नेतेमंडळी एकत्र येऊन शक्तिप्रदर्शन करतात,' असाही संदर्भ आढळतो. दिवाळी फराळाच्या निमित्ताने राजकीय शक्तीप्रदर्शनही केले जात आहे. दिवाळी, दिवाळीचा फराळ ही खरेतर राजकीय नेते, पदाधिकाऱ्यांसाठी जनसंपर्काची मोठी पर्वणीच ठरू लागली आहे. जिल्ह्यातील अनेक नेते दिवाळी पाडव्याला फराळ मेळावा आयोजित करतात. दिवाळी आणि त्यानंतरचे काही दिवस श्रीरामपूर शहरातील बाजारपेठा राजकीय नेत्यांच्या शुभेच्छा पदयात्रांनी गजबजून गेल्या होत्या.

अहिल्यानगरमध्ये इराण, फ्रान्स आणि अमेरिकी कलावंतांची दिवाळी पहाट मैफल-इराण, फ्रान्स आणि अमेरिकी कलावंतांची दिवाळी पहाट मैफल माऊली सभागृहात होते. संस्कृत, मराठी, हिंदी, उर्दू आणि इंग्रजी भाषेतून भजने व भक्तिगीते या मैफलीत सादर होतात. लोकरंजनाबरोबरच विश्वबंधुत्वाची साद घालणारी संकल्पना दीपावली सरगम प्रभात मैफलीच्या माध्यमातून सरगमप्रेमी मित्रमंडळ आयोजित करतात. संस्कृत, मराठी, हिंदी, उर्दू आणि इंग्रजी भाषेतून भजने व भक्तिगीते गेली जातात.

दिवाळी सणासाठी जिल्ह्यातील फुलांचे आगर. फुलमळे सजतात. अहिल्यानगर तालुक्यातील अकोळनेर, कामरगाव, चास, भोरवाडी पारनेरमधील सुपे, गोरेगाव, हंगा येथे जिल्ह्यात सर्वाधिक फुलांचे उत्पादन घेतले जाते. हा भाग फुलांचे आगर समजला जातो. त्यामुळे कोट्यवधी रुपयांची उलाढाल दिवाळी निमित्ताने होते. तसेच राहाता तालुक्यातील अनेक गावात गुलाब शेती केली जाते. दिवाळी निमित्ताने शेवंती व झेंडू या फुलांना मोठी मागणी असते. शेवंतीचे राजा, गोल्डन, पेपर व्हाईट, चांदणी, भाग्यश्री, सानिया, ऐश्वर्या, पोर्णिमा व्हाईट, येलो, सेंट व्हाईट, ग्रीन व्हाईट, रतला ही लोकप्रिये जातीला मागणी आहे, तर झेंडूमध्ये पिवळा, कलकत्ता, जंबो, मारी गोल्ड, गोल्ड स्पोट, अष्टगंधा, पितांबरी अशा झेंडूच्या वाणाला दिवाळीत उच्चांकी मागणी मिळते. अहिल्यानगर जिल्ह्यातील दिवाळी हे परंपरा व जिवंत लोकसंस्कृतीचे मिश्रण आहे. पुरुशवाडीतील दिवे मागणे, प्रथा स्थानिक खाद्य संस्कृती, गायींची पूजा, सामाजिक भान जपत, पर्यावरणपूरक दीपोत्सव साजरा करण्याची परंपरा येथे आहे.

इंग्रज आमदानीत अहिल्यानगर शहरात नागरशेठ काबरा प्रसिद्ध होते. त्यांचे टोलेजंग ऐतिहासिक वाडे मंडईत आहेत. त्या वाड्यासमोर दिवाळीत अत्तराचे दिवे लावले जात. ते पाहण्यासाठी नगरकर मोठी गर्दी करत असे. दिवाळीत शोभेची दारू, दारूकाम हे राज्यात प्रसिद्ध आहे.

(लेखक हे इतिहास संशोधक आहेत.)

**कोकणातील दिवाळी ही केवळ प्रकाशाचा नव्हे, तर परंपरेचा आणि निसर्गाशी नाते जपण्याचा उत्सव आहे. शेणाने सारवलेल्या अंगणातल्या मंद पणती, बांबूच्या कामट्यांपासून बनवलेला आकाशकंदील, नारळाच्या दुधाने केलेलं अभ्यंगस्नान आणि पोह्यांचा गोड फराळ, हेच कोकणातील 'पारंपरिक' दिवाळीचे खरे सौंदर्य आहे. शहरीकरणाच्या लाटेतही कोकणातील काही वाड्या-वस्त्या आजही परंपरेचा दीप जपून आहेत. साधेपणातली श्रीमंती आणि निसर्गाशी सलोख्याचे नाते जपणारी ही दिवाळी आपल्याला शिकवते, प्रकाश बाहेरचाच नव्हे, आतलाही उजळवा!**

# कोकणातील पारंपरिक दिवाळी

**धीरज वाटेकर**

कोकण हा उत्सवी परंपरा जपणाऱ्या लोकांचा प्रदेश आहे. कोकण रेल्वेच्या आगमनासोबतच इथल्या शहरांचे शहरीकरण सुरू झाले. आता तर ग्रामीण भागाचेही झपाट्याने शहरीकरण होत आहे. असे असले, तरी कोकणातील काही मोजक्या भागात आजही सांस्कृतिक प्रथा परंपरा टिकून आहेत. येथील दिवाळी आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरी होत असते. सांस्कृतिक प्रथा परंपरा जपणाऱ्या कोकणातील घरांसमोर, चौकात, वाड्या-वस्त्यांवर आकाशकंदिलाचा झगमगाट नसला तरी बांबूच्या कामट्यांपासून बनवलेला चांदणीच्या आकाराचा आकाश कंदील पाहायला मिळेल. हा आकाशकंदील आम्हा कोकणवासीयांना पूर्वजांचे स्मरण करण्याची प्रेरणा देतो. गावच्या मंदिरातील दीपमाळा उजळवणे, तांदळाच्या गोड बोरांच्या पारंपरिक फराळाची चव चाखणे, देवदिवाळी, गुरांच्या गोठ्याची पूजा, तुळशी विवाह, शेणाने सारवलेल्या अंगणातील मंद दिव्यांची रोषणाई आदींच्या अनुभूतींसाठी ग्रामीण कोकणातील 'पारंपरिक' दिवाळी आम्हाला जगावी लागेल.



कोकणात दिवाळीची सुरुवात धनत्रयोदशीला होते. तत्पूर्वी वसुबारस झालेली असते. घरे स्वच्छ करून आकाशकंदील प्रज्वलित होत असतो. पूर्वी फटाके दुर्मीळ असले तरी घरोघरी असंख्य पणत्या पेटायच्या. या दिवशी कोकणातील घराघरात बालगोपाळांचे छोटे-मोठे किल्ले जवळपास तयार होत आलेले असतात. आजही ही प्रथा टिकून आहे. ती वर्धिष्णू व्हावी, म्हणून 'किल्ले स्पर्धा' ही आयोजित होऊ लागल्यात. या दिवशी धनाची म्हणजेच श्रीलक्ष्मीची पूजा केली जाते. आजही ही परंपरा कोकणात व्यापारीवर्गाने टिकवून ठेवली आहे. धनत्रयोदशी दिवशी धन्वंतरी पूजनच्या निमित्ताने कडुनिंबाची पाने खाण्याची किंवा तळ कोकणात 'सातवीण' वृक्षाच्या सालीचा रस प्राशन करण्याची प्रथा आहे. दिवाळीत सारे अंगण शेणाने सारवलेले असते. सारवलेल्या जागेवर सुंदर रांगोळी काढलेली असते.

नरक चतुर्दशी हा अभ्यंगस्नानाचा आणि दिवाळीतील महत्त्वाचा दिवस. या दिवशी पहाटे उठून अभ्यंगस्नान केले जाते. हे अभ्यंगस्नान नारळाच्या रसाने करण्याची प्रथा आहे. थंडीच्या दिवसांत त्वचा रूक्ष पडते. त्वचेचा रूक्षपणा घालवण्यासाठी नारळाचे दूध वापरून स्नान केले जाते. स्नानानंतर डाव्या पायाच्या अंगठ्याने कारीट फोडणे या विधीस पारंपरिक मान्यता आहे. कारीट हे कोकणात वेलीवर वाढणारे काकडीसारखी चव असणारे, परंतु कडू फळ आहे. या कडू फळाचा प्रतीकात्मक वध करून मानवी शरीरातील सर्व कटुता आणि वाईट गोष्टी नष्ट होण्यासाठीची प्रार्थना केली जाते. हा विधी नरकासुर वधाचेही प्रतीक मानला जातो. काही भागात आजही अंगणातील तुळशी वृंदावनासमोर 'कारीट' फोडले जाते. घराभोवती कदाचित नसेल; पण तुळशीभोवती शेण सारवून किमान चुन्याची रांगोळी काढलेली असते. दक्षिण कोकणात नरक चतुर्दशीला 'चावदिस' म्हणतात. चावदिस म्हणजे 'चौ दिस'. पंधरवड्यातील चौदावा दिवस. कोकणात पूर्वी आश्विन कार्तिक महिन्यातली थंडी कुडकुडवणारी असायची. प्रसंगी दातावर दात आपटत एकमेकांशी बोलणेही कठीण व्हायचे. दिवाळीपूर्वी कोकणातील घरात भात

(नवान्न) कापून, झोडून, बांधून ठेवलेले असायचे, आजही असते. दिवाळीत गारठवून टाकणाऱ्या थंडीमुळे वातावरण प्रफुल्लित करणारे असते. कानी विविध पक्ष्यांचे मंजुळ स्वर ऐकायला मिळत असतात. चावदिस जवळ आला की नवीन धान्याचे (भाताचे) पोहे करण्यासाठी धावपळ सुरू होते. त्याच्याही अगोदर नवीन भात घरात आले की, व्हायनात कुटून पोहे करायची पद्धत होती. नंतर गावोगावी चक्या, गिरणी झाल्याने हे श्रम कमी झालेत. सिंधुदुर्गातील काही भागात भातापासून तयार केल्या जाणाऱ्या पोह्यांचं महत्त्व आजही टिकून आहे.

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सायंकाळी लक्ष्मीची पूजा करून झाल्यावर प्रसादाला 'साळी' (लाह्या) आणि 'बत्तासे' वाटण्याची प्रथा आजही सुरू आहे. घरात, दुकानात ताटामध्ये पैसे, नाणी ठेवून त्याचीच लक्ष्मी म्हणून पूजा केली जाते. जमा-खर्चाच्या वह्या बदलल्या जातात. कार्तिक शुद्ध प्रतिपदा म्हणजे बलिप्रतिपदेचा दिवस हा, विक्रम संवत्सराचा पहिला दिवस तसेच दिवाळी पाडव्याचा दिवस म्हणून विशेष महत्त्वाचा आहे. कोकणातील बहुतेक मंदिरातील दीपमाळा त्रिपुरारी पौर्णिमेला उजळून निघतात. उजळलेल्या दीपमाळा फारच सुंदर दिसतात. दिवाळीच्या दिवसात कोकणातील मंदिरांतील दीपमाळांवर होणारे दीपोत्सव आवर्जून भेट देऊन अनुभवावेत. कोकणातील शेतकऱ्यांमध्ये नरक चतुर्दशीपेक्षा देवदिवाळीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. दिवाळीच्या सुरुवातीच्या दिवसापर्यंत शेतकरी भाताच्या कापणीत गुंतलेला असतो. देवदिवाळीला घरा-घरात धान्यलक्ष्मीचे आगमन झालेले असते. कोकणात देवादिकांच्या जत्राही देवदिवाळीपासून सुरू होतात. नरक चतुर्दशीप्रमाणे देवदिवाळीलाही काही ठिकाणी अभ्यंगस्नान होते; पण गोठ्यातल्या गुरांचे! गोठ्यात दिवे लावले जातात, ओवाळले जाते. तळ कोकणात देवदिवाळीचा विडे ठेवण्याचा विधीही केला जातो. देवदिवाळीला कृषिप्रधान बळीराजाचे स्मरण केले जाते. 'इडा पीडा टळो, माझ्या बळीचं राज्य येवो!' या उक्तीचा जागर कोकणात देवदिवाळीला होतो.

कोकणातील ग्रामीण भागातील दिवाळी अजून तरी आपली आगळी वेगळी रीत जपून आहे. आम्ही तिच्या आठवणी जपून ठेवल्यात. सुदैवाने आम्ही लहानपणी कोकणातील दिवाळीचा उत्साह जगलो आहे. फराळ, फटाके, नवीन कपडे, अभ्यंगस्नान, भाऊबीज, श्री लक्ष्मीपूजन, दिवाळी पाडवा, किल्ले, तुळशी विवाह आदी दिवाळीच्या रंगांनी आमचे बालपण सुगंधित झालेले आहे. 'स्त्रीजीवन' ग्रंथात साने गुरुजी यांनी भाऊबीज संदर्भाने काही ओव्या दिल्यात. त्या कोकणातील दिवाळीशी आपली भेट घडवतात. सासरी गेलेली बहीण माहेरच्या प्रेमासाठी, भावाच्या भेटीसाठी, त्याच्याकडून निरोप वा पत्र यावे, यासाठी कशी अधीर झालेली असते याचे वर्णन,

*'पूर ओसरले, अजून का न भाई आले।*
*नवरात्र गेले, नेण्याला का न आला।।*
*नदीनाले शांत झाले बहिणीसाठीं।*
*दसरा दूर गेला भाईराया।।'*
*दुपारचे ऊन घाटी डोंगर कोण घेतो*
*बहिणीसाठी भाऊ येतो भाऊबीजे।।*
*दुपारचे ऊन लागते सणसण*
*तांबडें पागोटे उन्हाने भडक्या मारी*
*सुरूच्या झाडाखाली भाईराया।।*
*इथे भेटते. तर शेला घेतो पांघरून भाईराया।।*

या कोकणच्या वर्णनात बहिणीला भाऊ येणार असे तिला वाटू लागल्यानंतरच्या मानसिक स्थितीचे वर्णन आले आहे. अशा कोकणातल्या घरांत दिवाळी झाली तरी दिवाळीचे वातावरण तुळशीच्या लग्नापर्यंत कायम असते. हिरव्या पानांचा साज आणि मंजिरीचे वैभव अंगावर मिरवणाऱ्या तुळशीचे अंगणातील लग्न कोकणात आजही कार्तिकी एकादशीपासून पौर्णिमेपर्यंत हौसेने होत असते. तुळशीच्या मुळाशी चिंचा, आवळे ठेवले जातात. पूर्वी तुलसी विवाहानंतर चिंचा आणि आवळे खायला सुरुवात व्हायची. कोकणात न मिळणारा ऊस आता तुळशीच्या लग्नात मांडवाला असतो. तुळशीच्या पुढ्यात काटक्या रोवून त्याला साडी चोळी नेसवली जाते. गळ्यामध्ये मंगळसूत्र, हार असे दागिने घातले जातात. घराच्या देव्हाऱ्यातला बाळकृष्ण ताम्हानात आणला जातो. दोघात अंतरपाट धरून मंगलाष्टके म्हणून हा विवाह संपन्न आजही होतो. श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानन्दसरस्वती टेंबेस्वामीमहाराज (माणगाव-कुडाळ) यांच्या चरित्राच्या पहिल्या खंडात दिवाळीत तुळशी विवाह हा वाडीवाडीमध्ये साजरा होणारा सामुदायिक सण असल्याचे म्हटले आहे. वाडीतील सर्व मंडळी एकत्र जमून प्रत्येक घरासमोरील तुळशीचा विवाह पार पाडतात. आपले जीवन सुखकर, आनंदी, आरोग्यदायी करणाऱ्या सगळ्या गोष्टी संस्कृतीने पूजनीय मानल्या आहेत. निसर्गावर कुरघोडी न करता त्याच्या हातात हात घालून पुढे जाण्याची आपली परंपरा आहे. फराळात तांदळाची गोड बोरं, गावठी पोह्याचा चिवडा, शंकरपाळ्या, आईला मदत करून बनविलेल्या करंज्या, रव्याचा किंवा बेसनचा लाडू असतो. हा फराळ बनवताना खाण्यातली मजा काही औरच असते. कोकणात साजऱ्या होणाऱ्या दिवाळीत पोह्यांना खूप महत्त्व असते. दिवाळीनंतर गावागावात ग्रामस्थांचे मेळावे होतात. हे मेळावे शक्यतो ग्रामदेवतेच्या देवळात असतात. देवाला गाऱ्हाणे घातले जाते. भांडण तंटे विसरून पुढे जायचे हे कोकणचे वैशिष्ट्य आहे. कोकणात गणेशोत्सवापासून पारंपरिक भजने सुरू होतात. गावागावातील भजनी मंडळी नवरात्रीतही जागर करतात. भातशेतीची कापणी संपताच पिकलेले भात घरात येते. याच धावपळीत दिवाळीचे दिवस सरतात आणि तुळशी विवाहाने कोकणातील दिवाळीची समाप्ती होते.

लहानपणी या दिवाळीचा आनंद मिळवण्यासाठी आधी सहामाही परीक्षेचे अग्निदिव्य पार करावे लागे. आताही लागतेच! जवळपास एकवीस दिवसांची सुट्टी असायची, जी दिवाळीच्या आधी ४-५ दिवस सुरु व्हायची. याही दिवसात घरी आईला कामात मदत करण्यापासून ते किल्ल्याची तयारी करण्यापर्यंत कामे असायची. किल्ल्यासाठी माती आणणे हे महत्त्वाचे काम होते. आता माती शोधावी लागतेय! तेव्हाचे किल्ले साधे असत. त्यात मातीचा डोंगर, पायऱ्या, एखाद-दुसरी गुहा आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे आसन असायचे. आमच्या आयुष्याची पहिली २४ वर्षे कोयना जलविद्युत प्रकल्पाच्या चिपळूण तालुक्यातील अलोरे चाळीत गेलीत. या चाळीतील दिवाळीची मज्जा काही और होती. दिवाळीच्या पहाटे सगळ्यांचे

दरवाजे उघडायचे ते रात्री अकरा बारा वाजताच बंद व्हायचे. कोणीही कोणाच्याही घरात ये-जा करायचे. एका घरातील वस्तू, पदार्थ, जिन्नस अनेक घरात फिरायचे. कसलाही औपचारिकपणा नव्हता. धड्डुडुम्म् करून मोठा आवाज व्हायचा आम्ही अर्धवट झोपेतून जागे व्हायचो. अभ्यंगस्नान झाल्यावर फटाके निवडणे, माळा सोडवणे चालायचे. लवंगीची माळही सोडून वेगळी केली जायची. हे सर्व फटाके, एक माचीस आणि एक-दोन उदबत्या पिशवीत भरून आमची वरात गल्लीतून फिरायची. घरात वडील एकटे कमावणारे असतानाही दिवाळी दणदणीत साजरी व्हायची. आनंदाला पारावार नसायचा. लहानपणी टिकल्या उडवणारे पिस्तूल, टिकल्यांच्या डब्या, टिकली रोल, उंचावर फेकून जमिनीवर आपटल्यावर वाजणारे रॉकेट, नागगोळी, साधा फुलबाजा, पाऊस, भुईचक्र, आपटीबार, लवंगीबार, लक्ष्मी बॉम्ब, सुतळी बॉम्ब आदी फटक्याचे प्रकार वापरलेले आठवतात. चिमणी किंवा सुटे लवंगी हातात पेटवून ते वरती फेकायचे असा अनेकांचा आवडता खेळ होता. लक्ष्मी बॉम्ब हा अंगणात अधिक कचरा करायचा म्हणून तो अधिक आवडायचाही! नरकचतुर्दशीच्या पहाटे अभ्यंगस्नानापूर्वीच पहिला फटका कोण उडवणार? याची जणू स्पर्धा लागलेली असावी, असे दिवस आम्ही अलोरे कॉलनीत अनुभवलेत. या दिवसात कोकणातील व्हाळाला पाणी असायचं! त्या पाण्यात मजा चालायच्या. पावसाळ्यात मजा करण्याची हिंमत नसायची. 'व्हाळ' हा शब्द बहुधा 'ओहोळ'वरून आला असावा, तर यातल्या काही व्हाळावर साकव असायचा. साकवावरून चालताना काय मस्त वाटायचं सांगू? छोटासा पूल, पाण्याचा खळाळता प्रवाह, प्रवाहातले दगड! दुर्दैवाने आज या व्हाळाचे नाले झालेत. आमचं मन मात्र व्हाळाला 'नाला' म्हणायला कचरते, अशी दिवाळी आम्ही अनुभवलीय!



कोकणातील पूर्वीची घरे चौकोनी कलाकुसरीचा जणू देखावा होती. काही गावांमध्ये आजही ती बघायला मिळतात. अशा घराच्या भिंती मातीच्या किवा विटांच्या मापानी बनवलेल्या असायच्या. त्यांना शेणामातीने सारवून गुळगुळीत केलेले असायचे. वरती कौलारू छत आणि वलई करून पायाखालची जमीनही शेणाने सारवलेली असायची. घराचे मुख्य प्रवेशद्वार एकटे नसे. दोन दरवाजे असते. तिथून आत आल्यावर पडवी, ओटी पडवी, माजघर, स्वयंपाकघर असायचे. स्वयंपाकघरात पूर्वेला चूल मांडलेली असायची. जवळच लोखंडी चिमटा, माचीसचा बॉक्स, रॉकेलचा दिवा, फाट्याचा (सरपणासाठी सुकी लाकडे) ढिग असायचाच! एखादे काळे पडलेले तपेले सदैव पाणी भरून चुलीवरच ठेवलेले पाहायला मिळायचे. स्वयंपाकघरात तेव्हा पाटा-वरवंटा यांचे राज्य होते. न्हाणीघर आणि शौचालय एका कोपऱ्यात किंवा घराबाहेर असायचे. अशा कोकणातील घराचा माळा म्हणजे जणू अलिबाबाची गुहाच! नित्य आवश्यक नसलेले साहित्य माळ्यावर ठेवले जायचे. हा माळा म्हणजे 'काळ आलेल्या वस्तूंची जागा' असं पूर्वीच्या आज्यांच्या तोंडून ऐकलेले आठवते.

दिवाळीला तिथे नारळाच्या झावळ्यांपासून बनवलेल्या छोटेखानी वस्तू असायच्या. न्हाणीघरात केलेले अभ्यंगस्नान आठवते. चोपण्याने चोपून (वलई) खळे (जमीन) आणि शेणाने जमीन सारवली जायची. तेव्हा बालपणी पाहिलेली आणि केलेली ही कामे म्हणजे 'कला'च आहेत, असे आता वाटते. कोकणातील वाड्या वस्तीतील सौहार्दाचे संबंध आजही टिकून असून हा इथल्या ग्रामसंस्कृतीतील शिष्टाचार आहे. 'सामुदायिक आणि वैयक्तिक जीवन विकासाच्या दृष्टीने आपल्या संस्कृतीत सणावारांचे महत्त्व अधिक आहे. व्यक्ती, समाज आणि देश हे परस्परांना पूरक व्हावेत, यासाठी हे दंडक आहेत. प्रकाशमय राहणी म्हणजे दिवाळी. स्वतःचे मालीन्य नाहीसे करण्यासाठी अभ्यंगस्नान करून शुद्ध कपडे घालावे. ज्या घरी आपण राहतो, ते घर स्वच्छ करावे. या सामुदायिक सणांचे वैशिष्ट्य म्हणजे माणसे प्रसन्न व्हावीतच! पण गुरेढोरे, गाई-म्हशी याही सेवेचा बोजा उचलतात. त्यांनाही प्रसन्न करणे हे महत्त्वाचे अंग या सणात आहे. परस्परांची आत्मीयता गुंफून टाकणारा हा सण आहे.' दिवाळी सणाबाबत असे विवेचन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी केले आहे. कोकणभूमी याही तत्त्वाचे पालन करताना आपल्याला दिसते.

कोणताही दिखाऊपणा न करणाऱ्या आणि साधेपणातील जगण्याची श्रीमंती मिरवणाऱ्या कोकणात शेतकरी आत्महत्या होत नाहीत. कमीतकमी संसाधनांत उत्तम कसे जगावे? हे कोकणाकडून शिकावे, असे म्हटले जाते. कोकणातील पारंपरिक दिवाळी निसर्गसमृद्ध असायची. ती अतिशय साधेपणाने साजरी व्हायची. अंगणात एखादा बांबूचा कंदील, एक पणती आणि गिरणीवरून आणलेले नवान्न भाताचे पोहे एवढीच दिवाळी 'गोड' मानलेल्या पिढीने कालचे समृद्ध निसर्गरम्य कोकण सांभाळले! परिस्थिती गरिबीची असली तरी उत्सवाची आणि मनाची श्रीमंती घरोघरी हमखास दिसत राहिली. 'कोकणातील पारंपरिक दिवाळी' लिहिताना कोणत्याही अवास्तव भौतिक अपेक्षांत न अडकता साधे-भोळे जीवन जगलेल्या मागच्या पिढीचे स्मरण महत्त्वाचे वाटते. आजही दारातला उजळलेला 'आकाश कंदील' आम्हाला याचीच जाणीव करून देत असतो. आम्ही कोकणच्या संस्कृतीतील प्रथा परंपरा समजून घेऊन आजकालच्या दिवाळीत शाश्वत जीवनशैलीची ज्योत 'प्रज्वलित' करायला हवी!

(लेखक हे गेली २८ वर्षे पत्रकार म्हणून कोकण इतिहास व संस्कृती, ग्रंथ चळवळ, पर्यटन, निसर्ग आणि पर्यावरण आदी सामाजिक जागृतीपर विषयात कार्यरत आहेत.)

दिवाळी म्हणजे आनंदाचा, प्रकाशाचा आणि आपुलकीचा सण.
हिंदू संस्कृतीत या सणाला सणांचा राजा म्हटलं जातं. दिव्यांच्या प्रकाशाने अंधार दूर करणारा, मनामनात आशेचा दीप प्रज्वलित करणारा हा सण प्रत्येकाच्या आयुष्यात नवी ऊर्जा निर्माण करतो.

# प्रकाश आणि प्रेमाचा दिवाळ सण!

**बापू दासरी 'उमाग्रज'**

संत ज्ञानेश्वर म्हणतात, 'मी अविवेकाची काजळी, फेडुनी विवेकदीप उजळी; तै योगिया पाहे दिवाळी निरंतर.' या अर्थाने दिवाळी केवळ बाह्य प्रकाशाचा नाही, तर अंतर्मनातील अंधार दूर करून विवेक आणि ज्ञानाचा दीप प्रज्वलित करण्याचा सण आहे.

तुकाराम महाराज त्यांच्या अभंगातून म्हणतात, दिवाळी सणाच्यावेळी सासरी गेलेल्या मुलींना माहेरची ओढ लागते आणि त्या माहेरी जाण्यासाठी आतुरतेने वाट पाहतात. या ओळीतून संत






तुकारामांच्या एका अभंगातून हा विचार व्यक्त होतो. संत तुकाराम महाराज यांच्या 'भेटीलागी जीवा, लागलीसे आस' या अभंगातील हा भाग आहे, जिथे मुलीच्या माहेरच्या ओढीची तुलना एका भुकेलेल्या बाळाच्या आईची वाट पाहण्याशी केली आहे. 'माहेरच्या मुळा, लेकी आसावली, पहाते वाटुली...'

### परंपरेचा आनंद आणि सामाजिक बंध

पूर्वी दिवाळीचा सर्वात मोठा आनंद एकत्र कुटुंब पद्धतीत अनुभवला जात असे. सासरी गेलेल्या मुलींना दिवाळीसाठी मूळ पाठवून माहेरी बोलावले जात असे. या निमित्ताने त्या काही दिवस सासरच्या जबाबदाऱ्यांपासून मुक्त होत आणि माहेरच्या प्रेमात वेळ घालवत.

त्याकाळी नवीन कपडे केवळ गुढीपाडवा, दसरा आणि दिवाळीपुरतेच खरेदी केले जात. भेटवस्तू, फराळ, शुभेच्छा पत्रे आणि एकत्र बसून गप्पा मारण्याच्या प्रथा लोकांना अधिक जवळ आणत. आज सोशल मीडियाच्या युगात या अनेक परंपरा हरवत चालल्या आहेत.

## वसुबारस

दिवाळीची सुरुवात गाय व वासराचे पूजन करून पशुधनाचे महत्त्व आणि समृद्धीची कामना केली जाते.

## धनत्रयोदशी

आरोग्य आणि संपत्तीचा दिवस. भगवान धन्वंतरी व देवी लक्ष्मीची पूजा केली जाते. यमदीप प्रज्वलित करून अकाली मृत्यू टाळण्याची प्रार्थना केली जाते. समुद्रमंथनातून भगवान धन्वंतरी अमृताचा कलश घेऊन प्रकट झाले होते, म्हणून या दिवसाला धन्वंतरी जयंती असेही म्हणतात.

## नरक चतुर्दशी (छोटी दिवाळी)

चांगल्याचा वाईटावर विजय साजरा करणारा दिवस. श्रीकृष्णाने नरकासुराचा वध केल्याच्या स्मरणार्थ अभ्यंगस्नान व फटाक्यांचा जल्लोष केला जातो. नरक चतुर्दशीच्या अभ्यंगस्नानाची तयारी घरातील महिला धनत्रयोदशीच्या दिवशी संध्याकाळपासून सुरू करतात. अभ्यंगस्नान करावयासाठी लागणारी भांडी चुन्याने रंगवून त्यावर हळद, अक्षदा आणि कुंकवाने त्याचे काठ रंगवले जातात. त्यानंतर अत्तर, सुगंधी तेल मिसळून उटणे तयार केले जाते. अभ्यंगस्नानापूर्वी सर्वांगाला उटणे लावून घरातील महिला, लेकी आपल्या वडीलधाऱ्यांना उटणं लावतात, मग सकाळी-सकाळी आकाशात चांदणी असताना अभ्यंग स्नान केले जाते.

## लक्ष्मीपूजन (कार्तिक अमावस्या)

दिवाळीचा मुख्य दिवस. घराघरांत लक्ष्मी-गणेश पूजन, दिव्यांची रोषणाई, रांगोळ्या आणि खातेपूजन केले जाते. व्यापारी नवीन आर्थिक वर्षाची सुरुवात करतात. मंत्रोच्चार करून लक्ष्मीपूजन केल्यानंतर आरती होते. ही आरती करताना भव्य स्वरूपात फटाके वाजवून रोषणाई केली जाते व लक्ष्मीपूजनाचा आनंद व्यक्त केला जातो. ज्या दुकानासमोर खूप जोरात फटाके वाजत आहेत, तेथील लक्ष्मीपूजनानंतरची आरती चालू आहे हे लक्षात येते. या दिवशी घरात दिवे लावले जातात, रांगोळी काढली जाते आणि कुटुंबे एकत्र पूजा करतात. दुकान, ऑफिसमध्ये केळीचे मोठमोठे खांब लावून लक्ष्मीपूजन करण्याची प्रथा आहे.

## दिवाळी पाडवा (बलिप्रतिपदा)

पती-पत्नीच्या नात्याचा दिवस. पत्नी पतीला ओवाळते आणि भेटवस्तू देते. व्यापाऱ्यांसाठी नवीन वर्षाची सुरुवात हा दिवस मानला जातो. दिवाळी पाडवा, ज्याला बलिप्रतिपदा असेही म्हणतात. हा दिवाळीतील एक महत्त्वाचा दिवस आहे. हा दिवस कार्तिक महिन्याच्या शुद्ध प्रतिपदेला येतो. हा दिवस पती-पत्नीच्या नात्याला समर्पित दिवस आहे.

दिवाळी पाडव्याचा मुहूर्त साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त मानला जातो. घराघरात दिव्यांची आरास केली जाते आणि रांगोळ्या काढल्या जातात.

## भाऊबीज

भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा सण. बहीण भावाच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करते आणि त्याला ओवाळते. हा दिवस त्यांच्या बंधाला अधिक दृढ करतो. बहीण भावाच्या दीर्घायुष्यासाठी आणि आरोग्यासाठी प्रार्थना करते. या दिवशी मनातील द्वेष आणि नकारात्मकता दूर होऊन प्रेम आणि बंधुभाव निर्माण होतो, असे मानले जाते.



भाऊबीज यमराज आणि यमुनेच्या कथेमुळे महत्त्वपूर्ण मानली जाते, असेही म्हटले जाते. बहीण भावासाठी ओवाळणीची थाळी तयार करते. ती भावाला रंगरंगोटीने सजवलेल्या पाटावर बसवून त्याचे औक्षण करते. बहीण भावाची आरती करून त्याच्या कपाळाला कुंकू आणि तांदूळ लावते. यावेळी ओवाळताना बहीण 'ईडा पिडा टळू दे बळीचं राज येऊ दे' असं ती म्हणते. सोन्याची अंगठी भावाच्या डोक्यावरून फिरवते व स्वतःच्या कपाळाला लावते.



त्यावेळी भाऊ आरतीच्या तबकात ओवाळणी टाकतो. आरतीनंतर बहीण भावाला गोडधोड भरवते. भाऊ आपल्या बहिणीला भेटवस्तू देतो आणि तिला वडिलांचा आशीर्वाद मिळतो. काही ठिकाणी, बहीण प्रथम चंद्रकोरीला आणि नंतर भावाला ओवाळते.

नांदेड येथे जगप्रसिद्ध तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारा असून येथे दिवाळी वेगळ्या व जल्लोषपूर्ण वातावरणात साजरी होते. या गुरुद्वारात दिवाळीनिमित्त 'दीपोत्सव' साजरा केला जातो. ज्यात गुरुद्वारा दिव्यांनी उजळून निघतो. या दरम्यान 'हल्लाबोल' मिरवणूक आणि इतर धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. ज्यात निहंग आणि इतर शीख समाजाचे लोक सहभागी होतात.

दिवाळीच्या काळात गुरुद्वारामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, जसे की नगर कीर्तन आणि विविध उत्सव साजरे केले जातात. तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारामध्ये शबध कीर्तन पार पाडले जाते. त्यामुळे नांदेड येथील दिवाळी साजरी करण्याच्या प्रथेस अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे.

## बदलत्या काळातील दिवाळी

आज दिवाळी साजरी करण्याच्या पद्धतीत मोठा बदल झाला आहे. अनेक ठिकाणी दिवाळी पहाट कार्यक्रम आयोजित केले जातात, ज्यात संगीत, नृत्य आणि नाटकांच्या मैफिली असतात. परदेशात राहणारी मुले-भावंडे व्हिडिओ कॉलद्वारे शुभेच्छा देतात आणि बहीण भावाला ऑनलाइन ओवाळते.

तथापि, आधुनिक जीवनशैलीमुळे काही सुंदर प्रथा हरवत चालल्या आहेत. फराळाला बोलावण्याची परंपरा, शुभेच्छापत्रे पाठवण्याची सवय आणि सामाजिक संवाद यांची जागा आता मोबाईल आणि सोशल मीडियाने घेतली आहे. तरीही, नवीन कपडे, घराची रंगरंगोटी, रोषणाई आणि कुटुंबीयांशी भेट यांचा आनंद आजही तेवढाच जिवंत आहे.



## दिवाळीचे वास्तव

दिवाळी काहींसाठी खर्चिक सण ठरतो. अनेकांना कर्ज घ्यावे लागते; पण तरीही लोक आनंदाने साजरी करतात. याच संदर्भात माझ्या गझलेतील एक शेर असा - मनात होते करू साजरी छान दिवाळी, आठवते का, चिंतेतच या दसरा गेला. दिवाळी हा फक्त सण नाही, तो आपल्या संस्कृतीचा आत्मा आहे. अंधार कितीही गडद असला तरी ज्ञानाचा प्रकाश त्याला छेदून जातो हेच दिवाळी शिकवते.

आपुलकी, कुटुंबीयांशी एकोप्याचा आनंद, समाजाशी जोडलेपण, आणि नवीन आशा, हे सर्व दिवाळीच्या दीपांप्रमाणे आपल्या जीवनाला उजळतात. म्हणूनच प्रत्येक वर्षी दिवाळी आपल्याला नव्या उमेदीने जगायला शिकवते आणि सांगते, 'प्रकाश व्हा, आनंद वाटा आणि प्रेम पसरवा!'

(लेखक हे मराठीतील प्रथितयश कवी,
गझलकार, निवेदक आणि सेवानिवृत्त
समाजकल्याण अधिकारी आहेत.)

**दिवाळी म्हटलं की, डोळ्यांसमोर येतात उजळणारे तेजोमय दिवे, दारातली सुबक रांगोळी, घराघरातील कंदील, पणत्या, सुगंधी उटण्याची अंघोळ आणि त्यानंतर प्रसन्न वातावरणात दरवळणारा फराळाचा सुवास!**

# सण स्नेहाचा, दिवाळी फराळाचा!

**वर्षा फडके – आंधळे**

दिवाळी सणाचं खरं वैशिष्ट्य म्हणजे फराळ, नानाविध प्रकारचे लाडू, करंजी, अनारसे, शंकरपाळी, चकली आणि गोडधोडाने भरलेले ताट हे आहे; पण दिवाळीचा अर्थ फक्त प्रकाश, रांगोळी आणि नवीन कपडे एवढाच नाही, तर प्रेम, आपुलकी आणि स्नेहाचा सुवास घराघरात दरवळवणं, हेच त्याचं खरं सौंदर्य आहे.

पूर्वीच्या काळी दिवाळीचा फराळ बनविणे हा केवळ स्वयंपाक नव्हता, तर तो एक भावनिक सोहळा होता. आई, आजी आणि घरातील महिला आठ दहा दिवस आधीपासून तयारी सुरू करत असत. मसाले भाजणे, पीठ चाळणे, तुपाचा सुगंध संपूर्ण घरात दरवळत असे. यात विशेष गंमत म्हणजे शेजारच्या गृहिणीदेखील मदतीला येत असत. त्यामुळेच या सणाला सहकार्याची, स्नेहाची आणि आपलेपणाची सुंदर किनार लाभत असे. त्या गप्पा, हशा आणि करंज्यांच्या कडा दाबताना होणारा संवाद हे सगळं म्हणजे दिवाळीची खरी ऊब होती.





दिवाळी फराळ बनवणं हा पूर्वी प्रत्येक घरात दुपारच्या वेळी ठरलेला कार्यक्रम असायचा. दिवाळी जवळ आली की सुमारे आठ ते दहा दिवस आधीपासूनच ही लगबग सुरू व्हायची. घराघरांतून तुपाचा, भाजलेल्या पिठाचा आणि साजूक गोडधोडाचा सुगंध दरवळू लागायचा. प्रत्येक घरात फराळाचा काहीतरी प्रकार सुरू असायचा.



कोणी लाडू वळण्यात, तर कोणी शंकरपाळे तळण्यात पारंगत. काहींना चकल्या फिरवण्यात तरबेजी असायची. त्यांच्या या कौशल्यामुळे त्या महिलांना गल्लीत सर्व घरांतून बोलावणं यायचं.

आज आमच्याकडे चकल्या, उद्या तुमच्याकडे लाडू! अशा गप्पा-टप्पांमध्ये फराळाची मजा दुप्पट व्हायची. या तयारीतून फक्त फराळच नव्हे, तर आपलेपणाच्या नातेसंबंधांची गोडीही निर्माण होत असे.



एकत्र काम करताना हसणं, गप्पा मारणं, एकमेकांचं सुख-दुःख शेअर करणं या सगळ्यामुळे स्त्रियांचं बाँडिंग अधिक घट्ट व्हायचं. ही फराळाची दुपार म्हणजे एक प्रकारे कीटी पार्टीसारखाच आनंदसोहळा असे.

मला आठवतं, आई फराळ करताना आम्हाला लाडू वळायला सांगायची. मी गोल लाडू बनवायचा प्रयत्न करे, बहुतेक वेळा तो काही जमत नसे. त्यामुळे सगळे मी वळलेले लाडू मोडून टाकायचे. पण आई म्हणायची,लाडू मोडला तरी काय झालं, महत्त्वाचं म्हणजे त्यातलं गोडपण आणि तुझे प्रयत्न करणं! आणि खरंच, कालांतराने आपसुकच अगदी सहज लाडू बनवायला यायला लागले.

मला आठवतंय, शंकरपाळे तळताना आजी नेहमी म्हणायची, तळताना लक्ष हवं, नाहीतर काळे पडतील. नंतर समजलं, तिचं वाक्य केवळ स्वयंपाकापुरतं नव्हतं, ते आयुष्याचं तत्त्वज्ञान होतं. काम कितीही लहान असो, लक्ष नसेल तर केलेल्या कामाचं समाधान मिळत नाही. दिवाळीच्या आदल्या दिवशी संध्याकाळी आई नेहमी लहान लहान ताटांत फराळ वाटायची आणि म्हणायची, दिवाळीत गोड देणं म्हणजे केवळ पदार्थ देणं नाही, तर मन गोड करणं असतं. तो धडा आजही मनात कोरलेला आहे. फराळ हा केवळ चवीचा नाही, तर तो संस्कारांचा सण आहे. दिवाळ सणात फराळ वाटपाचाही एक सोहळा असायचा. आई शेजाऱ्यांच्या घरी फराळाचं ताट घेऊन जायची आणि म्हणायची, आमच्या घरचा फराळ! त्या फराळात केवळ पदार्थ नसत, तर आपुलकी, स्नेह आणि एकत्रतेचा गंध मिसळलेला असायचा.

आज काळ बदलला आहे. गर्दीचं जीवन, नोकरी आणि वेळेअभावी घरचा फराळ आता कमी आणि दुकानातील फराळाचे पॅकेट्स अधिक दिसू लागले आहेत. फराळ आता 'रेडी टू इट' आणि हवे तेव्हा उपलब्ध होऊ लागला आहे; पण त्यातला मायेचा स्वाद मात्र हरवतो आहे. पूर्वी आईच्या हातच्या लाडवाचा तुकडा म्हणजे प्रेमाचा घास होता, तर आता तो 'बेस्ट बिफोर डेट' असलेले उत्पादन



बनला आहे; पण हे बदल अटळ आहेत. तरीही या सर्व बदलांमध्ये एक गोष्ट कायम आहे फराळाची भावना.

दिवाळी हा एकत्र येण्याचा, सुख-दुःख वाटून घेण्याचा सण आहे. आजही दिवाळीत फराळाचे ताट शेजाऱ्यांना दिले की, त्यामागे असलेली भावना हेच सांगते की आपण सगळे एकमेकांच्या सुखदुःखाचे वाटेकरी आहोत.

दिवाळी हा सण केवळ दिव्यांचा नाही, तर मनांमधील प्रकाश प्रज्वलित करणारा सण आहे. अंधारावर प्रकाशाचा, दुःखावर आनंदाचा आणि एकटेपणावर आपलेपणाचा विजय साजरा करण्याचा हा सण आहे.आणि म्हणूनच की काय या सणाला सणांचा राजा असे पण म्हणत असतील.

दिवाळी सणामध्ये आपण पुन्हा एकदा त्या जुन्या आठवणी उजाळूया, आठवणीने फराळ बनवूया, शेजारधर्म आणि त्या सुगंधाने भरलेला सण पुन्हा मनात उजळवूया...



उपसंचालक (वृत्त)

**आदिवासी समूहात सामूहिक पद्धतीने दिवाळी साजरी केली जाते. याला गावदिवाळी असे म्हणतात. देहवाली भिल्ल समूहात शेतातील नवीन पिके पिकून आल्यावर या नवधान्याची पूजा केल्याशिवाय हा समूह नवीन अन्न ग्रहण करत नाही. दिवाळीच्या निमित्ताने या नवधान्याची पूजा झाल्यावरच तो नव्या हंगामाचे अन्न धान्य खाण्यास प्रारंभ करतो.**

# नवधान्य आणि सामूहिकतेचा उत्सव

**प्रा. डॉ. फुला बागूल**

गावदिवाळी साजरी करण्यासाठी त्या-त्या खेड्या-पाड्यातील प्रतिष्ठित लोक जमतात. गावदिवाळी साजरी करण्याचा निर्णय होतो. या दिवाळी सणासाठी जो काही खर्च लागणार असेल, त्या खर्चाचा अंदाज बांधून प्रत्येक घरापासून विशिष्ट रकमेची लोकवर्गणी गोळा करतात. ज्याच्याकडे शेती नाही, त्याला त्यात सवलत दिली जाते. संपूर्ण लोकवर्गणी अशाप्रमाणे गोळा झाल्यानंतर दिवाळी कधी साजरी करावी याचा निर्णय घेतात. ज्या दिवशी दिवाळी साजरी करायची असते, त्यादिवशी रात्रभर नृत्य होते. सोंगाड्या पार्टी बोलवली जाते. सोंगाड्या पार्टी रात्रभर आदिवासी भाषेतील संवाद-गीते-नाट्य याद्वारा मनोरंजन करतात. दिवाळीनिमित्त गावात आलेला सोंगाड्या पाहण्यासाठी गावातील व आजूबाजूच्या परिसरातील स्त्री-पुरुष येतात.

सोंगाड्या पार्टी ज्या स्टेजवर होणार असते, त्या स्टेजची पूजा केली जाते. रात्रभर सोंगाड्याचा कार्यक्रम होतो. त्यानंतर पहाटेच्या वेळी गावातील सरपंच/कारभारी किंवा पोलीस पाटील किंवा एखादा प्रतिष्ठित नागरिक नऊ दिव्यांची आरती घेऊन येतो. त्यांच्या घरातील स्त्री ही ओवाळणी करते. ही आरती तांदळाच्या पिठापासून बनवली जाते. ती नऊ दिव्यांची असते. आरती झाल्यावर ती परत कारभाऱ्याच्या घरी जाते.

दुसऱ्या दिवशी सकाळी सर्व लोक व गावातील पुजारी (भगत) गावाच्या बाहेर येतात. गावाच्या सीमेवर असलेल्या देवाच्या ठाण्यावर जातात. या स्थानकाला दिवाळीचा देव म्हटले जाते. या ठिकाणी



पूजेचे साहित्य ऊस, कोंबड्या, बकरा, नारळ ठेवले जाते. आरती ओवाळून पूजा केली जाते. याप्रसंगी पुजारी देवाचे स्मरण करतो. प्रत्येक देवाला दिवाळीसाठी आमंत्रित करतो आणि नव्या पिकाचे म्हणजे ज्वारीचे किंवा भाताचे दाणे ठेवतो याला पात देणे असे म्हणतात. देवाची पूजा करताना डोके उघडे असता कामा नये. ते टोपी अथवा फेट्याने झाकले गेले पाहिजे. गावदिवाळीच्या वेळी खालील पाच देवांना आमंत्रित केले जाते.

१) राजा पांठा - गांडा ठाकूर, २) वाघन्या - धामन्या, ३) ओनदेव -पान देव, ४) गाव हिवाऱ्या - गाव मेढ्या, ५) गाव पांढर.

या देवतांना आमंत्रित करून त्यांची सामूहिक पूजा केली जाते. चुकीचे परिमार्जन केले जाते.



देवांची पूजा झाल्यावर आता आपण या नव्या हंगामातील नवे अन्नधान्य खायला मोकळे झालो, असे समजले जाते. गावदिवाळीच्या निमित्ताने लोक वर्गणीतून घेतलेल्या बकऱ्याचा बळी दिला जातो.

बकऱ्याची शिंगे देवाजवळील झाडाला टांगली जातात. सोबतच कागदाचा घोडा बनवून तोदेखील त्या झाडाला टांगला जातो. बळी दिलेल्या बकऱ्याचे मांस पूजेचा प्रसाद म्हणून प्रत्येक घरी वाटले जाते. घरोघरी गावदिवाळीनिमित्त अतिथी आलेले असतात. त्यांना या मांसाहाराचा पाहुणचार केला जातो. गावदिवाळीच्या निमित्ताने गुल्या मांडा म्हणजे तांदळाच्या पिठाच्या वाफेवर शिजवलेल्या पोळ्या बनवल्या जातात. या निमित्ताने गोड भात बनवला जातो.

नव्याने पिकून आलेल्या तांदळापासून हा भात बनवला जातो. अशा रितीने देहवाली भिल्लांची दिवाळी सुगी संपल्यानंतर साजरी होते. तळोदा परिसरातील अस्तंभा शिखरावर अभिमन्यूच्या दर्शनार्थ दिवाळीप्रसंगी जाण्याची प्रथाही या समूहात आहे. एकत्र येणे, सहभोजन घेणे, करमणूक करणे असा हा त्रिवेणी संगम असतो

## पावरा जमातीची दिवाळी

आदिवासी पावरा जमातीमध्ये गावाची दिवाळी ही एक दिवस ठरवून साजरी करतात. आदिवासीतेतरांची दिवाळी झाल्यानंतर ही गाव दिवाळी सामूहिकपणे साजरी होते. गावामध्ये मृत माणसांचे उत्तरकार्य राहिले असेल, तर ते आधी करून घेतात. एक दिवस गावाचे पुढारी, सगळी माणसे एकत्र जमून दिवाळीचा दिवस ठरवतात.

पहिला दिवस घर सारवणे, बाबदेव पूजन, दुसरा दिवस दिवाळी त्योहार असतो, तिसरा दिवस बैल त्योहार असतो, असे तीन दिवस दिवाळी असते.

दिवाळीच्या दिवशी गावातील वरिष्ठ व्यक्ती, समस्त मंडळी सगळी माणसे घरून मातीने बनवलेला दिवा, घोडा, तांब्यामध्ये पाणी घेऊन बाबदेववर जातात. बाबदेव म्हणजे ठरवलेली एक विशिष्ट जागा. काही दिवसापूर्वी पैसे गावकऱ्यांकडून जमवून बोकड घेतला जातो. बोकड घेऊन जातात. बाबदेवाची पूजा करतात.

पहिल्या दिवशी बाबदेव पूजन होते. गावातील वरिष्ठ व्यक्ती; तसेच पुजारी बाबदेव पूजतो. गावाच्या बाहेर एका विशिष्ट ठिकाणी झाडाखाली (वर्षांनुवर्ष त्याच ठिकाणी) गावातील लोक जातात. नवायच्या दिवशी बाभळाच्या लाकडाची एक खुंटी घराच्या दरवाजाच्या मध्यभागी गाडली जाते. तिला दिवाळीला परत काढून घेऊन पूजेच्या ठिकाणी घेऊन जातात. सोबत मूठभर ज्वारी, उडीद, बाजरी असे धान्य घेऊन जातात. पूजेप्रसंगी बोकडाचा बळी दिला जातो. तेथून आल्यावर पूजून आणलेली खुटी पुन्हा त्याच दरवाजाच्या मध्यभागी गाडली जाते. पूजेनंतर बोकडाच्या मांसाचे प्रसाद म्हणून तेथेच सेवन केले जाते घरून भाकरी घेऊन जातात. अशा रितीने पावरा समूहाची गावदिवाळी साजरी होते. खानदेशातील सातपुडा पर्वत भागात राहणारे आदिवासी बांधव दिवाळीचा सण साजरा करतात.

(मराठी विभागप्रमुख, एसपीडीएम महाविद्यालय, शिरपूर, जि. धुळे.)

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दिवाळी हा केवळ उत्सव नसून लोकसंस्कृती, परंपरा आणि सामाजिक ऐक्य यांचा सुंदर संगम आहे. वसूबारसपासून या सणाला सुरुवात होते. शेतकरी गाय-वासराची पूजा करून कृतज्ञतेची भावना व्यक्त करतात. धनत्रयोदशीला धन्वंतरीपूजन, तर नरक चतुर्दशीला अभ्यंग स्नान, 'चाव दिवस', गोविंदा उच्चार, सातविनच्या सालीचा रस आणि रांगोळ्या-दीप यांचा रंगीबेरंगी उत्साह असतो.

# नवतेजाची, मांगल्याची दीपावली



वृंदा शरद कांबळी

*जीवनी नवतेज राहो, अंतरंगी भावना,*
*सुंदराचा वेध लागो मानवाच्या जीवना*

असाच संदेश घेऊन जणू दिवाळी येते. ऋतू कूस बदलत असतो. पावसाळा संपून बोचऱ्या थंडीचा हिवाळा हलकेच आलेला असतो. भाताची कापणी होऊन घरात धान्याची समृद्धी आलेली असते आणि... अशाच आनंदी वातावरणात आनंदाचा, समृद्धीचा, प्रकाशाचा संदेश घेऊन लक्ष्मीच्या पावलांनी दीपावली येते. हा सण साजरा करण्याच्या पद्धती गावागावातून वेगवेगळ्या असतात. दर दहा मैलांवर भाषा आणि संस्कृती बदलत असते असे म्हणतात. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ग्रामीण भागात एक समृद्ध अशी प्राचीन लोकसंस्कृती नांदत आहे. प्रत्येक ठिकाणच्या रूढी, परंपरा या तेथील लोकसंस्कृतीचे महत्त्वाचे अंग असतात.

सिंधुदुर्ग जिल्ह्याचा विचार करता ग्रामीण भागात बहुसंख्य शेतकरी वर्ग आहे. वसुबारसपासून दीपावलीच्या सणाला सुरुवात होते. वसुबारस या दिवशी काही ठिकाणी शेतकरी गाय व वासराची पूजा करतात. गोधन हे शेतकऱ्याचे उपयुक्त धन. या पशूधनाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची भावना त्यातून दिसून येते. दुसरा दिवस धनत्रयोदशीचा. या दिवशी वैद्यकीय व्यावसायिक धन्वंतरीची पूजा करतात. या सर्व सणांच्या रूढींमध्ये मानवी मनातील कृतज्ञता या उदात्त भावनेचे जे दर्शन घडते ना, ते खूप सुंदर असते. पूजा करणे एवढीच कोरडी कृती नसते, तर त्या त्या घटनांबद्दल आपुलकी, प्रेम, सद्भावना व कृतज्ञ भाव असतात, म्हणूनच 'पूजा' ही कृती घडत असते. यानंतर येतो तो नरक चतुर्दशीचा दिवस. अभ्यंगस्नानाचा पहिला दिवस. ग्रामीण भागात, बोलीभाषेत पूर्वी या दिवसाला 'चाव दिवस' असेही म्हणत असत. पहाटेच उठून उटणे तेल अंगाला लावून स्नान करतात. पूर्वी काही ठिकाणी याच दिवशी वर्षभरातून एकदा सुगंधी साबण आणला जाई. कारेटे नावाचे रानटी व कडू फळ असते. ते फळ तुळशीसमोर पायाखाली चिरडून मोठ्याने 'गोविंदा, गोविंदा' असे ओरडण्याची प्रथा आहै. ग्रामीण भागात वाड्या वाड्यातून घरे जवळ-जवळ असतात, तर पहिले गोविंदा आवाज कोणत्या घरातून प्रथम आला, यावर नंतर चर्चा

रंगत असत. माझ्या घरातून पहिला आवाज आला, हे अभिमानाने सांगितले जाई. 'सातविन' नावाचा एक औषधी वृक्ष रानात असतो. त्याच्या सालीचा रस सकाळीच घरातील सर्वांना प्यायला दिला जातो. चमचाभर तरी तो रस घेतलाच पाहिजे असा दंडक असतो. या रसामुळे दिवाळीतील पदार्थांचे पचन चांगले होते अशी समजूत आहे. पहाटे उठून दिवे लावले जातात. घरोघरी अंगणे रांगोळ्यांनी सजतात.

*आनंदाने घर हे झुलते, तोरण लेवून दारी,*
*मांगल्याला साद घालते रंगांची ही उधळण न्यारी...*

त्यानंतर फराळाचा कार्यक्रम होतो. शेजारच्या लोकांना बोलावले जाते. सिंधुदुर्ग जिल्ह्यात ग्रामीण भागात बहुसंख्य शेतकरीवर्ग असल्याने फराळात पोह्यांचाच वापर असायचा. गूळ-खोबरे वापरून केलेले रुचकर असे गोडे पोहे, उकडलेली रताळी, वाटाण्याची तिखट उसळ, असली तर दारची केळी, क्वचित तिखट कांदे पोहे अशा प्रकारच्या फराळांनी सजलेली ताटे एकमेकांकडे पाठविली जात. आग्रहाने एकमेकांना खाऊ घातले जाई. आता प्रभावी प्रसारमाध्यमांनी विविध विचारांचे वारे वाहत असते. मानवी जीवन तळापासून ढवळून निघत आहे. फार झपाट्याने खेड्यांचा शहरीकरण होते आहे. शहरी संस्कृती, आचार, विचार फार वेगाने सर्वत्र पसरत आहेत. त्यामुळेच आज पारंपरिकतेबरोबरच आधुनिकतेचा स्वीकार केलेला दिसतो. त्यामुळेच आज ग्रामीण भागातही दिवाळीच्या सणात पारंपरिक पदार्थांबरोबरच लाडू, चकली, चिवडा, शंकरपाळी, अनरसे, करंजा इत्यादी विविध पदार्थ काही अपवाद वगळता दिसून येतात. आज पारंपरिकता व आधुनिकता यांचा सुरेख संगम सर्वच सणात आढळतो, तो खरोखरच सुंदर असतो. पूर्वीच्या काळात म्हणजे साधारणतः ५० वर्षांपूर्वी कडधान्यांचा वापर करून भाजणीचा केलेला रुचकर पदार्थ 'कडबोळी' नावाचा पदार्थ आज आधुनिकतेच्या रेट्यात काळाच्या मागे जाऊन लोप पावेल की, काय असे वाटत आहे. आज क्वचितच हा पदार्थ पाहायला मिळतो. पदार्थ कोणतेही असोत; पण माणसांनी आपल्या घरी यावे व आपण त्यांना खाऊ घालावे, ही आतिथ्यशीलता तीच आहे. एखादी नवीन प्रथा सुरू होते, तेव्हा ती झिरपत-झिरपत तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचते व प्रचलित होते. तसेच दिवाळीचे विविध पदार्थ आज सर्वत्र दिसून येतात. नरक चतुर्दशीच्या दिवशी घरातील सर्वजण एकत्र फराळाला बसतात व घरातील गृहिणी सर्वांचे औक्षण करते. या दिवाळी सणानिमित्त ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात व्यापारी उलाढाल होत असते.

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी व्यापारी व व्यावसायिक लोक आपल्या घरी लक्ष्मीचे पूजन करतात. व्यापारी याच दिवशी चोपड्यांचे म्हणजे आपल्या हिशोबाच्या वह्यांचे पूजन करतात. पाडव्याच्या दिवशी पत्नी पतीला ओवाळते. पती पत्नीला भेटवस्तू देतो.

त्यानंतर येतो दिवस तो भाऊबिजेचा. भाऊ कुठेही असला तरी कितीही दूरचा प्रवास करून तो बहिणीच्या घरी पोहोचतोच. बहिणीने केलेले औक्षण हे आयुष्याला सुरक्षित करते अशी समजूत आहे.

*नेत्र निरांजने घेऊनी भगिनी तुला ओवाळिती,*
*निष्काम बंधू प्रेम देती , भाव मंगल दाविती.*

भाऊ बहिणीच्या पवित्र प्रेमाचा भाऊबिजेचा दिवस हा दीपावली सणातील शेवटचा दिवस असतो.

पूर्वी दीपावलीचे दिवे उजळण्यासाठी पणत्यांचा वापर केला जात असे. आता विद्युत रोषणाईला महत्त्व आले आहे. फार सुंदर, आकर्षक, नयनरम्य अशी रोषणाई पाहून पावले थबकतात. थांबून पाहण्याचा मोह आवरत नाही. दिवाळीच्या दिवसात केवळ रोषणाई पहाण्यासाठी बाजारपेठांमध्ये गर्दी उसळते.

*आकाशीचे प्रकाश वैभव भूवरी अवतरले.*
*दीपावलीने आनंदाचे सप्तसूर छेडले.*

असेच वाटत राहते. आता ग्रामीण भागातूनही युवकांची मंडळे आहेत. यामध्ये सर्व जाती धर्मांचे युवक एकत्र येतात. ही मंडळे नरकासुर तयार करतात. काही मंडळे नरकासुर स्पर्धा ठेवतात. त्यानिमित्त गावातील युवक एकत्र येत आहेत. सहकार्यातून काहीतरी कार्य करत आहेत. कलागुणांना वाव मिळत आहे. कल्पकतेला संधी मिळत आहे. हे सर्व चित्र आज आश्वासक चित्र आहे. गावागावातून मुले किल्ले करत आहेत. पालक त्यांना प्रोत्साहन देत आहेत. लहान मुलांच्या कल्पकतेला व कलेला प्रेरणा दिली जात आहे.

अशाप्रकारे सिंधुदुर्ग जिल्ह्यात दीपावली हा सण साजरा होत असताना त्यातून दिसून येणारी सामाजिक ऐक्याची जपणूक मला खूप महत्त्वाची वाटते.

( लेखिका या महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळाच्या सदस्या आहेत. तसेच कोकण मराठी साहित्य परिषद महिला साहित्य संमेलन समिती प्रमुख आनंदयात्री वाङ्मय मंडळ ,वेंगुर्ला, संस्थापक अध्यक्ष आहेत.)



**सातारा जिल्हा हा ऐतिहासिक आणि क्रांतिकारक वारशासाठी प्रसिद्ध आहे. त्याच जिल्ह्यातील आंबवडे बुद्रुक हे गाव आता किल्ल्यांचे गाव म्हणून ओळख मिळवत आहे. या गावातील ग्रामस्थांनी आणि तरुणांनी मिळून इतिहास जिवंत ठेवण्याचा एक आगळावेगळा उपक्रम राबवला आहे. दिवाळीच्या काळात गावात महाराष्ट्रातील विविध गडकिल्ल्यांच्या प्रतिकृती बनवून त्यांचा इतिहास सर्वांना सांगितला जातो. या प्रतिकृती बनवताना इतिहासतज्ज्ञांचा सल्ला, स्थानिक साहित्याचा वापर आणि अचूक माहिती सादर करण्याची तळमळ यामुळे या उपक्रमाला विशेष स्थान मिळाले आहे.**

# किल्ल्यांचे गाव - आंबवडे बुद्रुक

**विजय मांडके**

सातारा जिल्हा म्हटलं की, ऐतिहासिक जिल्हा, क्रांतिकारक जिल्हा, सांस्कृतिक वैभवाचा जिल्हा, गडकिल्ल्यांचा जिल्हा, राजकीयदृष्ट्या प्रगल्भ जिल्हा म्हणूनच ओळखला जातो. प्रतिसरकारचा जिल्हा म्हणूनही याकडे संपूर्ण जगाचे लक्ष वेधले जाते. आता गेल्या काही वर्षांपासून यात आणखीन एका विशेषणाची भर पडली आहे आणि ती म्हणजे किल्ल्यांचे गाव म्हणून सातारा तालुक्यातील आंबवडे बुद्रुक हे ओळखले जाऊ लागले आहे. महाबळेश्वर तालुक्यातील भिलार हे जसे पुस्तकांचे गाव; तसेच आंबवडे बुद्रुक हे गडकिल्ल्यांचे गाव म्हणून आता सर्वदूर प्रसिद्ध पावले आहे.



नव्या पिढीला ऐतिहासिक अशी माहिती उपलब्ध व्हावी, गडकिल्ल्यांची माहिती उपलब्ध व्हावी आणि हा ऐतिहासिक वारसा नवीन पिढीने विसरून जाऊ नये, यासाठी साताऱ्याजवळील परळीजवळील अंबवडे बुद्रुक या गावातील ग्रामस्थांनी एक नवीनच उपक्रम गेल्या काही वर्षांपासून सुरू केला आहे. दरवर्षी त्याला चांगला प्रतिसाद मिळत असून हा उपक्रम सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

दिवाळी जसजशी जवळ येऊ लागते, तसतसे या अंबवडे बुद्रुक गावातील ग्रामस्थांना आणि विशेषतः तरुण पिढीला एक वेगळाच ध्यास लागू लागतो आणि तो म्हणजे इतिहासकालीन गडकिल्ले बनवण्याचा! मग हे गडकिल्ले जलदुर्ग भुईकोट किल्ले गिरीदुर्ग या प्रकारातील बनवले जातात. साधारणपणे ४० ते ४५ किल्ल्यांच्या अगदी हुबेहूब प्रतिकृती येथे तरुण वर्गाकडून बनवल्या जातात आणि याचे एक वैशिष्ट्य म्हणजे इतिहासाच्या काही पाऊलखुणाही येथे नाट्यस्वरूपात त्या किल्ल्याच्या परिसरात दाखवल्या जातात आणि त्या किल्ल्याची माहिती शाळकरी विद्यार्थी अगर त्या मंडळाचे कार्यकर्ते सलग दहा मिनिटे उपस्थितांना देतात. मग त्यामध्ये त्या किल्ल्याचे बांधकाम कोणी केले, त्या किल्ल्याचा इतिहास त्या किल्ल्याला असलेले महत्त्व हे सांगितले जाते.

अंबवडे बुद्रुक येथे हे किल्ल्याच्या प्रतिकृती बनवताना ज्यांना इतिहासाची पूर्ण माहिती आहे अशा इतिहासतज्ज्ञाकडून माहिती घेऊन नंतरच बनवले जातात. चुकीचा इतिहास नव्या पिढीपुढे जाऊ नये, याची काटेकोरपणे काळजी घेतली जाते.

विशेष म्हणजे किल्ल्यांच्या प्रतिकृती बनवताना; तसेच त्या किल्ल्यावर घरे, मंदिरे; तसेच सैन्य दाखवताना ते पुष्ठ्याचे आगर कागदाचे बनवले जाते. त्याचबरोबर माती, शेण, राख, भुसा याचा यात वापर केला जातो.

दीपावलीच्या काळात बहुतेकांच्या घरासमोर लहान मुले किल्ला बनवतात, त्यावर सैन्य आणि त्याची माहिती ठेवतात, लिहितात. अगदी याचा पुरेपूर उपयोग करून घेऊन आंबवडे बुद्रुक या गावातील तरुणांनी व ग्रामस्थांनी एकत्र येऊन २०१२ सालापासून या गावात ऐतिहासिक गडकिल्ल्यांचे महत्त्व सर्वांनाच कळावे, या हेतूने या गावात किल्ल्यांच्या प्रतिकृती बनवून त्या किल्ल्यांची माहिती देणे व त्याचबरोबर त्या-त्या किल्ल्याची संबंधित असलेली माहिती त्या प्रतिकृतीच्या शेजारील जागेत नाटिका सादर करून लोकांपुढे मांडणे हे महत्त्वाचे काम केले जाते. त्याचबरोबर काही किल्ल्यांच्या प्रतिकृतींसमोर विद्यार्थी-विद्यार्थिनी त्या-त्या किल्ल्यांची माहिती दहा मिनिटे उपस्थितांना देतात.

अंबवडे बुद्रुक या गावचा हा उपक्रम अतिशय लक्षवेध ठरला आहे आणि दरवर्षी येथे किल्ले बघण्यासाठी व त्यांचा इतिहास जाणून घेण्यासाठी अक्षरशः जत्रेसारखी गर्दी असते आणि या गर्दीचाच उपयोग इतिहासकालीन माहिती देण्यासाठी व पर्यावरणाचा संदेश देण्यासाठी केला जातो. महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाचेही या उपक्रमाकडे लक्ष वेधले असून या महामंडळाकडूनही या उपक्रमासाठी साहाय्य केले जाते.

कोकणातील दिवाळी अजून तरी आगळी-वेगळी अशीच आहे. दिवाळी सण मोठा, नाही आनंदाला तोटा, कोकण अशी परंपरा आणि संस्कृतीची दीपमाळ वर्षानुवर्षे जपत आला आहे. कोकणातील दिवाळी ही पारंपरिक आणि खास चवींनी परिपूर्ण असते. कोकणातील दिवाळीची खाद्यसंस्कृती पारंपरिक आणि स्थानिक पदार्थांनी समृद्ध आहे, ज्यामध्ये शाकाहारी आणि मांसाहारी पदार्थांचा समावेश असतो. दिवाळीच्या निमित्ताने अनेक ठिकाणी खाद्यपदार्थांचे महोत्सव आयोजित केले जातात. ज्यामुळे बचतगटांना बाजारपेठ मिळते आणि स्थानिक खाद्यसंस्कृतीला प्रोत्साहन मिळते.

# कोकणातील दिवाळी व खाद्यसंस्कृती

**सतीश पाटणकर**

लहानांपासून थोरांपर्यंत प्रत्येकाच्या मनात असलेला दिवाळीचा उत्साह वेगवेगळा आहे. फराळ, फटाके, नवनवीन कपडे, बहीण-भावाच्या नात्याची भाऊबीज, लक्ष्मीपूजन, पाडवा असे चार दिवसांच्या दिवाळीत उत्सवाचे आणि उत्साहाचे नाना रंग आपले मन प्रफुल्लित करत आले आहेत. ग्रामीण भागाचे झपाट्याने शहरीकरण होत असले तरी काही परंपरा आजही टिकून आहेत. दीपावली म्हणजे दिव्यांच्या ओळी. कोकणातील देवळादेवळातून होणारा दीपोत्सव ही एक वेगळीच अनुभूती असते. गावागावातील देवळांसमोर असलेले दीपस्तंभ दिव्यांनी उजळून निघालेले असतात. पूर्वी या दीपस्तंभांवर पणत्या ठेवल्या जात. आताच्या आधुनिक काळात मात्र विजेच्या तोरणांना अधिक पसंती दिली जाते. घरांसमोरच्या अंगणात आकाश कंदिलांचा झगमगाट फारसा नसला तरी अजूनही बांबूच्या कामट्यांपासून 'पारंपरिक पद्धती'चा आकाश कंदील बनविणे व तो अधिकाधिक उंचीवर टांगणे ही मजा आजही टिकून आहे. सध्या 'रेडिमेड' आकाश कंदिलांचा जमाना असला, तरी ग्रामीण भागात 'पारंपरिक पद्धती'च्या आकाश कंदिलांना अजूनही प्राधान्य दिले जाते.



दिवाळीचा पहिला दिवस धनत्रयोदशी. याला कोकणात अनेक ठिकाणी 'धनतेरस' असेही म्हटले जाते. पूर्वी या दिवशी छोटे किल्ले तयार करण्याची प्रथा होती. त्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज व मावळ्यांच्या छोट्या-छोट्या मूर्त्या तयार केल्या जात. या दिवशी लोक धनाची म्हणजेच लक्ष्मीची पूजा करतात. एखाद्या ताम्हणात, वाटीत किंवा पाटावर नाणी ठेवून त्याची हळद-कुंकू वाहून ही पूजा केली जाते. धणे, गूळ एकत्र करून त्याचा प्रसाद वाटला जातो. ही परंपरा व्यापारीवर्गाने टिकवून ठेवली आहे. सर्वसामान्य माणूस त्याकडे फारसे लक्ष देत नाही. याच धनत्रयोदशी दिवशी धन्वंतरी पूजनही करण्याची परंपरा आहे. आयुर्वेद शास्त्रामध्ये या परंपरेला विशेष महत्त्व दिले गेले आहे. धन्वंतरी पूजनच्या निमित्ताने कडुनिंबाची पाने खाण्याची किंवा 'सात्विन' वृक्षाच्या सालीचा रस प्राशन करण्याची प्रथा आहे. ती अजूनही पाळली जात आहे.

असुर शक्तीचा संहार म्हणजे मांगल्याची सुरुवात नरक चतुर्दशीच्या दिवशी होते. मानवांना हर प्रकारे पीडा देणारा असुर भौमासुर म्हणजेच नरकासुर. या नरकासुराचा वध अश्विन कृष्ण पक्षातील चतुर्दशीला झाला. कोकणात, विशेषतः तळकोकणात आणि गोव्यात नरकासुर दहनाची एक पारंपरिक प्रथा आहे, जी नरक चतुर्दशीच्या

रात्री होते. यामध्ये कोकणात विशेषतः सिंधुदुर्ग जिल्ह्यात, प्रचंड मोठे आणि अक्राळ-विक्राळ नरकासुराचे पुतळे तयार करण्याची स्पर्धा असते. नरकासुराचे मोठे पुतळे तयार करून ते जाळले जातात.

नरकचतुर्दशी दिवसाची सुरुवात अभ्यंगस्नानाने होते; पण कोकणात मात्र आजही अनेक गावांत नारळाच्या रसाने स्नान करण्याची प्रथा आहे. थंडीच्या दिवसात त्वचा रुक्ष पडते. त्वचेचा रुक्षपणा घालवण्यासाठी नारळाचं दूध वापरून स्नान केले जाते. दिवाळीला घराला रंगरंगोटी करण्याची किंवा दाराभोवती मोठी रांगोळी काढण्याची पद्धत आहे. दारातल्या तुळशीभोवती शेण सारवून चुन्याची किंवा पीठाची रांगोळी काढली जाते. पहाटेच्या वेळी अभ्यंगस्नान झाल्यावर कोकणात घराघरांच्या समोर गोविंदाऽऽ गोविंदाची आरोळी ऐकू येते. अंगणातील तुळशी वृंदावनासमोरची जागा शेणाने सारवून घेऊन, त्यावर कडू चव असणारे ‘कारिट’ ठेवून ते डाव्या पायाच्या आंगठ्याने फोडले जाते. याचवेळी जोरजोरात गोविंदाऽऽ गोविंदा ही आरोळी अख्ख्या वाडीत घुमली पाहिजे, अशीही अपेक्षा असते. कारिट हे नरकासुराचे प्रतीक आहे. त्यामुळे वाईट प्रवृत्ती पायदळी तुडवून चांगल्या कामाची सुरुवात करण्यासाठी आशीर्वाद घेतला जातो. कोकणात अनेक गावात सातीवनाची झाडे असतात, या झाडाला नरक चतुर्दशीच्या दिवशी फार महत्त्व असते. दिवाळीची सुरुवात तोंड गोड करून करायची असली तरी कोकणात मात्र शब्दशः तोंड कडू करून दिवाळीची सुरुवात करतात. गावातील एक व्यक्ती पहाटे लवकर उठून या झाडापाशी जाते. सातीवनाची पूजा केल्यानंतर या झाडाच्या साली काढून त्या घरी आणल्या जातात. त्यानंतर आजूबाजूंच्या घरात वाटल्या जातात. या सालीत मिरे, लसूण टाकून त्याचा रस तयार केला जातो. त्यानंतर घरातली इतर मंडळी या रसाचे प्राशन करतात. त्यात औषधी गुणधर्म असतात.



कोकणात या काळात भात कापणीची कामं सुरू असतात. कोकणातील बहुतांश कुटुंबांचा उदरनिर्वाह हा भात शेतीवर असल्याने या काळात सगळेच कापणीच्या कामात व्यग्र असतात. भाताची कापणी झाल्यानंतर पहिल्या कापणीतल्या भातापासून पोहे तयार केले जातात. भाताच्या गिरणीमध्ये तयार होणाऱ्या आजच्या ‘इनस्टंट’ पोह्यांच्या जमान्यात काही घरात भातापासून तयार केल्या जाणाऱ्या पोह्यांचे महत्त्व आजही टिकून आहे. आपल्या शहरी भागात मिळणाऱ्या पोह्यांपेक्षा हे पोहे खूपच वेगळे असतात. तपकिरी आणि जाडसर पोह्यात गुळ, खोबरं आणि वेलची घालून गोडाचे पोहे तयार केले जातात. हंगामातले पहिलेच पोहे असल्याने सारं कुटुंब देवाला नैवेद्य दाखवल्यानंतर या पोह्यांवर ताव मारतात. झटपट दिवाळीचा बेत आवरल्यानंतर सारे पुन्हा भातकापणीच्या कामाला सुरुवात करतात. दक्षिण कोकणात नरक चतुर्दशी या दिवसाला ‘चावदिस’ असेही म्हटले जाते. या दिवशी कोकणात सकाळी फराळ करताना त्यात नेहमीच्या पदार्थांना नगण्य स्थान असते. या दिवशी महत्त्व दिले जाते ते घरोघरी तयार केल्या जाणाऱ्या पोह्यांना. त्यातही हे पोहे अगदी पारंपरिक पद्धतीने केले असतील, तर त्याची चव न्यारी असते. या दिवशी शेजाऱ्यांना; तसेच नातेवाईकांना पोहे खायला येण्याचे निमंत्रण दिले जाते. वाडीवाडीत एकमेकांच्या घरी पोहे खाण्यासाठी लोक जातात. तरीही घराघरातून मात्र न्याहारीसाठी फोडणीचे खमंग पोहे, सोबत केळीच्या पानात सजलेली रताळी ठेवलेली असतात. तिखट पोहे, गोड पोहे, गूळ पोहे, दूध पोहे, बटाटा पोहे आदी प्रकार या निमित्ताने होत असतात. प्रथेनुसार काही-काही ठिकाणी त्यासोबत काळ्या वाटाण्याची उसळही असते. कोकण नेहमीच मुंबईचे अनुकरण करत आलेला आहे. त्यामुळे कोकणच्या दिवाळी फराळात करंजी, बेसन लाडू, रवा लाडू, मोतीचूर लाडू, शंकरपाळी, शेव ,चिवडा, चकली, अनारसे, तांदळाचे लाडू हे पदार्थ आवर्जून पाहायला मिळतात.

कोकणातील एक वैशिष्ट्य म्हणजे गणेशेत्सवापासून सुरू होणारी पारंपरिक भजने दसरा-दिवाळीपर्यंत जोरात सुरू असतात. गावातील भजनी मेळे नवरात्रीतील जागर करतात. भजन मेळ्यांच्या स्पर्धा याच कालावधीत उदंड झालेल्या असतात. भात कापणीचा हंगाम संपत आलेला असतो. पिकलेले भात घरात आलेले असते. याच धावपळीत दिवाळीचे दिवस सरतात आणि तुलसी विवाहाने कोकणातील दिवाळीची समाप्ती होते.

**(लेखक हे मुख्यमंत्र्यांचे माजी माहिती अधिकारी आहेत.)**

**शुभंकरोति कल्याणम्... या मंगल दीपस्तोत्रातील शुभ, कल्याण आणि समृद्धीचा संदेश दिवाळीच्या प्रत्येक दिव्यात दडलेला आहे. अंधारावर प्रकाशाचा विजय साजरा करणारा हा सण काळाबरोबर बदलत गेला. मातीच्या पणतीच्या मिणमिणत्या ज्योतीपासून ते झगमगत्या एलईडी लाईट्सपर्यंत; पण या प्रवासात बदलली ती केवळ प्रकाशाची पद्धत; दिव्याचा अर्थ, भावना आणि श्रद्धा आजही तशीच तेजस्वी आहे.**

# प्रकाशाचा सांस्कृतिक प्रवास

**अर्चना देशमुख**

*शुभंकरोति कल्याणम् आरोग्यम् धनसंपदा*
*शत्रुबुद्धी विनाशाय दीपज्योती नमोऽस्तुते*

शुभ आणि कल्याण करणारे, आरोग्य धनसंपदा देणारे आणि शत्रु बुद्धीचा नाश करणाऱ्या दीपज्योतीला नमस्कार अशा या दिव्यांच्या ज्योतींनी आपले आयुष्य प्रकाशमान करणारा दिवाळी हा प्रकाशोत्सव, दीपोत्सव! या दिवाळीपर्वाचे प्रकाशोत्सवाचे वर्णन करावे तितके कमी! दीपोत्सव साजरा करताना प्रत्येक भागाच्या परंपरा पद्धती यामध्ये वेगळेपणा असला, तरी शत्रुबुद्धीचा विनाश करून सर्वांना सुख, समृद्धी, आरोग्य, धनसंपदा देऊन कल्याणकारी आशेची ज्योत पणतीच्या माध्यमातून या दिवाळीच्या निमित्ताने मोठमोठ्या राजमहालांपासून ते अगदी छोट्याशा झोपडीत लावली जाते.



दिवाळी या प्रकाशोत्सवाची सुरुवात होते, ती मातीच्या पणतीपासून. मातीची पणती म्हणजे साधेपणा, पवित्रता आणि मातीतल्या माणसाचा स्नेह. मातीची पणती, कापसाची वात आणि तेल यातून निर्माण होणारा उबदार व स्नेहाचा प्रकाश, जो आपल्या सर्वांचे घर आणि आयुष्य उजळवतो. पूर्वीच्या काळात जेव्हा विजेचा स्रोत नव्हता, त्यावेळी अंधाराचा भेद करणारा एकमेव मार्ग म्हणजे पणती. दिवाळीच्या दिवसांत घराच्या दाराशी, अंगणात, मंदिरात, गोठ्यात, शेतात या पणत्या लावल्या जात. लक्ष्मीचे स्वागत म्हणून या दिव्यांचा रांगोळीसोबत लावला जाणारा दिवा हा नृत्यसमान नजारा पाहूनच दिवाळीचे सौंदर्य खुलायचे. तिच्या मिणमिणत्या ज्योतीत घर आणि मन उजळायचे.

काळाची पावले हळूहळू नवनिर्मितीच्या दिशेने पडू लागली आणि १९व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २०व्या शतकाच्या सुरुवातीला काच आणि पितळेच्या दिव्यांचा काळ आला. शहरांमध्ये वीज येऊ लागल्याने लोकांच्या हातात नवे पर्याय मिळाले. पितळेचे दिवे, काचेचे झाकण असलेले लँटर्न, रंगीत दिवे आणि विद्युत बल्ब यांचा प्रसार झाला. यासोबत मेणबत्त्यांचा पर्याय सजावटीसाठी उपलब्ध झाला. मेणबत्त्यांच्या विविध रंग, आकार आणि सुगंधांनी दिवाळी सजली; पण तरीही त्या पणतीच्या उबेला स्पर्श करू शकल्या नाहीत. दिवाळीच्या निमित्ताने लोकांनी मातीच्या पणत्यांसोबतच विविध रंगाच्या मेणबत्ती, काचेच्या रंगीत बल्बांनी घर सजवायला सुरुवात केली. बाजारात मिळणारे साखळी बल्ब हे नवीन आकर्षण ठरले. त्या काळी दिवाळीच्या तयारीत वायर बसवणे, बल्ब लावणे, फ्यूज झालेल्या बल्बच्या जागी नवा बल्ब बसवणे ही सुद्धा एक सणासुदीची मजा होती.

भारतात १९८०-९० च्या दशकात विद्युत सजावटीचे पर्याय निर्माण झाले. बाजारात रंगीबेरंगी बल्ब आणि साखळी लाइट्स मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाल्याने शहरी भागात प्रत्येक घर, दुकान आणि गल्ली प्रकाशाने उजळून निघते; पण याही काळात पणतीचे महत्त्व कमी झाले नाही. या २०००च्या दशकानंतर एलईडी या नव्या प्रकाश तंत्रज्ञानाने संपूर्ण दिवाळीच्या सजावटीचा चेहरामोहरा बदलून टाकला. या दिव्यांनी प्रकाशात विविधता आणली. रंग, पॅटर्न, झगमग, रिमोट कंट्रोल, सौर ऊर्जेवर चालणारे पर्याय निर्माण केले. एलईडी लाईट्स केवळ ऊर्जा-बचतीच्या नाहीत, तर आकर्षक रंग, आकार आणि पॅटर्नमध्ये उपलब्ध आहेत.

### मिलाप संस्कृती आणि तंत्रज्ञानाचा

एलईडी लाईट्सने पारंपरिक पणत्यांची जागा घेतली असली, तरी संस्कृतीचे मूळ स्वरूप अद्यापही जिवंत आहे. आजही प्रत्येक घरात लक्ष्मीपूजन आणि घराच्या दरात मातीची पणती लावली जाते. तो एक दिवा असतो श्रद्धेचा आणि बाकी असतात शोभेचे दिवे! अर्थात, आजची दिवाळी ही पारंपरिकतेचा सुगंध आणि आधुनिकतेचा प्रकाश यांचा संगम आहे.

### पणती सांस्कृतिकतेचे प्रतीक

पणती ही केवळ मातीचा छोटा दिवा नाही, तर ती श्रद्धेचा दीप आहे. तिच्या प्रकाशात आईची वात्सल्यता, घराची उब आणि संस्कृतीची माती दडलेली आहे. म्हणूनच एलईडीच्या लाखो दिव्यांतही मातीच्या पणतीचा मिणमिणता प्रकाश वेगळाच भाव निर्माण करतो. ग्रामीण भागात विद्युत दिवे जरी पोहोचले होते, मात्र पणतीचा प्रकाश अजूनही टिकून होता. प्रत्येक घराच्या देवळात आणि अंगणात पणतीचाच मान राखला जातो.

सहायक संचालक, (प्रकाशने).

# हास्यकल्लोळ...



















व्यंगचित्रकार : जय जाधव

महाराष्ट्र शासन

# जय महाराष्ट्र

## दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून
## दर मंगळवारी रात्री ८.०० वाजता प्रसारण

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची निर्मिती

R.N.I.No. 14140


महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

## अधिकृत-विश्वासार्ह-वस्तुनिष्ठ




### वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत!

- राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या लोकराज्य मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढविण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत.
- वाचकांनी विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय lokrajya2011@gmail.com या ईमेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवावेत.

**अंक ऑनलाइन मोफत उपलब्ध**

संकेतस्थळ : https://dgipr.maharashtra.gov.in
आणि https://mahasamvad.in

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

**पत्ता :** उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२.

Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR


O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

**गोविंद अहंकारी**
उपसंचालक (प्रकाशने),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.

प्रति / TO

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक गोविंद अहंकारी, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. प्रिंटरेड इश्युज (इंडिया) प्रा. लि., १७, प्रगती इंडस्ट्रियल इस्टेट, एन. एम. जोशी मार्ग, मुंबई - ४०० ०११ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.

मुख्य संपादक : ब्रिजेश सिंह